**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

श्री. छगन भुजबळ (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : अध्यक्ष महोदय, समोरच्या सन्माननीय सदस्यांनी आजच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे काय ?

**पृ. शी. :** लेखी उत्तरे

**मु. शी.** : अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ५७ ते ६१

सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ५७ ते ६१ सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ५७ ते ६१ सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस :** येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

असुधारित प्रत

--------

असुधारित प्रत

**पृ. शी. :** लेखी उत्तरे

**मु. शी.** : अतारांकित प्रश्नाच्या उत्तरासंबंधी अधिक माहिती

सभागृहासमोर ठेवणे.

श्री. विश्वजित कदम (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने "गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) येथील मुलींच्या वसतिगृहात योग्य आहार व सुविधा मिळत नसल्याबाबत" या विषयावरील श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर यांच्या दिनांक १४ मार्च २०१६ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ४५४०२ ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(**प्रेस :** अधिक माहिती छापावी.)

--------

असुधारित प्रत

**पृ. शी. :** शोक प्रस्ताव

**मु. शी.** : श्रीमती गिरजाबाई मच्छिंद्रनाथ जाधव, माजी वि.स.स.

यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**उपाध्यक्ष :** मी पुढील प्रमाणे शोकप्रस्ताव मांडतो.

"श्रीमती गिरजाबाई मच्छिंद्रनाथ जाधव, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. श्रीमती गिरजाबाई मच्छिंद्रनाथ जाधव यांचा जन्म २४ डिसेंबर, १९३४ रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर येथे झाला. त्यांचे शिक्षण ९ वी पर्यंत झाले होते.

कै. गिरजाबाई जाधव यांनी बालक मंदिर संस्थेचे सचिव, वैजापूर महिला मंडळाच्या सदस्या म्हणून उत्तम कार्य केले होते. वैजापूर तालुक्यातील अनेक सामाजिक व सांस्कृतिक संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता. विधानमंडळाच्या अनेक समित्यांवर त्यांनी काम केले होते.

कै. जाधव या सन १९६२ मध्ये वैजापूर मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभेवर निर्वाचित झाल्या होत्या.

असुधारित प्रत

अशा या ज्येष्ठ समाजसेविकेचे सोमवार, दिनांक १४ जून २०२१ रोजी दु:खद निधन झाले आहे.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

----------

**पृ. शी. / मु. शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. दत्तात्रय भरणे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

--------

श्रीमती आदिती तटकरे (विधि व न्याय राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री. साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था (शिर्डी) (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) (सुधारणा) नियम, २०२१ अधिसूचना क्रमांक सासवि २०२१/प्र.क्र.११८/कार्य-१६, दिनांकित ५ जुलै २०२१ सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

--------

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचा (१) वार्षिक तांत्रिक निरीक्षण (स्थानिक संस्था) अहवाल तसेच (२) सन २०१९-

असुधारित प्रत

२०२० या वर्षाचे विनियोजन लेखा अहवाल व (३) वित्तीय लेखा अहवाल खंड-१ व खंड-२ सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग या विभागांतर्गत संस्थांनी दिनांक १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ या कालावधीत घेतलेले कर्ज व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमी विषयाचे विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

--------

श्रीमती आदिती तटकरे (खनिकर्म राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील अहवाल सभागृहासमोर ठेवते.

क) कोकण विकास महामंडळ, मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल आणि

असुधारित प्रत

ख) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल आणि

ग) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१७-२०१८ या वर्षांचा वार्षिक हिशेब हे सर्व अहवाल सभागृहासमोर ठेवते. सदरहू अहवाल विधिमंडळासमोर ठेवण्यास झालेल्या विलंबाची कारणे सोबत जोडली आहेत.

**उपाध्यक्ष :** अहवाल व हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येतील.

-------

श्री. जयंत पाटील (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन २०१६-१७ या वर्षांचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

---------

असुधारित प्रत

श्री. जयंत पाटील (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र भूविकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१६-२०१७ व २०१७-२०१८ चे लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-------

श्री. नवाब मलिक (अल्पसंख्यांक विकास त औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा सन २००४-०५ ते २०१२-१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

श्री. हसन मुश्रीफ (कामगार मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

क) अकोला-वाशिम-बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, यांचे सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल आणि

ख) सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचे सन २०१८-२०१९ ते २०१९-२०२० या वर्षांचे अनुक्रमे अडतीसावा व एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृसमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत. सदरहू अहवाल विधिमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

-------

यानंतर श्रीमती कोळगिरे.......

असुधारित प्रत

श्री.उदय सामंत (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने " श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ मुंबई यांचा सन २००८-२००९ ते २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.नितीन राऊत (ऊर्जा आणि नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

क) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

ख) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनी मर्यादित यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा चौदावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

असुधारित प्रत

ग) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

घ) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-------

डॉ.जितेंद्र आव्हाड (गृहनिर्माण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने " महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०१४-२०१५ ते २०१७-१८ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री.संजय बनसोडे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने "

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल, वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षण अहवाल " सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

श्री. संजय बनसोडे (संसदीय कार्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने " विधानसभेच्या सन २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक १ मार्च, २०२१ ते दिनांक १० मार्च, २०२१ या कालावधीत मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ६५ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२१ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन संस्थगीत झाल्यानंतर, आतापर्यंत पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १९२ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह " सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

□ड.यशोमती ठाकूर ( महिला व बालविकास मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने " महिला आर्थिक

असुधारित प्रत

विकास महामंडळ यांचा सन २०१९-२०२० चा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल " सभागृहासमोर ठेवतो.

**उपाध्यक्ष :** अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-------

**पृ.शी. :** "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या तदर्थ संयुक्त समितीच्या नामाभिधानात बदल करणे

**मु.शी.:** धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या तदर्थ संयुक्त समितीच्या नामाभिधानात बदल करणे, यासंबंधी विधी व न्याय राज्यमंत्री तथा समिति प्रमुख यांचा प्रस्ताव

श्रीमती आदिती तटकरे (विधि व न्याय राज्यमंत्री तथा समिती प्रमुख) : अध्यक्ष महोदय महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानमंडळातील "धर्मादाय खाजगी रुग्णालयांची तपासणी करणे" या संदर्भातील तदर्थ संयुक्त समितीच्या नामाभिधानात सुधारणा करुन सदर समितीच्या नामाभिधानातील **"**तदर्थ**"** हा शब्द वगळून "धर्मादाय खाजगी रुग्णालयाची तपासणी समिती" असे समितीचे नामाभिधान करण्यात येवून विधीमंडळाची ही

असुधारित प्रत

कायमस्वरुपी समिती राहणार असल्याबाबतचा प्रस्ताव मी सभागृहात मांडत आहे.

मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ क क मधील तरतुदी व मा. उच्च न्यायालयाच्या या संदर्भातील योजनेच्या अनुषंगाने खाजगी व धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब व निर्धन रुग्णांसाठी १०% + १०% खाटा सवलतीच्या दराने व मोफत उपचारांसाठी राखून ठेवण्याच्या योजनेचा सर्वंकष आढावा घेणे, सदर योजनेतील त्रुटी तसेच विद्यमान कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब व निर्धन रुग्णांना अधिकाधिक सोयी-सुविधा व योग्य रितीने औषधोपचार मिळावेत यासाठी शासनास शिफारशी/ उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सविस्तर अहवाल सभागृहास सादर करणे अशी समितीची कार्यकक्षा आहे.

समितीने उपरोक्त कार्यकक्षेच्या अनुषंगाने राज्यातील सन २०१६ मध्ये पुणे व सन २०१७ मध्ये मुंबई येथील विविध धर्मादाय रुग्णालयांना भेटी दिलेल्या असून भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या आढावा बैठकीच्या वेळी समितीला मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ क क मधील

असुधारित प्रत

तरतुदी मध्ये काही सुधारणा झाल्यास ज्या उद्देशासाठी समितीची स्थापना करण्यात

श्रीमती आदिती तटकरे....

आली आहे त्याची पुर्तता करण्यास सोयीस्कर होईल असे समितीचे मत आहे. समितीने दिनांक ५ जून, २००९ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सर्व निर्णयांचा व योजनेचा पूर्ण सन्मान ठेवून व निर्णयाला कोणतीही बाधा न पोहचता शासनास एकुण १२ शिफारशी केलेल्या आहेत. त्यापैकी एकूण ३ शिफारशींवर शासनाकडून कार्यवाही झाल्याचे विभागीय सचिवांच्या बैठकीत समितीस आढळून आले आहे. समितीने वेळोवेळी धर्मादाय रुग्णालयांना दिलेल्या भेटीच्या वेळी सदर रुग्णालयांकडून निर्धन तसेच दुर्बल घटकातील रुग्णांकरिता नेमून दिलेल्या सवलतीची पूर्तता करताना दिसून आले नाही. समितीच्या प्रत्येक आढावा बैठकीच्या वेळी विभागीय सचिवांशी चर्चा करते वेळी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ क क मधील तरतुदी मध्ये काही सुधारणा करण्याबाबत वेळोवेळी सुचविण्यात आले आहे. दिनांक

२८ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या समितीच्या प्रारंभिक बैठकीच्यावेळी सदरहू बाब पुन:श्च उपस्थित केली आहे.

असुधारित प्रत

सभागृहात चर्चा झाल्यानंतर चर्चेच्या अनुषंगाने आलेल्या मुद्दयांवर विचार विनिमय करुन शासनाच्या विधी व न्याय विभागाने मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम ४१ क क मधील तरतुदी मध्ये सुधारणा करण्यात येणार असून तत्संदर्भातील विधीमंडळाच्या पुढील अधिवेशनामध्ये याबाबतचा निर्णय सादर करण्यात येईल.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

यानंतर श्रीमती करंदीकर...

असुधारित प्रत

**पृ.शी./मु.शी.:** विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. दिपक केसरकर ( समिति प्रमुख ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभा विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

**(१)** सन्माननीय विधानसभा सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी श्री. अर्णब गोस्वामी संपादक, वृत्त निवेदक व कार्यक्रम सूत्र संचालक, रिपब्लिक टीव्ही वृत्तवाहिनी यांचे विरुध्द दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरणे

**(२)** सन्माननीय विधानसभा सदस्य श्री.प्रताप सरनाईक यांनी हिंदी सिनेअभिनेत्री कंगना राणावत यांचेविरुद्ध दिनांक ७ सप्टेंबर, २०२० रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.

या दोन प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचे अहवाल सादर करण्याकरिता महाराष्ट्र विधानसभा नियम

असुधारित प्रत

१८३(१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----------

असुधारित प्रत

**विधीमंडळ परिसरात चालू असलेल्या आंदोलनाबाबत**

श्री. भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. आजचा या अधिवेशनातील कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. या शेवटच्या दिवशी सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधी पक्षतील सदस्य देखील सदनात उपस्थित असणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. काल विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी ओबीसी ठरावासंदर्भात जे सदनात वर्तन केले ते संपूर्ण महाराष्ट्रासमोर आहे. त्या नंतर सन्माननीय ज्येष्ठ मंत्री व माजी मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी मराठा

समाजाच्या विषयी केंद्र शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे, तो ठराव मांडला. मी स्वत: तालिकेवर असताना विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना विनंती केली की, आपण या महत्त्वाच्या ठरावावरील चर्चेत सहभागी व्हा. मात्र ते काही या ठरावावरील चर्चेत सहभागी होऊ शकले नाहीत.

अध्यक्ष महोदय,केंद्र शासनाने कृषी कायदा केल्यानंतर गेल्या ७ ते ८ महिन्यापासून कृषी कायद्याला विरोध करण्याकरिता देशातील बहुसंख्य शेतकरी व विशेषकरुन श्री.महेंद्रसिंह टिकैत यांच्या सारखे शेतकरी संघटनेचे नेते जवळजवळ सात-साडेसात महिने आपले घर सोडून, मुले बाळे, गुरे-ढोरे घेऊन या कायद्याच्या विरोधात उपोषण, धरणे आंदोलन करीत आहेत. त्यांची कोणी दखल घेत नाही. हा विषय केंद्राचा आहे, त्यामध्ये मला पडायचे नाही. आज महाराष्ट्र सरकार राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे कृषी विधेयक सदनासमोर आणत आहे. अशा वेळी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने विरोधी पक्षाकडून सूचना, त्यांची मते, त्यांची उपस्थिती हा प्रस्ताव सक्षम होण्याकरिता, परिपूर्ण होण्याकरिता असणे महत्त्वाचे आहे. त्यांचा काही राग, लोभ असेल, त्यांना काही गोष्टी खटकल्या असतील, मी मान्य करतो. मी माननीय उपाध्यक्ष यांना विनंती करतो

असुधारित प्रत

की, आपण संसदीय कार्य मंत्री यांना बोलावून घ्यावे. आपण अध्यक्ष या नात्याने त्यांना सदनात येण्याकरिता विनंती करावी, हा माझा पहिला मुद्दा आहे.

श्री.भास्कर जाधव.......

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, या सदनाच्या आवारात संसदीय कामकाजाच्या व्यतिरिक्त, वैधानिक कामकाजाच्या व्यतिरिक्त कोणतेही कामकाज करावयाचे असेल तर माझ्या माहितीप्रमाणे....... माझी माहिती चुकत असेल तर मी मागे घेईन आपण मला दुरुस्त करा. आपल्या परवानगीशिवाय कोणतेही कामकाज करता येत नाही. ईलेक्ट्रॉनिक मिडियातील पत्रकारांकरिता स्वतंत्र कक्ष तयार केलेला आहे. त्यांच्यासाठी ठराविक मर्यादा आखून देण्यात आलेली आहे. त्याच्या बाहेर त्यांना येता येत नाही. एका ठराविक मर्यादेपलिकडे येण्यासाठी त्यांना आपण मज्जाव केलेला आहे. विधानमंडळाने सन्माननीय सदस्यांसमवेत एका व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेशासन अनुमती दिलेली नाही. असे असताना विधान भवनाच्या पायऱ्यांवर दोन्ही सभागृहांचे काही सन्माननीय सदस्य बसलेले आहेत. त्यांनी पायऱ्यावर बसण्यावर माझा आक्षेप नाही, त्याला माझा विरोध नाही. तो त्यांचा

असुधारित प्रत

अधिकार आहे. त्याबाबत मी भाष्य करीत नाही. परंतु त्यांच्यासमोर स्पीकर आहे, त्यांच्यासमोर माईक आहे. त्या ठिकाणी स्पीकरवर भाषणे सुरू आहेत. आजतागायत अशा प्रकारची कृती मी कधीही पाहिलेली नाही. मी पुन्हा एकदा सांगतो की, माझे काही चुकत असेल तर मला दुरुस्त करण्यात यावे. मला हे जाणून घ्यायचे आहे की, अशा प्रकारे स्पीकर लावण्याकरिता त्यांना परवानगी दिलेली आहे काय ? आपण जर त्यांना स्पीकरची परवानगी दिली नसेल तर ही परवानगी त्यांना कोणी दिली, हे देखील सभागृहाला जाणून घेण्याचा अधिकार आहे. जर आपण परवानगी दिली नसेल तर ज्याने ही परवानगी त्यांना दिली असेल त्यांच्यावर कारवाई करुन तो स्पीकर जप्त करावा. माझी तिसरी मागणी अशी आहे की, या सभागृहामध्ये या विधीमंडळामध्ये शासकीय कामकाजा व्यतिरिक्त विधानसभेच्या अध्यक्षांच्या परवानगीशिवाय कोणतेही कागदपत्रे वितरित करता येत नाही. ज्या ठिकाणी आम्ही सन्माननीय सदस्य सह्या करतो, त्या ठिकाणी काही खाजगी कागदपत्रे वितरित केली जात आहेत, मी विचारले ही खाजगी कागदपत्रे आपण कशी काय वितरित करु शकता ? त्यांनी मला

श्री.भास्कर जाधव......

यावर सांगितले की, आम्ही परवानगी आणलेली आहे. मी विचारले की, मला परवानगी दाखवा, ते परवानगी दाखवू शकले नाहीत. ते कागदपत्रे घेऊन पळून जात होते. मी विधान भवनातील सुरक्षा कर्मचाऱ्यांना बोलावून नियमाप्रमाणे यांची तपासणी करावी, असे सांगितले.

अध्यक्ष महोदय, या तीन बाबी माझ्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. कुठेतरी नियमांची पायमल्ली होता कामा नये, आपल्या अधिकारांवर जर कोणी अधिक्षेप करीत असेल तर तो अधिक्षेप आपण खपवून घेता कामा नये, ही माझी मागणी आहे. माझी विनंती आहे की, आपण संसदीय कार्यमंत्री यांना बोलवावे. तसेच विरोधी पक्षाच्या सदस्यांना विनंती करुन बोलवावे. हे महाविकास आघाडीचे सरकार सर्वांना बरोबर घेऊन चालणारे सरकार आहे. हे सरकार स्वत:चा वैयक्तिक राग, लोभ, हेवे-दावे, गर्व, मान-मरातब, जपणारे नाही. महाराष्ट्रातील साडे बारा कोटी जनतेचे हित जपणारे हे सरकार आहे. म्हणून सरकारने याबाबत पुढाकार घ्यावा आणि विरोधी पक्षाच्या सदस्यांना सभागृहात बोलवावे, अशी माझी तिसरी मागणी आहे.

श्री.नवाब मलिक : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी काही महत्त्वाचे विषय सभागृहामध्ये मांडलेले आहेत. त्याला जोडून मी एक-दोन

असुधारित प्रत

महत्त्वाचे विषय मांडत आहे. त्याबाबत देखील गांभीर्याने विचार झाला पाहिजे. विधिमंडळामध्ये कामकाज करण्याचे अधिकार सन्माननीय सदस्यांना आहेत. माजी सन्माननीय सदस्य देखील विधान भवनामध्ये येऊ शकतात. माजी आमदार विधान भवनातील ईलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या प्रतिनिधींना बाईटस् देत आहेत. माजी आमदार हे जे करीत आहेत ते योग्य नाही. यामध्ये माननीय श्री.राज पुरोहित हे देखील पुढे पुढे करीत आहे. माजी आमदार येथे राजकारण करण्याकरिता या परिसराचा वापर करीत आहे, त्यावर बंदी आणली पाहिजे. काल आपल्या दालनात जे घडत होते, त्यावेळी आम्ही मार्शलला बोलावित होतो. परंतु एकही मार्शल यायला तयार नव्हता. वारंवार त्यांना बोलावूनही ते येत नव्हते. मला माहीत नाही कोण इन्चार्ज आहेत अशीच

श्री.नवाब मलिक......

भूमिका ते घेत होते. त्यामुळे विधान भवनाचे जे मुख्य सुरक्षा अधिकारी आहेत, त्यांना देखील याबाबत जाब विचारला पाहिजे. वारंवार बोलावूनही तिकडे एकही मार्शल येत नव्हता, याचा देखील जाब विचारला गेला पाहिजे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे तालिका सभाध्यक्ष असताना त्यांनी निदेश दिले होते. त्याबाबत निलंबित सन्माननीय सदस्य श्री.अतुल भातखळकर यांनी काही अनुद्गार काढले असल्यामुळे ते सर्व आपण तपासून घेतले पाहिजे. त्यांच्यावर काय कारवाई करता येईल तेही पाहिले पाहिजे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना सोशल मीडियाच्या माध्यमातून, ट्वीटरच्या माध्यमातून धमक्याही येत आहेत. त्यांच्याबाबत काही लोक वेगळी भूमिका घेत आहेत. त्यामुळे त्यांना संरक्षण देण्याबाबत आपण विचार करावा, अशी विनंती करीत आहे.

यानंतर श्रीमती गिरप.....

असुधारित प्रत

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, आपण यावर काही निदेश देणार आहात काय?

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी लाऊड स्पीकरला, तसेच कागदपत्रे वाटपाला परवानगी दिली का, असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी या अनुषंगाने हे सांगू इच्छितो की, कोणीही अशा प्रकारची कुठलीही परवानगी आमच्याकडे मागितलेली नाही व आम्ही त्यांना परवानगी देखील दिलेली नाही. त्यांनी परवानगी मागितलीच नाही, त्यामुळे परवानगी देण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. माननीय श्री.नवाब मलिक यांनी मांडलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने मी हे सांगू इच्छितो की, बाहेर चुकीच्या पध्दतीने किंवा जे बोलले जात असेल ते तपासून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या संदर्भात ...(अडथळा)...bbbb

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी असा मुद्दा मांडला की, या लोकशाहीच्या मंदिरामध्ये विधानसभेच्या सभागृहाच्या आतमध्ये, पायऱ्यांवर आमदारांना बसण्याचा अधिकार आहे. परंतु, तेथे आताही लाऊड स्पीकर वापरला जात आहे. अध्यक्ष महोदय आपल्या कार्यालयाकडून किंवा

असुधारित प्रत

विधानसभेच्या संबंधित यंत्रणेकडून याकरिता परवानगी दिली नसेल तर लाऊड स्पीकरची सिस्टिम जप्त केली गेली पाहिजे. सिक्युरिटीने ती ताब्यात घेतली पाहिजे अन्यथा तेथे जे कोणी सिक्युरिटी इनचार्ज असतील त्यांच्यावर कारवाई व्हायला पाहिजे.

श्री.धनंजय मुंडे : अध्यक्ष महोदय, आम्ही देखील विरोधी पक्षात काम केलेले आहे. विरोधी पक्षात काम करीत असताना अशीच लाऊड स्पीकर आणण्याची घटना आमच्याकडूनही घडलेली होती. लाऊड स्पीकर जप्त करुन ज्यांनी ते आणले त्यांच्यावर कारवाई देखील झाली पाहिजे, हे होणे आवश्यक आहे.

**उपाध्यक्ष** : मी सदर बाब तपासून घेऊन योग्य ती कारवाई करतो.

डॉ.नितीन राऊत : अध्यक्ष महोदय, सदर बाब अत्यंत गंभीर आहे. यामध्ये लाऊड स्पीकर जप्त करणे हा एक विषय आहे. त्यावर आपण आदेश दिलेच पाहिजेत.

डॉ.नितीन राऊत ....

तसेच, तेथे काही माजी आमदार आलेले आहेत. ते तेथे कागदपत्रे वाटताना दिसत आहेत. परंतु, त्यांना आपल्या परवानगी शिवाय असे करता येत नाही. ती कागदपत्रेही जप्त झाली पाहिजेत.

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष** : सिक्युरिटीने याची ताबडतोब दखल घ्यावी व जे कोणी कागदपत्रे वाटत असतील त्यांच्यावर बंधन घालावे.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, माननीय श्री.नवाब मलिक यांनी असा उल्लेख केला की, श्री.भास्कर जाधव यांना धमक्या येत आहेत. त्यांच्या जीविताला धोका आहे. त्यांना या सभागृहाने संरक्षण दिले पाहिजे. अध्यक्ष महोदय, आपणच आम्हा सर्व आमदारांचे तारणहार आहात. त्यांच्या जीविताला धोका आहे. त्यांना सतत धमक्या येत आहेत. अशा परिस्थितीत उद्या त्यांच्यावर जर एखादा प्रसंग आला तर त्याला जबाबदार कोण राहणार? त्यामुळे मला असे वाटते की, त्यांची सुरक्षा वाढविली पाहिजे. त्यांना संरक्षण मिळाले पाहिजे. ही देखील या सभागृहाची मागणी आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना येत असलेल्या धमक्या लक्षात घेऊन त्यांच्या जीविताचे रक्षण करण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती सर्व सुरक्षा त्यांना देण्यात येईल. गरज असल्यास ती सुरक्षा आणखी वाढविण्यात येईल.

............

असुधारित प्रत

असुधारित प्रत

## फोन टॅपिंगबाबत माहितीचा मुद्दा

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, माध्यमांच्या माध्यमातून मला असे समजले आहे की, सन २०१६-२०१७ या कालावधीत माझा फोन टॅप झालेला आहे. इसमांच्या हालचाली, ठावठिकाणा याबाबतची माहिती मिळवून त्यांना वेळीच प्रतिबंध करणे आवश्यक असल्याने त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवून समाज विघातक कृत्यांना आळा घालण्यासाठी वा अशा कृत्यांची गोपनीय माहिती मिळविण्यासाठी खालील इसमांचे फोन नंबर तातडीने अभिवेशनाखाली ठेवणे आवश्यक आहे, अशा पध्दतीचे आपल्या होम मिनिस्ट्रीच्या माध्यमातून चालते.

अध्यक्ष महोदय, मी सन २०१६-२०१७ या कालावधीत खासदार होतो. माझ्या हालचालीवर लक्ष ठेवण्याचे कोणते कारण नव्हतेच. मला जी माहिती मिळाली आहे, त्यानुसार माझे नाव अमजद खान ठेवले होते. माननीय केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब दानवे यांच्या पी.ए.चाही फोन टॅप करण्यात आला. माननीय खासदार श्री.संजय काकडे यांचाही फोन टॅप केला गेला. माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार मी नावे सांगत आहे. असे खूप लोक आहेत. इकडच्या बाकावर बसलेल्या लोकांची म्हणजे त्यांच्याच लोकांची नावेही त्यात आहेत.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने एक मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपल्या संविधानामध्ये असे नमूद केलेले आहे की, कोणाचीही गोपनीयता भंग करण्याचा अधिकार कोणालाही नाही. आपण धर्माचा आधार घेतला तर कुठलाही धर्म असेल त्यामध्येही असेच म्हटले जाते की, आपण कोणाच्या गोष्टी ऐकल्या तर ते पाप गणले जाते. सुसंस्कृत लोक या पध्दतीने करत असतील तर मला माहीत नाही. धर्माच्या नावाने राजकारण करणारे लोक असतात. हे फोन टॅप करण्याची गरज काय, या मागे कोण आहेत? पुणे पोलीस कमिशनर यांच्या माध्यमातून सन २०१७-२०१८ या कालावधीत हे फोन टॅप केले गेले. हे कोणाच्या आदेशाने झाले?

अध्यक्ष महोदय, आपण पाहिले असेल की, सध्या साखर कारखान्याबाबत तक्रारींची मोहीम सुरु आहे. माननीय श्री.नितीन गडकरी साहेबांचीही तक्रार केलेली आहे. त्यांचे फक्त २ कारखाने आमच्या विदर्भात आहेत. माननीय श्री.नितीन गडकरी

श्री.नाना पटोले ....

साहेबांच्या कारखान्यांचा तपास करा, असे पत्र त्यांचेच लोक देत आहेत. आमच्या विदर्भात त्यांचे दोन कारखाने आहेत. देशात, जगात किती आहेत ते मला माहीत नाही.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, माझा सरळ सवाल आहे की, मुसलमानांचीच नावे त्यामध्ये का टाकली, माझे नाव टाकले पाहिजे होते ना? महाराष्ट्रामध्ये हिंदू-मुस्लीमांमध्ये वाद निर्माण करुन धर्माच्या नावाने पुन्हा राजकारण करायचे व राज्य पेटवायचे हा उद्देश होता का त्यामध्ये? या सर्व गोष्टींची सविस्तर माहिती माननीय गृह मंत्री यांनी आम्हाला आजच या सदनामध्ये द्यावी.

अध्यक्ष महोदय, यामध्ये कोण सूत्रधार आहेत हे आम्हाला समजले पाहिजे. तो आमचा अधिकार आहे. आमच्यावरील आरोपाबाबत असे नमूद केले आहे की, 'ही व्यक्ती कोणतेही काम, व्यवसाय करीत नसून अमली पदार्थाची तस्करी करीत आहे'. हा आरोप केवळ माझ्यावरच नाही... जेवढ्या लोकांचे फोन टॅप झाले त्यामध्ये इकडच्याही काही लोकांचे फोन टॅप झाले असतील, यामध्ये किती लोक आहेत, नेमक्या कोणाकोणाची तपासणी केली गेली होती, कोणाकोणाचे फोन टॅप केले गेले होते, याची सविस्तर माहिती दिली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, याचा मुख्य सूत्रधार कोण आहे? कारण अधिकारी आपल्या मनाने हे करेल असे कोणालाही म्हणता येणार नाही. शासनाची त्या अधिकाऱ्याला मान्यता घ्यावी लागते. मध्यंतरी माजी गृह मंत्री

असुधारित प्रत

महोदयांनी मला सांगितले की, आमच्या मंत्री महोदयांचेही फोन टॅप करणे सुरु आहे. या राज्यामध्ये कधी असे होत नव्हते. असे अन्य राज्यात होत असेल. परंतु, महाराष्ट्रात बदल्यांचे राजकारण कधी झाले नाही.

अध्यक्ष महोदय, काल आपण सभागृहात पाहिले की, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना एक सन्माननीय सदस्य सांगत होते की, 'तुम्ही बोललात तर

श्री.नाना पटोले ...

तुमचेही अनिल देशमुख करुन टाकू'. बाहेर असे सांगितले जाते की, 'छगन भुजबळ करुन टाकू'. अशा पध्दतीची धमकी या सभागृहात दिली जाते?

अध्यक्ष महोदय, या पध्दतीची गुंड प्रवृत्ती दिसते. काल सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी आपल्या दालनात झालेल्या घटनेबाबत सांगितले. त्या घटनेमध्ये गुंड प्रवृत्ती, राडा करणारी प्रवृत्ती दिसते. परवा श्री. राजु साप्ते नावाच्या फिल्मसिटीतील एका व्यक्तीने आत्महत्या केली. त्या प्रकरणामध्ये एका संघटनेची एक व्यक्ती आज पकडली गेली. भाजपाचे एक आमदार त्या संघटनेचे अध्यक्ष आहेत.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.नाना पटोले...

तो कोण आहे, त्याचे नाव समोर आले पाहिजे. तसेच विरोधी पक्षाचे लोक त्या प्रवृत्तीचे झाले आहेत काय, याचाही शोध घेतला पाहिजे. राज्यातील फिल्म सिटी उद्योग इतर राज्यात जाणार अशी चर्चा आहे. स्व.राजू सापते यांच्या परिवारातील व इतर काही लोक मला भेटण्यासाठी आले होते. चित्रपटाच्या डायरेक्टरकडून अवैध वसूली करण्यात येत आहे, त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात येत आहे. अनेक चित्रपटांच्या शुटींग मुंबईमध्ये व राज्यात होत नाहीत. अशा पध्दतीच्या तक्रारी येत आहेत. स्व.राजू सापते यांच्या प्रकरणात ... (अडथळा)... त्यापेक्षा मोठी कारवाई केली पाहिजे. स्व.राजू सापते यांच्या प्रकरणात भारतीय जनता पक्षाच्या आमदाराचे नाव वारंवार समोर येत आहे ते पुढे आले पाहिजे. यासर्व प्रकरणातील राज्यातील गुंड प्रवृत्तींना विधानसभेच्या माध्यमातून आळा घालण्याच्या दृष्टीकोनातून योग्य निर्णय घेण्यात यावा. तसेच फोन टॅपींग मागील सुत्रधार कोण, याची माहिती देण्यात यावी.

श्री.नवाब मलिक : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी उपस्थित केलेला विषय

असुधारित प्रत

निश्चितपणे गंभीर आहे. त्यांचा मोबाईल क्रमांक हा वेगळ्या नावाने टॅप करण्याची परवानगी दिली असेल तर या सर्व विषयाची चौकशी झाली पाहिजे. त्या काळामध्ये सर्वांना फोन टॅप होत असल्याची भिती होती. सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी उपस्थित केलेल्या मुद्याची गृह मंत्री महोदय गंभीरतेने दखल घेतील.

श्री.सुनील प्रभु : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत गंभीर आहे. ज्या पध्दतीने फोन टॅप केले जातात, यासंदर्भात त्यांनी समोर आणणलेले दृश्य अत्यंत भयावह आहे. या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करण्यात यावा. सभागृहामध्ये माननीय गृह मंत्री उपस्थित आहेत. गृह विभागाच्या माध्यमातून या प्रकरणाची कसून तपास करुन सभागृहासमोर सत्य आणणे महत्त्वाचे आहे. आज सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांच्या बाबतीत ही घटना घडलेली आहे. भविष्यात अशीच घटना सभागृहातील २८८ सन्माननीय

असुधारित प्रत

श्री.सुनील प्रभु...

सदस्यांच्या बाबतीत घडू शकते. यापूर्वीही अनेकांच्या बाबतीत अशी घटना घडली असेल. यापूर्वी ज्या ज्या गोष्टी

घडल्या असतील त्यांची गृह खात्याने चौकशी करावी व ती सभागृहाला अवगत करुन देण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

अध्यक्ष महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव हे सभागृहाचे तालिका अध्यक्ष होते. त्यांनी आपले विचार सभागृहात मांडले आहेत. त्यांना ट्विटरवरुन धमक्या देण्यात येत आहेत. त्यांचा फोन टॅप करुन त्यांच्याकडील माहिती घेण्यासाठी त्यांचे संभाषण टॅप करण्यात आले तर ही भयावह बाब होईल. लोकशाहीच्या मंदिरामध्ये उभे राहून बोलत आहे. लोकशाहीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. भविष्यात लोकशाहीचा खून यापध्दतीने केला जात असल्याने याचा संपूर्ण महाराष्ट्रात निषेध करणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांचेसह आणखी कोणाचे फोन टॅप करण्यात आले त्या सर्व प्रकरणांची गृह मंत्री महोदयांनी चौकशी करावी व तो अहवाल आगामी अधिवेशनामध्ये सादर करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे. तसेच सदरहू गैरकृत्य करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात यावी, अशी माझी मागणी आहे.

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ... (अडथळा)...

असुधारित प्रत

**उपाध्यक्ष** : सुरक्षा विभागाने तत्काळ माईक जप्त केला पाहिजे.

श्री.भास्कर जाधव : अध्यक्ष महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून सभागृहाच्या बाहेर काय सुरु आहे, याची माहिती दिली आहे. आपले अधिकार आपणास माहिती असतानाही मी ते उद्‌धृत केले आहेत. सदरहू प्रकरणी कोणी परवानगी दिली, याची माहिती दिली असेल तर ते मला माहिती नाही. त्यावेळी मी सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो. आपण सदरहू माईक तत्काळ बंद केला पाहिजे. हे काय सुरु आहे ? सभागृहामध्ये बसायचे नाही, कामकाजामध्ये सहभाग घ्यावयाचा नाही, जनतेचे विषय मांडायच नाहीत, प्रत्येक वेळी राजकारण करावयाचे, असे सुरु

श्री.भास्कर जाधव...

आहे. माझे म्हणणे आहे की, त्यांना मार्शलच्या माध्यमातून विधिमंडळाच्या आवाराबाहेर काढण्यात यावे. काय सुरु आहे हे ? आम्ही म्हणू ते करु, आमचे केंद्रामध्ये सरकार आहे. आम्ही कसेही वागू. आम्ही याला त्याला आत टाकू, याचे अमूक करु, तुम्हाला जे काही करायचे ते करा,

असुधारित प्रत

कोणाला धमक्या देता या ? ज्या गावच्या बाभळी त्या गावच्या बोरी.

श्री.सुनिल केदार : अध्यक्ष महोदय, सुरक्षा अधिकारी यांना तत्काळ निलंबित केले पाहिजे...(अडथळा)... एवढे सगळे होत आहे. सुरक्षा अधिकारी यांना एवढा कसला माज आला आहे. हा काय तमाशा सुरु आहे ? त्यांना आत्ता निलंबित करण्यात यावे. सभागृहामध्ये मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांनी अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी सभागृहामध्ये थोडा उशिरा आलो आहे. विधिमंडळाच्या पायऱ्यावर अजूनही पॅरेलल सभागृह सुरु आहे. तेथे माईक सुरु आहेत, संबंध राज्यातील मिडिया लाईव्ह टेलिकास्ट करीत आहे. सदरहू प्रकरणी कारवाई करण्यास वेळ लागणार असेल तर सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी. हा विधिमंडळाचा अवमान आहे. पॅरेलल सभागृहाची व्यवस्था ताबडतोब जप्त केली पाहिजे व त्यासाठी परवानगी दिली पाहिजे, कारवाई केली पाहिजे. तोपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री.भास्कर जाधव)**

असुधारित प्रत

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये सुरु असलेल्या चर्चेच्या अनुषंगाने काल ... (अडथळा).... तालिका सभाध्यक्ष यांच्या बाबतीत एक प्रकार घडला आहे. आज आम्ही विधिमंडळाच्या सभागृहामध्ये येत असताना सकाळी आमदार महोदय, माजी आमदार व त्यांच्यासह काही व्यक्ती घोषणा देत होते. ही बाब आपण सीसीटीव्हीच्या माध्यमातून पहाल त्यावेळी त्यांच्यावरही कारवाई प्रस्तावित

श्री.रवींद्र वायकर...

करण्यात यावी. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी सभागृहामध्ये मुद्दे उपस्थित केले आहेत. काल सभागृहामध्ये जे घडले ते सर्वांनी पाहिले. तालिका अध्यक्ष महोदय यांनी उपाध्यक्ष महोदयांच्या दालनामध्ये जी घटना घडली त्याचे इतिवृत्तांत सभागृहाला काल सांगितले आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी फिल्म सिटीमधील डायरेक्टर यांचा मुद्दा मांडला आहे. सदरहू भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी. ८ डायरेक्टर यांना सतावण्यात येत आहे... (अडथळा)...

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री.रवींद्र वायकर मी आपणास पुन्हा बोलण्याची संधी देतो. आपण खाली बसावे. मी तालिका सभाध्यक्ष या नात्याने निदेश देतो की, सभागृहाच्या बाहेरील माईक, स्पीकर व लाईव्ह टेलिकास्ट तत्काळ बंद करावे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.रवींद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सभागृहातील नव्हे तर सभागृहाच्या बाहेर सुरु असलेले माईक व स्पीकर तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांनी विधानसभा सभागृहाच्या बाहेर माईकचा वापर केला आहे त्यांची नावे (अडथळा....) अध्यक्ष महोदय आपणास अतिरेक वाटेल.....

अध्यक्ष महोदय, आम्ही देखील अनेक वेळा पायऱ्यावर बसलो आहोत, घोषणा दिल्या आहेत. परंतु सभागृहाच्या बाहेर माईकचा वापर करण्याचे धारिष्ट कोणीही केलेले नाही. त्यामुळे त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी, अशी माझी आग्रहाची मागणी आहे.

श्री.नवाब मलिक : अध्यक्ष महोदय, या विधानसभेचे कामकाज आणि बाहेरील प्रतिविधानसभाचे असे दोन्हीही कामकाजाचे ABP माझावर LIVE प्रक्षेपण सुरु आहे. हे सर्व LIVE प्रक्षेपण आपल्या लॅपटॉपवर दिसते आहे. बाहेरील कामकाजाचे सर्व चित्रीकरण आणि LIVE प्रक्षेपण दाखविणे बंद करण्याचे आदेश आपण द्यावेत, अशी विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय, आपण काय म्हणत आहात पूर्ण शब्द ऐकायला आले नाहीत.

श्री.नवाब मलिक : आपण ABP LIVE पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, या विधानसभेचे कामकाज आणि

असुधारित प्रत

बाहेरील प्रतिविधानसभाचे असे दोन्हीही कामकाजाचे ABP माझावर LIVE प्रक्षेपण सुरु आहे. म्हणजेच कोठेतरी चॅनलवाले या सभागृहाचा अवमान करीत आहेत.

**तालिका सभाध्यक्ष** : बाहेरील प्रतिविधानसभेचे चित्रीकरण व लाईव्ह प्रक्षेपण तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

श्री.नवाब मलिक : बाहेरील प्रतिविधानसभेचे चित्रीकरण व लाईव्ह प्रक्षेपण अद्यापही बंद करण्यात आलेले नाही. ते सुरूच आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : तालिका सभाध्यक्षाचे आसन ग्रहण केल्याबरोबर सदर चित्रीकरण व लाईव्ह प्रक्षेपण बंद करण्यात यावे, असा आदेश दिलेला आहे.

श्री.नवाब मलिक : बाहेर LIVE चित्रीकरण करण्यात येत आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : तेही बंद करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यापुढे सरकार म्हणून काही करता येईल काय याबाबत माहिती घेऊनच त्या संदर्भात भाष्य करणे उचित होईल.

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी एक महत्त्वपूर्ण विषय

असुधारित प्रत

सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. अध्यक्ष महोदय, केरळच्या विधानसभेच्या बाबतीत माननीय उच्च न्यायालयाने निकाल देताना गोंधळी व राडेबाज आमदार व खासदार यांच्यावर खटले चालविण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

अध्यक्ष महोदय, अशा पद्धतीने सभागृहाच्या बाहेर प्रतिविधानसभा चालविणेच खऱ्या अर्थाने या सभागृहाचा अवमान आहे. आपल्या परवानगी शिवाय या सभागृहाच्या आवारामध्ये प्रतिविधानसभा चालविण्याचा अधिकार कोणालाही नाही. ज्या पद्धतीने प्रतिविधानसभा चालविण्यात आली ते केवळ महाराष्ट्रानेच नव्हे तर संपूर्ण देशाने LIVE पाहिलेले आहे. हा या विधानसभेचा अवमान आहे. पायऱ्यावर बसण्यासाठी कोणाही सन्माननीय सदस्याला विरोध नाही आहे. या महाराष्ट्राच्या विधानसभेचा अवमान करण्याचा अधिकार या सभागृहाच्या कोणत्याही सदस्याला नाही. म्हणून प्रतिविधानसभेची व्यवस्था निर्माण करणाऱ्या सर्वांवर कार्यवाही व्हावी, अशी माझी मागणी आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, ....

**तालिका सभाध्यक्ष :** माननीय गृह मंत्री महोदयांना विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.रविंद्र वायकर

यांचे भाषण झाल्यानंतर आपण आपला निर्णय जाहीर करावा. मला वाटते आपण मला सुरक्षा देण्याबाबत बोलणार आहात काय? मी सभागृहामध्ये उपस्थित नसताना काही सन्माननीय सदस्यांनी मला सुरक्षा

**तालिका सभाध्यक्ष......**

देण्याबाबतची मागणी केली आहे. मला याबद्दल आपणास काही विनंती करावयाची आहे. त्यामुळे आपण प्रथम माझे म्हणणे ऐकून घ्यावे व त्यानंतर सरकार म्हणून आपण आपला निर्णय जाहीर करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांना फक्त एक मिनिट बोलायचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** कृपया आपण परस्पर असा निर्णय घेऊन नका. अन्यथा आपणास दिलेली संधी मागे घेतली जाईल.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, काल जी घटना घडली, त्याचे इतिवृत्त आपण सभागृहामध्ये सांगितले आहे. या सभागृहामध्ये व सभागृहाच्या बाहेर जी घटना घडली

असुधारित प्रत

ती पूर्ण महाराष्ट्राने पाहिलेली आहे. आज सकाळी आल्यानंतर आपण जे वृत्त सांगितले. आपण जी माहिती दिली त्याच्या अनुषंगाने ट्विटरवर देखील आम्ही माहिती पाहिले आहे. ट्विटरच्या माध्यमातून आपल्या व या सभागृहाच्या बाबतीमध्ये तसेच आघाडी सरकारच्या बाबतीमध्ये अनेक भाष्य केली गेलेली आहेत. या सर्व बाबीची दखल सभागृहाने घेणे हे प्रामुख्याने महत्त्वाचे आहे. या ठिकाणी निवडून येतो, तेव्हा आपण लोकांचे प्रतिनिधित्व करतो. समाजासाठी जे चांगले काम आहे ते करण्याचा प्रयत्न करतो.

अध्यक्ष महोदय, आपण एक अभ्यासू आमदार आहात. आपण जे बोलता ते खरे बोलता, हे आपण त्या दिवशी सांगितले आहे आणि समाजामध्ये वावरत असताना किंवा आपल्या बरोबर काम करताना हे दिसून येते आहे. त्यामुळे आपण बोलल्यानंतर आपल्यावरती जर काही आघात होणार असेल तर आपल्याला संरक्षण मिळणे हे प्रामुख्याने महत्त्वाचे आहे आणि ते तत्काळ दिले गेले पाहिजे.

अध्यक्ष महोदय, दुसरी गोष्ट अशी की, माननीय श्री.नाना पटोले यांनी सांगितल्याप्रमाणे अस्तित्वात असलेल्या युनियनचा दबावामुळे फिल्म सिटीतील अनेक दिग्दर्शक, कला दिग्दर्शक हे फिल्म सिटीमध्ये काम करायला मागतच नाही.

असुधारित प्रत

श्री. रविंद्र वायकर.....

अनेक लोकांचा दबाव असल्याकारणाने श्री. अमन विधाते सारखे दिग्दर्शक त्या ठिकाणी काम करायला मागत नाहीत. अनेक वेळा सदर ठिकाणी खून देखील झालेले आहेत. त्यामुळे फिल्म सिटीच्या आतमध्ये पूर्णत: गृह खात्याच्या माध्यमातून चौकशी लावून .....

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विषयांतर होत आहे. कृपया लवकर कन्क्लुड करावे.

श्री.रविंद्र वायकर : अध्यक्ष महोदय, ठीक आहे. (अडथळा....) सभागृहामध्ये जे घडले आहे, त्यामध्ये ज्यांची नावे येतील त्यांच्यावर कठोरात कठोर कार्यवाही झाली पाहिजे, अशी या सभागृहाची मागणी आहे.

श्री.सुनील प्रभू : अध्यक्ष महोदय, माझ्या हातामध्ये महाराष्ट्र विधानसभेची नियमावली आहे. या नियमानुसार हे सभागृह चालते. अध्यक्ष महोदय, काल या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी गैरवर्तन केले म्हणून विरोधी पक्षातील १२ सदस्यांना निलंबित करण्याचा निर्णय या सभागृहाने घेतला आहे. लोकशाहीच्या या मंदिरामध्ये अशा पद्धतीचा निर्णय घेणे हे आपल्याला क्रमप्राप्त होते, त्या पद्धतीचा निर्णय आपण घेतला आहे. परंतु आज याच

असुधारित प्रत

विधानभवनाच्या आवारामध्ये पायऱ्यांवरती विधानसभेचे प्रतिसभागृह भरले गेले ते नियमानुसार आहे काय ? जर नियमानुसार नसेल तर त्या ठिकाणी ध्वनिक्षेपक वापरला गेला, प्रतिविधानसभा त्या ठिकाणी तयार केली गेली. ज्या पद्धतीने या सभागृहाचे कामकाज चालते त्या पद्धतीने बाहेर कामकाज चालविण्याचा प्रयत्न केला गेला. असे कामकाज नियमानुसार नसेल तर या सदनाचा तो हक्कभंग आहे. हक्कभंग असेल तर अध्यक्ष महोदय, याबाबतचा निर्णय आपण द्यावा, अशी माझी मागणी आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** आपण प्रस्ताविक मसुद्यामध्ये माननीय पीठासीन अधिकाऱ्याकडे हक्कभंग दाखल केल्यानंतर तो हक्कभंग होतो की, नाही यासाठी तो

**तालिका सभाध्यक्ष......**

प्रस्ताव हक्कभंग समितीकडे पाठवावा लागतो. तोंडी मांडलेला हक्कभंग स्वीकारता येतो की नाही, हे मला माहिती नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा हे हातामध्ये बॅनर घेऊन माननीय तालिका सभाध्यक्ष यांना निवेदन देण्यासाठी डायसवर जातात.)

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** कृपया तिकडे कोणीही लक्ष देऊ नये...... कृपया तिकडे कोणीही लक्ष देऊ नये. सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा यांना सांगू इच्छितो की, माननीय अध्यक्ष यांना अशा प्रकारे थेट निवेदन देता येत नाही. त्यामुळे आपण आपले निवेदन खाली द्यावे.

(सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा घोषणा देत राजदंड उचलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** मार्शल यांना बोलावून घ्यावे....... मार्शल यांना बोलावून सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा यांना बाहेर काढावे.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

(मार्शल सन्माननीय सदस्य श्री. रवी राणा यांना राजदंडासह सभागृहाच्या बाहेर घेऊन जात असतात, तेव्हा तालिका सभाध्यक्ष सन्माननीय सदस्यांना थांबण्याची सूचना करतात.)

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा आपणास सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांचा विषय महत्त्वाचा आहे. आज शेतकऱ्यांच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा आहे. त्यामुळे आपण सभागृहामध्ये येऊन उक्त चर्चेमध्ये सहभाग घ्यावा आणि आपले मुद्दे

असुधारित प्रत

मांडावेत. आपणास बोलण्याची पुरेपूर संधी दिली जाईल. परंतु सभागृहामध्ये स्टंटबाजीला कोठेही थारा दिला जाणार नाही. आता सन्माननीय सदस्य श्री. रवी राणा यांना मार्शल यांनी सभागृहाच्या बाहेर घेऊन जावे. राजदंड नाही म्हणून सभागृहाचे कामकाज बंद पडणार नाही, असा नियम करण्यात आलेला आहे.

**तालिका सभाध्यक्ष......**

सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा यांनी केलेल्या स्टंटबाजीला फार महत्त्व देऊ नका, अशी मी विनंती करतो.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहतात.)

आता मी उभा आहे, सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

उपस्थिती सर्व सन्माननीय सदस्यांनी एक बाब लक्षात घ्यावी की, सन्माननीय सदस्य श्री.रवी राणा यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर केलेल्या चर्चेच्या मागणीमध्ये शेतकऱ्यांबद्दल प्रामाणिक हेतू आहे की, फक्त स्टंटबाजी आहे, हे आपणा सर्वांना दिसून येत आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी.....

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष....**

आज सभागृहामध्ये कृषि विषयावर चर्चा ठेवण्यात आलेली आहे. ही बाब सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून दिली आहे. कृषि विषयावरील चर्चेत सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन चर्चा करावी. अशी चर्चा करण्यासाठी त्यांना पुरेपूर वेळ देण्यात येईल. ही बाबही सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. परंतु त्यांचा हेतू चर्चा करण्याचा नाही, हे स्पष्ट होत आहे. त्यामुळे त्या घटनेकडे अधिक लक्ष देऊन त्याचे महत्त्व वाढवू नये, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

मी माननीय गृहमंत्र्यांना एक सूचना करु इच्छितो. सभागृहामध्ये मी काही मुद्दे उपस्थित केले होते. त्या अनुषंगाने माननीय गृहमंत्र्यांनी काही मुद्दे सांगितले आहेत. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर जे सन्माननीय सदस्य बसले होते त्या सन्माननीय सदस्यांना तेथून बाजूला करण्यात आले आहे. तसेच विधिमंडळाने वृत्तवाहिन्यांना एका मर्यादेपर्यंतच प्रवेश दिला आहे. परंतु काही वृत्तवाहिन्या चित्रिकरण करण्यासाठी पुढे आल्या आहेत. त्या वृत्तवाहिन्यांना सक्त सूचना देण्यात येत आहेत की, त्यांनी भविष्यात अशा प्रकारची कृती करु नये. न पेक्षा

असुधारित प्रत

विधिमंडळाच्या नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल तत्कालीन अध्यक्ष जो निर्णय घेतील त्या निर्णयाच्या दुष्परिणामांना त्यांना सामोरे जावे लागेल. तसेच तेथील माईक काढण्यात आले असून तेथील चित्रिकरणही बंद करण्यात आलेले आहे. तेथील कॅमेरामनदेखील बाहेर गेलेले आहेत.

मला शासनाने संरक्षण द्यावे, असे माझ्यावर प्रेम असलेल्या, माझ्या जिविताची चिंता ज्यांना वाटते त्यांनी सांगितले आहे. आज आपल्या अवतीभवती जी काही दृश्य आणि उदाहरणे घडत आहेत, त्यामुळे अशा प्रकारच्या भावना माझ्या सन्माननीय सहकाऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत. त्यावर माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले की, मला संरक्षण देण्यात येईल त्याचप्रमाणे अधिकचे संरक्षण हवे असल्यास तेही दिले जाईल. मी याबाबत सभागृहाला आणि माननीय गृहमंत्र्यांना थोडी अधिकची माहिती देऊ इच्छितो.

**तालिका सभाध्यक्ष....**

मागील सहा ते सात वर्षापूर्वी मला संरक्षण दिले जात होते. परंतु त्यानंतर मला कोणत्याही प्रकारचे संरक्षण दिले नाही. याचा अर्थ मी राज्य सरकारकडे संरक्षणाची मागणी केली आणि त्यांनी ती नाकारली, असे नाही. परंतु मी सांगू

असुधारित प्रत

इच्छितो की, मी कधीच संरक्षण घेतलेले नाही. सहा ते सात वर्षापूर्वी दर तीन महिन्यांनी पोलीस अधीक्षकांकडून मला पत्राद्वारे कळविण्यात येत असे की, "मला अमूक वर्गाचे संरक्षण मंजूर आहे. आमच्याकडील माहितीप्रमाणे आपणास संरक्षण घेणे अत्यावश्यक आहे. तरी देखील आपण संरक्षण घ्यावे". मी त्या त्यावेळेस दर तीन महिन्यांना त्यांना उत्तर देऊन सांगत असे की, "मी माझ्या आयुष्यात कधीही कोणतेही चुकीचे काम केलेले नाही. मी कोणावर अन्याय केलेला नाही. मी माझ्या तत्वानुसार जीवन जगत असतो आणि म्हणून मला कोणत्याही संरक्षणांची आवश्यकता नाही." त्यावर पोलीस अधीक्षक पत्राद्वारे सांगत असत की, "आपल्या जिविताला काही धोका झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील." मी त्यांना कळवित असे की, "होय. याची जबाबदारी माझीच राहील. मी संरक्षणास जबाबदार धरणार नाही." मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मी कधीही संरक्षण घेतलेले नाही. माझ्या आयुष्यात अनेक राजकीय चढ-उतार आले आहेत. अनेकांशी माझा संघर्ष झाला होता. मी कधीही संरक्षण घेतले नाही. आज देखील माझ्या संरक्षणासाठी एक पोलीस शिपाईदेखील नसतो. याचे कारण मी कधीच संरक्षणाची मागणी केलेली नाही. मला संरक्षण नाकारल्याचा मी कधीच आरोपही करीत नाही. काल जी

घटना घडली आहे त्या अनुषंगाने सोशल मिडियाच्या माध्यमातून मला काही धमक्या येत आहेत. विशेषत: विधानपरिषदेचे सन्माननीय विरोधी पक्षनेते जाहीरपणे मुलाखत देऊन सांगत आहेत की, "भास्कर जाधव यांच्या विरोधात राज्यात एक हजार ठिकाणी आम्ही आंदोलन करणार आहोत." यामुळे माझ्या कुटुंबामध्ये थोडीशी अस्वस्थता निर्माण झाली आहे. मी स्वत: संरक्षण मागणार नाही. मला संरक्षणाची आवश्यकता आहे, असे मला वाटत नाही. परंतु काल सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहामध्ये जाहीरपणे दिलेले आव्हान, जाहीरपणे मला दिलेली धमकी, ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. नाना पटोले यांनी केला, बाहेरही त्यांनी माझ्याबद्दल वेगवेगळे

**तालिका सभाध्यक्ष....**

वक्तव्य केलेले आहेत. त्या सर्वांचा विचार करता शासनाला मला संरक्षण द्यावे, असे वाटत असेल तर ते देण्यात यावे. ही बाब माझ्याशी संबंधीत असल्याने मी याबाबत खुलासा केलेला आहे. याबाबत मी अधिक काही खुलासा करु इच्छित नाही.

श्री. दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सभागृहामध्ये दोन ते तीन मुद्दे उपस्थित करण्यात आलेले

असुधारित प्रत

आहेत. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आणि माजी विधानसभा अध्यक्ष श्री. नाना पटोले यांनी त्यांच्या फोन टॅपींगसंदर्भात गंभीर मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांनी असेही सांगितले की, सन २०१६-१७ च्या दरम्यान आणखी काही लोकांचे फोन टॅप किंवा सर्व्हेलन्ससाठी लावण्यात आले होते. माझ्या दृष्टीने ही अतिशय गंभीर बाब आहे. अशा प्रकारे फोन टॅप करण्यासाठी ठराविक कायद्यांतर्गत इंटेलिजन्स कमिशनरला अपर मुख्य सचिव (गृह) यांची परवानगी घ्यावी लागते. ज्यांचा फोन टॅप करावयाचा आहे त्यांची नावे, दुरध्वनी क्रमांक आणि कोणत्या कारणामुळे फोन टॅप करावयाचा आहे, ते करण द्यावे लागते.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्यांचे नाव बदलून त्यांचा फोन टॅप केला आहे. या संपूर्ण घटनेची चौकशी करण्याची आवश्यकता आहे. या सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आलेला हा मुद्दा अतिशय गंभीर आहे. याबाबत मी जाहीर करतो की, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल आणि त्यात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. याबाबतची सर्व वस्तुस्थिती पुढील अधिवेशनात मांडण्यात येईल. तसेच याबाबतची सर्व औपचारिकता (formality) पूर्ण करण्यात येईल.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, कला दिग्दर्शक श्री. राजू साप्ते यांनी काल आत्महत्या केली आहे. त्यांनी आत्महत्या करण्यापूर्वी एक व्हिडिओ प्रसारित केला आहे. त्यात त्यांनी सांगितले की, युनियनच्या माध्यमातून त्यांना कशा प्रकारे त्रास होतो, कशा प्रकारे काम करु दिले जात नाही, त्यांच्याकडे पैसे मागितले जातात. याबाबत त्यांनी काल तक्रार केली होती. मी कालच यासंदर्भात पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त तसेच

श्री. दिलीप वळसे-पाटील ......

पुणे आयुक्तांकडूनही माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. मुंबई पोलिसांनादेखील सूचना दिलेल्या आहेत. चित्रपट क्षेत्रामध्ये अशा प्रकारचा विनाकारण त्रास देणे, खंडणी वसूल करणे किंवा एक्स्ट्रॉशन करणे, हे राज्याच्या चित्रपट व्यवसायाच्या दृष्टीकोनातून अतिशय हानीकारक आणि घातक आहे. म्हणून यासंदर्भात मी उद्या दुपारी ०४.०० वाजता माझ्या दालनात बैठक आयोजित केली आहे. त्या बैठकीसाठी अपर मुख्य सचिव (गृह), पोलीस महासंचालक व इतर सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना हजर राहण्यास सांगितले आहे. यासंदर्भातील चौकशी करुन या प्रकरणातील वस्तुस्थिती समोर आल्यानंतर यात कोण दोषी आहे, याची माहिती मिळाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, तिसरा मुद्दा हा आपल्या संरक्षासंदर्भातील आहे. हा विषय संवेदनशील असल्याने मी त्यावर अधिक भाष्य करु इच्छित नाही. परंतु आपली इच्छा असो किंवा नसो, आपले संरक्षण करण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. मी सांगू इच्छितो की, शासन आपणास आवश्यक ते संरक्षण देणार आहे.

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, मी फोन टॅपींगसंदर्भातील प्रश्न उपस्थि केला होता. माझ्याकडील माहितीमध्ये अनेकांची नावे आहेत. प्रसिद्धी माध्यमावर अशा प्रकारच्या बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर मी याबाबतची माहिती घेतली होती. मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे फोन टॅपींगचे काम प्रशासनातील अधिकारी त्यांच्या पातळीवर करीत नसतील. त्यासाठी शासनाची मान्यता घेतली जात असेल, असा माझा कयास आहे. फोन टॅप करण्यासाठी मुख्यमंत्री स्तरावरुन मान्यता घेतली जाते काय ? याबाबत खुलासा झाला पाहिजे. फोन टॅप करण्यासाठी काय व्यवस्था असते याची माहिती आम्हाला समजली पाहिजे. फोन टॅप करण्यासाठी काय प्रोसेस असते, हे आम्हालाही समजले पाहिजे.

यानंतर श्री. चौधरी....

असुधारित प्रत

श्री.नाना पटोले.....

हवे तर ही माहिती पुढील अधिवेशनात द्यावी. ती तातडीनेच द्यावी, असे आमचे म्हणणे नाही. परंतु कोणत्या पातळीवरुन अशा प्रकारे कार्यवाही केली जाते, कोणाच्या इशाऱ्यावरुन फोन टॅपिंग केले जाते हे सांगावे. तसेच त्यामध्ये आमचे नाव मुस्लिम का टाकण्यात आले, हा देखील एक मुद्दा आहे.

अध्यक्ष महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे त्यामध्ये आमचे नाव अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांच्या यादीमध्ये दाखविण्यात आलेले आहे. संबंधित अधिकाऱ्यांना माहिती नाही का की मी खासदार होतो, मी आता देखील लोकप्रतिनिधी आहे, माझा व्यवसाय काय आहे... या गोष्टी त्यांना माहिती आहेत की नाहीत हे मलाही माहिती नाही. परंतु प्रश्न एवढाच आहे की, कोणत्या पातळीवरुन कार्यवाही केली जाते याची माहिती द्यावी. हा विषय फक्त एकट्या माझ्याशीच संबंधित नाही. माननीय केंद्रीय राज्यमंत्री श्री.रावसाहेब दानवे यांचे देखील फोन टॅपिंग करण्यात आले. माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांचा देखील असेल कारण आताच त्यांच्या साखर कारखान्याची चौकशी लावण्याबाबत पत्र दिले आहे.

असुधारित प्रत

तसेच माननीय राज्यमंत्री श्री.बच्चू कडू यांचे देखील नाव आहे. अशा किती लोकांची नावे सांगावित ? लोकप्रतिनिधींना जर अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांच्या यादीत टाकले जात असेल तर मला असे वाटते की, महाराष्ट्राचे चरित्र हनन करण्याची ही व्यवस्था आहे. त्यामुळे मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, याबाबत कोणत्या पातळीवरुन कार्यवाही केली जाते त्याचा खुलासा करावा.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले, आपण देखील यापूर्वी विधानसभा अध्यक्षपदी कार्यरत होते. परंतु सभागृहाच्या कामकाजाची एवढया वर्षांची पध्दत पाहता असे दिसून येते की, अति संवेदनशील विषयांमध्ये सरकारच्या वतीने फार उघडपणे खुलासे करता येतात, असे मला वाटत नाही. त्याउपर मंत्री महोदय काही खुलासा करणार असतील तर ते मला माहिती नाही. परंतु यासंदर्भात त्यांनी अतिशय सुचक विधान केले आहे की, उद्या दुपारी ०४.०० वाजता मी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना बैठकीसाठी बोलावले आहे.

**तालिका सभाध्यक्ष.....**

असुधारित प्रत

त्या बैठकीत ते खाजगीत चर्चा करतील. त्या बाबी या ठिकाणी उघडपणे ते बोलतील किंवा कसे हे मला माहिती नाही. अर्थात, मंत्री महोदयांनी ते ठरवावे.

श्री.जयंत पाटील : अध्यक्ष महोदय, अलीकडील काळात वर्तमानपत्रातून आणि विरोधी पक्षातील काही नेत्यांच्या तोंडून याला ईडी लावतो, त्याला सीबीआय लावतो अशी अनेक विधाने आपण ऐकतो. मंत्री या नात्याने नव्हे तर या सभागृहाचा सदस्य या नात्याने मी या ठिकाणी बोलत आहे. जर या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच फोन, राज्य सरकारव्यतिरिक्त केंद्राची एखादी एजन्सी टॅपिंगवर ठेवत असेल तर सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे संरक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे. माझी आपणाकरवी या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांना विनंती आहे की, महाराष्ट्र विधीमंडळाच्या किती सन्माननीय सदस्यांचे फोन टॅपिंगला ठेवलेले आहेत याबाबतीत केंद्र सरकारच्या ईडी, एएनआय किंवा इतरांकडे चौकशी करावी व या सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे संरक्षण करण्याबाबत कार्यवाही करावी. कारण अशा प्रकारे व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम केंद्र सरकारच्या कोणत्याही एजन्सीज करीत असतील तर त्याचा परामर्श घेऊन त्याबाबत काळजी घ्यावी व त्याची माननीय गृह मंत्र्यांकडून चौकशी व्हावी, ही विनंती.

असुधारित प्रत

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत देखील मंत्री महोदयांना काही उत्तर द्यायचे असेल तर त्याला माझा विरोध नाही. मी त्यासंदर्भात केवळ माझा अनुभव कथन केला आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत मी अगोदरच उत्तर दिलेले आहे. एखादा फोन टॅपिंगला ठेवायचा असेल तर त्याची प्रकिया काय असते हे मी सांगितले आहे. जर एखादा व्यक्ती देशविरोधी कारवाया किंवा तशा काही आक्षेपार्ह गोष्टी करीत असल्याचे इंटेलिजन्स कमिशनर यांच्या निदर्शनास आले तर ते राज्याच्या गृह सचिवांना संबंधित व्यक्तीचा फोन क्रमांक, कारणे, इत्यादी बाबी देऊन परवानगी घेतात व त्यानंतर फोन टॅप करता येतात.

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

हा विषय माननीय मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री यांच्यापर्यंत येत नाही. त्याबाबतचा निर्णय मी सांगितलेल्या स्तरावरच होत असतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले फोन क्रमांक, नावे, ती कोणत्या परिस्थितीत दिली, ती नावे खरी आहेत की खोटी आहेत... तसेच सन्माननीय सदस्यांचे

असुधारित प्रत

म्हणणे आहे की, माझा देखील त्यामध्ये नंबर आहे. त्याप्रमाणे त्यांचा नंबर आहे किंवा कसे हे पाहणे हा उच्चस्तरीय चौकशीचा भाग आहे. त्यामुळे त्यासंदर्भात मी अधिक बोलू इच्छित नाही.

अध्यक्ष महोदय, दुसरा मुद्दा माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी मांडला. केंद्रीय एजन्सीजकडून काही सन्माननीय सदस्य किंवा राजकीय व्यक्तींचे फोन टॅप केले जात आहेत का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. हा विषय केंद्र सरकारच्या अखत्यारितील आहे. मी याबाबत निश्चितपणे अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न करीन व आपणा संबंधितांना अवगत करीन.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. आता आपण पुढचा विषय घेऊ. एक गोष्ट खरी आहे की, या सभागृहामध्ये अनेक सदस्य गेल्या तीस-पस्तीस-चाळीस वर्षांपासून काम करीत आहेत. परंतु आपल्यालासुध्दा आठवत नसेल की, केंद्रीय एजन्सीची एवढी काळजी, भीती किंवा चिंता वाटावी अशा प्रकारची चर्चा महाराष्ट्राच्या विधीमंडळात कधी झाली आहे. तसे मला तरी आठवत नाही. केंद्रीय सुरक्षा एजन्सीमुळे महाराष्ट्रातील जवळजवळ प्रत्येक लोकप्रतिनिधी आणि विशेषकरुन विरोधी पक्षाचे पदाधिकारी खूप मोठया तणावात वावरत आहेत अशी परिस्थिती आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

असुधारित प्रत

श्री.नाना पटोले : अध्यक्ष महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. व्यक्तीस्वातंत्र्य हा मुद्दा सर्वात महत्त्वाचा आहे. माननीय मंत्री श्री.जयंत पाटील हे देखील आताच याबाबत बोलले आहेत. आताचे माननीय विरोधी पक्षनेते मागील सरकारचे प्रमुख होते. त्यांच्या काळात म्हणजे सन २०१६-१७ मध्ये झालेली कारवाई राज्य पोलीस दलामार्फत झालेली आहे. परंतु माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी मांडलेल्या मुद्दयाचा विचार केला तर आता सर्वांसाठी धोक्याची घंटा आहे.

श्री.नाना पटोले.....

चोर, डाकू यांचे फोन टॅप करण्याला आमचा विरोध नाही. कारण तसे आपला कायदाच सांगतो. परंतु केंद्रीय यंत्रणेच्या माध्यमातून लोकप्रतिनिधींचे फोन टॅपिंग केले जात असेल तर ती अतिशय गंभीर बाब आहे. सार्वजनिक आणि सामाजिक जीवनातून सर्वांना बरबाद करण्याचे काम या लोकशाही व्यवस्थेत होत असेल तर याची गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता आहे. शेवटी केंद्रीय तपास यंत्रणेच्या माध्यमातून प्रत्येकाचे व्यक्तीस्वातंत्र्य हिरावून घेण्याचे काम केंद्र सरकार करीत असेल तर ती अतिशय गंभीर बाब आहे. या बाबी आपण पाहत आहोत. काल देखील आपणास त्याच पध्दतीची धमकी देण्यात आली. तुमचा भुजबळ करुन टाकू, तुमचा अनिल देशमुख करुन

असुधारित प्रत

टाकू अशा प्रकारच्या धमक्या सभागृहामध्ये कशाच्या आधारे दिल्या जातात ? आपण या ठिकाणी लोकांचे प्रश्न मांडतो, लोकांसाठी काम करतो. या ठिकाणी आपण सहजतेने तीस-पस्तीस वर्षे प्रतिनिधीत्व करीत नसतो. त्यासाठी आयुष्य वेचावे लागते, दिवस-रात्र एक करावी लागते. अशा परिस्थितीत येथे आल्यानंतर सभागृहामध्ये धमक्या देणे, तशी परिस्थिती निर्माण करणे, येथे जास्त बोलाल तर तुमच्याविरुध्द ईडी, सीबीआय लावू असे म्हणणे ही अतिशय गंभीर बाब आहे.

अध्यक्ष महोदय, या बाबीला एवढया सोप्या पध्दतीने घ्यायचे असेल तर मला वैयक्तिक काही अडचण नाही. परंतु मला असे वाटते की, सभागृहाने या एकंदर विषयावर गांभीर्याने विचार करण्याची हीच वेळ आहे. मला माहिती होते की आपले काहीच नाही, त्यामुळे मी घाबरलो नाही. परंतु इतर कोणाच्या बाबतीत थोडे-फार उलटेपालटे झाले तर त्याला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. त्यामुळे मला असे वाटते की, भुजबळ करुन टाकू, अनिल देशमुख करुन टाकू अशा धमक्यांना गांभीर्याने घ्यावे. तशी माझी सरकारला विनंती आहे.

**तालिका सभाध्यक्ष :** ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.नाना पटोले यांच्या आग्रहानुसार वरिष्ठ नेत्यांनी यासंदर्भात एकदा एकत्रित येऊन चर्चा करावी.

असुधारित प्रत

श्री.अस्लम शेख : अध्यक्ष महोदय, ज्यावेळी विधानसभा सदस्य विधीमंडळामध्ये प्रवेश करतात त्यावेळी प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षकांकडून कोविड आरटीपीसीआर चाचणीचा निगेटिव्ह अहवाल आहे किंवा कसे हे पाहिले जाते. एवढी चांगली सुरक्षाव्यवस्था असताना विधीमंडळामध्ये स्पीकर, माईक आत आणले जाणे ही बाब सुरक्षाव्यवस्थेचा फार मोठा लॅप्स आहे व ते आपल्याला नाकारता येणार नाही. यापूर्वी देखील अशीच एक घटना झाली होती. एका सन्माननीय सदस्यांनी केवळ दाखविण्यासाठी का असेना परंतु विधीमंडळामध्ये पिस्तुल घेऊन प्रवेश केला होता. सरकार कोणाचेही असुद्या परंतु सुरक्षा व्यवस्थेमध्ये एवढे मोठे लॅप्स असतील तर विधीमंडळामध्ये पुढे फार मोठया घटना घडू शकतात, हे आपल्याला नाकारता येणार नाही.

अध्यक्ष महोदय, काल १२ सन्माननीय सदस्यांचे निलंबन करण्यात आले आहे. त्यावरुन विधान परिषदेचे माननीय विरोधी पक्षनेते खुलेआम सांगत आहेत की, आम्ही राज्यात हजारपेक्षा जास्त ठिकाणी आंदोलन करु. एके बाजूला कोरोनाचा प्रसार वाढू नये यासाठी सरकार या नात्याने आपण लोकांना पूर्णवेळ धंदे, व्यवसाय करु देत नाहीत. आपण त्यांना ठरवून दिलेल्या लेव्हलप्रमाणेच दुकाने, व्यवसाय उघडण्याची परवानगी दिलेली नाही.

असुधारित प्रत

परंतु दुसऱ्या बाजूला मात्र अशा प्रकारे कोरोनाचा प्रसार होईल अशी कृत्ये केली जात असतील तर मला वाटते की ते योग्य ठरणार नाही. त्यामुळे जेथे कुठे अशा प्रकारे हे फालतु आंदोलन करीत असतील त्यांच्यावर सरकार या नात्याने आपण कडक कारवाई केली पाहिजे.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन

श्री. प्रताप सरनाईक (ओवळा-माजिवडा) : अध्यक्ष महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत जी चौकशी सुरू आहे त्याचा प्रताप सरनाईक हा देखील एक भाग आहे. कारण या ठिकाणी चर्चा सुरू असताना काही सन्माननीय सदस्यांची नावे घेतली गेली. त्यामध्ये माननीय श्री. छगन भुजबळ, श्री. अनिल देशमुख यांची नावे घेतली गेली. मात्र माझे नाव घेण्यात आले नाही. मी सांगू इच्छितो की, प्रताप सरनाईक सुध्दा त्यातील एक नाव आहे आणि मी गेल्या ७ महिन्यांपासून तपास यंत्रणेला सामोर जात आहे. मी या संदर्भात कालच माननीय गृहमंत्री महोदयांना एक पत्र दिले. कारण आघाडी सरकार स्थापन झाल्यानंतर प्रताप सरनाईक यांचा खारीचा वाटा आहे. कारण मी सत्ताधारी पक्षाचा आमदार आहे. एमएमआरडीएमध्ये सुरक्षा रक्षक पुरविण्याकामी करोडो रुपयांचा घोटाळा झाला असा आरोप माझ्यावर करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या गृह विभागात आर्थिक गुन्हे अन्वेषण विभाग कार्यरत आहे. या आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामध्ये एक गुन्हा दाखल झाला की,

असुधारित प्रत

एमएमआरडीएमध्ये असा असा प्रकारचा घोटाळा झालेला आहे. त्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेचा तपास नंतर ईडीने स्वत:कडे घेतला. आर्थिक गुन्हे शाखेमध्ये तो घोटाळा झालेला आहे की नाही याची तपासणी करणे राज्य सरकारची जबाबदारी आहे आणि एमएमआरडीए हा विभाग सुध्दा राज्य सरकारच्या अखत्यारित आहे. मी सत्ताधारी पक्षाचा आमदार आहे आणि माझ्यावर अशा प्रकारचे आरोप होत असताना कदाचित ते राज्य सरकारवर सुध्दा आरोप होत आहेत. त्यामुळे मी काल गृह मंत्री महोदयांना पत्र दिले आणि सांगितले की, शेवटी माझ्यावर आरोप होतात, मी सत्ताधारी शिवसेना पक्षाचा आणि महाविकास आघाडी सरकारचा एक घटक आहे. त्यातून राज्य सरकारची सुध्दा कुठे तरी बदनामी होते. कारण मी घोटाळा केला असा माझ्यावर आरोप असून त्या दृष्टीने माझी चौकशी सुरू आहे.

श्री. प्रताप सरनाईक.......

अध्यक्ष महोदय, मी माननीय गृह मंत्री महोदयांना या सभागृहाच्या माध्यमातून विचारु इच्छितो की, मी त्यांना काल जे पत्र दिले आहे की, आपण त्या आर्थिक गुन्हे शाखेकडून अहवाल मागवून घ्यावा. प्रताप सरनाईक यांनी

घोटाळा केला असेल तर प्रताप सरनाईक गजाआड जायला पाहिजे, त्याला शिक्षा व्हायलाच पाहिजे. परंतु जर घोटाळा केला नसेल किंवा घोटाळा झाला नाही असे जर आर्थिक गुन्हे शाखेकडे कागदपत्रे जमा झाली असतील किंवा त्यांचा तपास पूर्ण झाला असेल तर त्या शाखेने त्याबाबतचा अहवाल गृह विभागाकडे सादर केला पाहिजे आणि गृह विभागाने तो अहवाल लोकांपर्यंत पोहोचविला पाहिजे, जेणेकरुन प्रताप सरनाईक त्यात आरोपी आहे काय, त्यांनी घोटाळा केला आहे काय, आणि घोटाळा केला असेल तर त्याला शिक्षा दिली जाईल आणि जर नसेल केला तर त्याला गृह खात्याच्या वतीने आणि या महाविकास आघाडी सरकारच्या वतीने क्लीन चिट दिली पाहिजे, अशी माझी मागणी आहे आणि ती आपण पूर्ण करणार आहात काय ?

श्री. नाना पटोले : अध्यक्ष महोदय, जसा आता सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत ईडी असो की फोन टॅपिंग असो याबाबत माझी मुख्यमंत्री महोदयांनी अशी विनंती आहे की, त्यांनी माननीय गृह मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची एक उपसमिती नेमून या व्यवस्थेला आपल्याला कसे नियंत्रणात आणता येईल त्याबाबत कार्यवाही केली तर मला वाटते दबाव तंत्राची व्यवस्था

असुधारित प्रत

निर्माण करण्याचे जे पाप विरोधकांकडून केले जाते त्याला आपल्याला थांबविता येईल, एवढीच माझी सूचना आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील (गृह मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रताप सरनाईक यांनी मला काल भेटून आता त्यांनी येथे सभागृहात जे कथन केले त्या संदर्भात निवेदन मला दिलेले आहे. कालच त्याच्यावर मी कार्यवाही करुन ईओडब्ल्यूच्या मार्फत त्यांच्याकडे काही केसेस प्रलंबित आहेत काय किंवा त्यामध्ये काही आहे काय, त्याबाबत सूचना दिल्या आहेत आणि एमएमआरडीएचा विषय गृह खात्यांतर्गत नसला तरी एमएमआरडीएकडून सुध्दा अशी माहिती मागविण्याच्या

श्री. दिलीप वळसे पाटील.....

संदर्भात सूचना दिल्या आहेत. ती माहिती प्राप्त झाल्यावर त्याबाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल आणि सन्माननीय सदस्यांना त्यानुसार कळविले जाईल.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** नियम स्थगित ठेवणे

**मु.शी. :** नियम स्थगित ठेवण्याबाबत माननीय उप मुख्यमंत्री
तथा वित्त मंत्री यांचा प्रस्ताव.

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानसभा नियम ५७ अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदानाच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २६० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून एकमताने संमत झाला.

-------

असुधारित प्रत

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री ) : अध्यक्ष महोदय, आज कामकाजपत्रिकेबाबत एक शुध्दिपत्रक काढलेले आहे आणि त्यामध्ये पणन विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि कृषी विभाग या विभागांचे विधेयके सभागृहासमोर मांडावयाची आहेत.

असुधारित प्रत

**पू. शी. :** अनुदानाकरिता पुरवणी मागण्या

**मु. शी. :** सन २०२१-२०२२ या वर्षाच्या अनुदानाकरिता
पुरवणी मागण्या :

(१) सामान्य प्रशासन विभाग
(२) गृह विभाग
(३) महसूल व वन विभाग
(४) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग
(५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
(६) नगरविकास विभाग
(७) वित्त विभाग
(८) सार्वजनिक बांधकाम विभाग
(९) जलसंपदा विभाग
(१०) विधी व न्याय विभाग
(११) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
(१२) ग्रामविकास विभाग
(१३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
(१४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
(१५) नियोजन विभाग

असुधारित प्रत

(१६) सार्वजनिक आरोग्य विभाग
(१७) वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग
(१८) आदिवासी विकास विभाग
(१९) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
(२०) उच्च व तंत्र शिक्षण विभाग
(२१) महिला व बालविकास विभाग
(२२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
(२३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग
(२४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
(२५) अल्पसंख्यांक विकास विभाग
(२६) मराठी भाषा विभाग
(२७) इतर मागास बहुजन कल्याण विभाग

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव) :** आता (१) सामान्य प्रशासन विभाग, (२) गृह विभाग, (३) महसूल व वन विभाग, (४) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, (५) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, (६) नगरविकास विभाग, (७) वित्त विभाग, (८) सार्वजनिक बांधकाम विभाग, (९) जलसंपदा विभाग,

असुधारित प्रत

(१०) विधी व न्याय विभाग, (११) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, (१२) ग्रामविकास विभाग, (१३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, (१४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, (१५) नियोजन विभाग, (१६) सार्वजनिक आरोग्य विभाग, (१७) वैद्यकीय शिक्षण व औषधि द्रव्ये विभाग, (१८) आदिवासी विकास विभाग, (१९) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, (२०) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, (२१) महिला व बालविकास विभाग, (२२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, (२३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, (२४) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, (२५) अल्पसंख्यांक विकास विभाग, (२६) मराठी भाषा विभाग, (२७) इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाच्या पुरवणी मागण्या चर्चेला घेण्यात येतील विभागांच्या मागण्यांचा तपशील सदस्यांना टपालखणाद्वारे (पिजन होल) वितरित करण्यात आल्या आहेत. कपात सूचना देण्याची मुदत सोमवार, दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात आलेली असल्याने मान्य कपात सूचनांची यादी सदस्यांना स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल.

असुधारित प्रत

या चर्चेसाठी चर्चारोधापर्यंत वेळ उपलब्ध आहे. यापैकी सत्तारुढ पक्षास संबंधित मंत्र्यांच्या उत्तरासह निम्मा वेळ व विरोधी पक्षास निम्मा वेळ देण्यात येईल. सदस्य वेळेचे बंधन पाळून मला सहकार्य करतील, अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. आता चर्चेला सुरूवात होईल.

**तालिका सभाध्यक्ष.....**

आता सभागृहातील परिस्थिती आपल्याला माहिती आहे. पण तरी देखील माझ्या डाव्या बाजूला सभागृहामध्ये काही सन्माननीय सदस्य बसलेले आहेत. सर्वसाधारणपणे अशी चर्चा विरोधी पक्ष सुरू करतो. म्हणून मी या बाजूच्या सन्माननीय सदस्यांना प्रथम बोलण्याची संधी देतो.

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे आणि सर्वांना समान संधी देऊन करायचे ठरलेले असल्यामुळे त्यानुसार मी कामकाज घेत आहे.

(सत्तारुढ पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

सत्तारुढ पक्षाच्या वतीने कोणते सन्माननीय सदस्य भाषण करणार आहेत ?

असुधारित प्रत

यानंतर श्रीमती कोळगिरे......

असुधारित प्रत

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१-२२ या वर्षातील बाब क्र. १ ते १६८ मधील २३,१४९ कोटी ७५ लाख ३१ हजार रुपये इतक्या रकमेच्या पुरवणी मागण्या मंजुरीसाठी एकत्रितरित्या सभागृहासमोर मांडत आहे.

**तालिका सभाध्यक्ष (श्री. भास्कर जाधव)** : आता मी सन २०२१-२२ च्या पुरवणी मागण्यांवरील सामान्य प्रशासन विभाग, गृह विभाग, महसूल व वन विभाग,कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नगरविकास विभाग, वित्त विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग,विधी व न्याय विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास विभाग, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, नियोजन विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषध द्रव्ये विभाग, आदिवासी विकास विभाग, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महिला व बालविकास विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, पर्यटन व सांस्कृतिक कार्य

असुधारित प्रत

विभाग, अल्पसंख्यांक विकास विभाग, मराठी भाषा विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक ए-६, बी-१, बी-२, बी-४, बी-५, बी-७, बी-१०, सी-७, डी-३, डी-४, डी-६, डी-८, ई-२, एफ-२, एफ-३, एफ-५, जी-२, एच-३, एच- ५, एच-६, एच-७, एच-८, आय-५, जे-१, के-६, के-११, एल-२, एम-२, एन-३, एन-४, ओ-२, ओ-३, ओ-१४, ओ-२०, ओ-२६, ओ-३६, ओ७४, ओ-१०, ओ-२१, ओ-२७, ओ-३७, ओ-७५, आर-१, आर-३, एस-१, एस-४, टी-५, टी-६, व्ही-२, व्ही-३, डब्ल्यू-२, डब्ल्यू-४, एक्स-१, वाय-२, झेडए-४, झेडडी-२, झेडई-२, झेडएफ-१, झेडजी-४ आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

----------

असुधारित प्रत

**पृ.शी.** :अनुदानाकरिता पुरवणी मागण्या

**मु.शी. :** सन २०२१-२२ च्या अनुदानाकरिता पुरवणी मागण्या : चर्चारोधानंतरचे विभाग

**तालिका सभाध्यक्ष** : आता मी चर्चारोधानंतर असलेल्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागण्या क्रमांक -

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय झेडसी-१, झेडसी-२

आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेसोबतच्या सूचित दर्शविल्याप्रमाणे एकत्रितपणे मतास टाकतो.

मागण्या मतास टाकून संमत झाल्या.

(**प्रेस** : सोबत जोडलेले मागण्याचे जोडपत्र छापावे.)

------

असुधारित प्रत

**पृ.शी.** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील प्रलंबित परिक्षांचे निकाल

जलदगतीने लावण्याबाबत.

**मु.शी.** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील प्रलंबित परिक्षांचे निकाल

जलदगतीने लावण्याबाबत या विषयावर माननीय उप

मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. अजित पवार(उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४७ अन्वये पुढील निवेदन मांडतो.

अध्यक्ष महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांसोबत रविवारी मंत्रीमंडळाची बैठक होती त्या बैठकीमध्ये एमपीएससीच्यासंदर्भात काही चर्चा झाली. त्या चर्चेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले की, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संध्याकाळी मी, चिफ सेक्रेटरी आणि संबंधीत अधिकारी यांची बैठक घेऊन राज्यामध्ये साधारण किती रिक्त पदे आहेत त्याबाबत राज्य शासनाचे ताबडतोब भरती करावी.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, दि.५.७.२०२१ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडील प्रलंबित परीक्षांचे निकाल जलद गतीने लावण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात जो निर्णय झाला त्यामध्ये तो असा आहे की, प्रलंबित परीक्षांचे निकाल जलद गतीने पूर्ण करण्यासाठी उपाययोजनाबाबतचे ठोस निर्णय घेण्यात आले. त्यावेळी ज्या विभागाची रिक्त पदे भरणे आवश्यक आहे, अशा विभागांची पदे भरण्यास मान्यता देण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या. त्यानुषंगाने अपर मुख्य सचिव (वित्त) यांनी ज्या विभागांनी त्यांची पदे भरणे असल्याने पदभरतीस मान्यता देण्याचे प्रस्ताव वित्त विभागास सादर केले. अशा प्रस्तावांना वित्त विभागाने मान्यता दिली असून त्यानुसार सन २०१८ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणाऱ्या विविध संवर्गातील खालील रिक्त पदांच्या भरतीस मान्यता देण्यात आलेली आहे :

गट-अ - ४४१७ पदे

श्री. अजित पवार....

गट-ब - ८०३१ पदे

गट-क - ३०६३

एकूण - १५५११

असुधारित प्रत

तरी वरीलप्रमाणे १५,१११ इतकी पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेनुसार, सदर पदांचे आरक्षण तपासून ती पदे भरण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

------

असुधारित प्रत

**पृ.शी**. : जिल्हा परिषद निवडणुका पुढे ढकलण्याबाबत.

**मु.शी**. : जिल्हा परिषद निवडणुका पुढे ढकलण्याबाबत या विषयावर

मानिनीय उप मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम ४७ अन्वये पुढील निवेदन मांडतो.

अध्यक्ष महोदय, जिल्हा परिषदेच्या निवडणुकांच्या याचिकांबाबत आज सर्वोच्च न्यायालयामध्ये सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाने कोव्हिडच्या पार्श्वभुमीवर जिल्हा परिषद निवडणुका पुढे ढकलण्यात याव्यात किंवा कसे याबाबतचा निर्णय माननीय राज्य निवडणूक आयोगाने घ्यावा असे निर्देश दिलेले आहेत. त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांनासूचना देवून राज्य निवडणूक आयोगाला पत्र देवून पुढील कार्यवाही करण्यास सांगितले आहे, हे मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यायचे आहे.

------

असुधारित प्रत

## पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनसंबंधी

श्री अबू आजमी : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है. आपने मुझे मुझे बोलने के लिए मौका दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं. मैं आपका बहुत ज्यादा शुक्रगुजार हूं.

अध्यक्ष महोदय, मेरी इतनी ही विनती थी कि हमारे मानखुर्द-शिवाजीनगर एरिया में एक बड़ा ब्रिज बन रहा है. हम लोगों ने नियम के अनुसार महानगरपालिका में एक मांगी की थी कि हजरत ख्वाजा गरीब नवाज रहिमतुल्ला, हालांकि ये ताजदार-ए-हिंद है. केवल भारत के लोग ही नहीं तो पूरी दुनिया के लोग, सब हिंदू-मुस्लिम उनको मानते है. मैं छत्रपति शिवाजी महाराज जी का बहुत सम्मान करता हूं. महाराष्ट्र और भारतवर्ष में उनसे बड़ा और कोई हो नहीं सकता. मेरा और मेरे इलाके के लोगों का नम्र निवेदन है. मेरे पास कई महीनों से तमाम लोग रोज आ रहे है. कॉंग्रेस के पास, शिवसेना के पास, बीजेपी के पास, एनसीपी के पास, सब के पास जाकर इन लोगों ने विनती की है कि उस ब्रिज का नाम "ख्वाजा गरीब नवाब रहिमतुल्ला" के नाम से रखा जाए और आगे जो नई मुंबई आती है उसका नाम शिवाजी महाराज के नाम से रख दिया जाए. इसी तरह रायगढ़ का नाम संभाजी महाराज के नाम

अमुद्रित प्रत

से रख दिया जाए. यह मेरा प्रपोजल है. मुझे उम्मीद है कि इस प्रपोजल को मान्यता दी जाएगी. हमने कानून के मुताबिक महानगरपालिका में मांग की है. मेरा विनम्र निवेदन है कि इस प्रपोजल को मान्यता दे दी जाए. इसके लिए मैं आपका बहुत आभार प्रकट करुंगा. धन्यवाद.

**तालिका सभाध्यक्ष :** शासनाने त्याची नोंद घ्यावी.

---------

श्री मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है. आपने मुझे सदन में बोलने का मौका दिया, उसके लिए मैं आपका शुक्रगुजार हूं. मैं मालेगाव से ताल्लुक रखता हूं.

अध्यक्ष महोदय, पूरे हिंदुस्थान में, संपूर्ण देश में २६ लाख पावरलूम है. जिनमें तकरीबन १८ लाख पावरलूम हमारे महाराष्ट्र में है. आज इस विषय के संबंध में मैं अपनी बात आपके माध्यम से सदन में रखना चाहता हूं. तकरीबन १८ लाख पावरलूम महाराष्ट्र में है. कपास का उत्पादन महाराष्ट्र में होता है और ये कपास यार्न में तैयार होने के लिए तमिलनाडू में जाता है. कपास यार्न में तैयार होने के

असुधारित प्रत

बाद वह फिर से महाराष्ट्र आता है. उसमें ट्रान्सपोर्ट का खर्च □ड हो जाता है. स्पीनिंग मिल का जो नफा है वह उसमें शामिल हो जाता है. इससे यार्न काफी महंगा हो जाता है. महाराष्ट्र में जितने लोग पावरलूम से जुड़े हुए है, वे महंगा यार्न खरीदते है और उसके बाद कच्चा कपड़ा तैयार होता है. यह कपड़ा राजस्थान और गुजरात जाता है. वहां उस कपड़े की प्रोसेसिंग और डाईंग होती है. उसके बाद वह कपड़ा फिर से महाराष्ट्र में आता है. तब उसका रेट बहुत ज्यादा हो जाता है. यदि महाराष्ट्र में स्पीनिंग मिल कायम की जाए तो यार्न महाराष्ट्र में बनेगा. अगर प्रोसेसिंग हाऊस महाराष्ट्र में होगा तो कपड़े की प्रोसेसिंग महाराष्ट्र में होगी. इससे महाराष्ट्र में कपड़े पर जो लागत आएगी वह तमिलनाडू, गुजरात और राजस्थान से काफी कम होगी. आज पावरलूम क्षेत्र मंदी से बहुत ज्यादा बेजार है. हालात कुछ इस तरह के है कि यार्न बहुत महंगा है. महाराष्ट्र में बिजली महंगी है. आज पावरलूम उद्योग मंदी का शिकार है. मालेगाव में तकरीबन ३ लाख पावरलूम है. आज सारे पावरलूम बंद है. ५ लाख मजदूर बेरोजगार है. सरकार ने लॉकडाऊन की वजह से जो योजना बनायी थी कि रिक्शा चालकों को, मालिक को १५०० रुपया दिया जाएगा. उसी तरह पावरलूम मजदूरों के लिए सरकार की ओर से कोई योजना बनाकर मदद की जानी चाहिए. लॉकडाऊन और मंदी के

कारण पावरलूम उद्योग बहुत ज्यादा बेजार है. इसलिए उनको भी मदद मिलनी चाहिए. मैं सरकार से

श्री मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक.....

यह कहना चाहता हूं कि पावरलूम उद्योग की ओर ध्यान दिया जाना चाहिए और इस सिलसिले में जो भी योजना बन सकती है वह बनायी जानी चाहिए, ताकि यह उद्योग जिंदा रह सके. धन्यवाद.

------

....यानंतर

कु.गिरप

असुधारित प्रत

काही सन्माननीय सदस्य : अध्यक्ष महोदय, ...

**तालिका सभाध्यक्ष** : मी काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याकरिता संधी देणार आहे. परंतु, तत्पूर्वी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनियोजन विधेयक मांडावयाचे आहे. आपल्याला ते येथे संमत करुन विधानपरिषद सभागृहात पाठवावे लागेल. तेथून आल्यानंतर पुन्हा येथे घोषणा करावी लागेल. त्यामुळे उप मुख्यमंत्री महोदय आपण आपले विधेयक मांडावे.

...........

असुधारित प्रत

**पृ.शी. :** (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक

**L.A. BILL NO. XVI OF 2021**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES AND PURPOSES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2022.)

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १६ - दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या सेवांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०७, खंड

असुधारित प्रत

(१) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १६ सभागृहासमोर मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १६ - दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी संपणाऱ्या वर्षाच्या सेवांसाठी व प्रयोजनांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

असुधारित प्रत

खंड २ व ३, अनुसूची, विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १६ संमत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १६ संमत झाले आहे.

...............

असुधारित प्रत

**पृ.शी. :** शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. XVII OF 2011**

(A BILL TO AMEND THE FARMERS (EMPOWERMENT AND PROTECTION) AGREEMENT ON PRICE ASSURANCE AND FARM SERVICES ACT, 2020, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. दादाजी भुसे (कृषि मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२१ चे वि. स. वि. क्रमांक १७ - शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : अनुमती देण्यात आली आहे.

असुधारित प्रत

श्री.दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि. स. वि. क्रमांक १७ मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

..............

असुधारित प्रत

**पृ.शी. :** शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. XVIII OF 2021.**
(TO AMEND THE FARMERS PRODUCE TRADE AND COMMERCE (PROMOTION AND FACILITATION) ACT, 2020, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री. बाळासाहेब पाटील (पणन मंत्री) : अध्यक्ष महोदय, सन २०२१ चे वि. स. वि. क्रमांक १८ - शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभाध्यक्ष** : अनुमती देण्यात आली आहे.

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि. स. वि. क्रमांक १८ मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष** : विधेयक मांडण्यात आले आहे.

..............

असुधारित प्रत

**सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १७ व १८ बाबत**

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, ...

**तालिका सभाध्यक्ष** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आता विधेयक केवळ पुर:स्थापन करण्यात येत आहेत. विधेयके मंजूर करताना आपण त्यावर चर्चा करु.

श्री.बाळासाहेब थोरात : अध्यक्ष महोदय, कृषी विभाग, पणन विभाग व अन्न, नागरी पुरवठा विभाग या ३ विभागांची ही बिले आहेत. केंद्र सरकारने जे ३ कायदे केले त्यामध्ये सुधारणा सुचविणारी ही ३ विधेयके आपण आणलेली आहेत. त्यामध्ये शेतकऱ्याच्या बाजूचे .... केंद्र सरकारचे जे कायदे आहेत ते शेतकऱ्यांना अडचणीत आणणारे, शेतकऱ्याच्या हिताच्या विरोधातील आहेत. आपण त्यामध्ये सुधारणा सुचवित आहोत. या सुधारणा सुचवून आपण हे बिल जनतेकरिता ओपन करीत आहोत. आपण ज्या सुधारणा सुचवित आहोत त्या जनतेला ओपन करीत आहोत की, त्यात आणखी बदल आवश्यक असतील तर ते बदल तुम्ही आम्हाला २ महिन्यांमध्ये कळवावेत. अशा प्रकारे ३ विधेयके आज मांडण्यात येणार आहेत.

**तालिका सभाध्यक्ष :** मंत्री महोदय, यामध्ये दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतु, आपण आता या

असुधारित प्रत

विधेयकावर विचार, खंडश: विचार करीत नाही तर ही विधेयके केवळ पुर:स्थापन केली जात आहेत. ती पुर:स्थापन केल्यानंतर आपण जेव्हा त्या विधेयकांवर विचार, खंडश: विचार करण्यास सुरुवात करु त्यावेळेस आपण या डिटेल्सबाबत बोलू. तसेच, त्यांच्यावर ज्या सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे त्यांनाही आपण बोलू देऊ. मंत्री महोदय आता आपण या विषयावर बोलू नका.

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, मला या विधेयकावर २ मिनिटे बोलावयाचे आहे.

**तालिका सभाध्यक्ष** : मंत्री महोदय २ मिनिटे कशाला आपण या विधेयकांवर मंजुरीच्या वेळेस पूर्ण बोलणारच आहोत. आता दुसरा काही कार्यक्रम नाही आपण नंतर विधेयकांवरच बोलणार आहोत.

श्री.अजित पवार : अध्यक्ष महोदय, माननीय ज्येष्ठ मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी या विधेयकांबाबत थोडीशी कल्पना दिली आहे. केंद्रामध्ये गेले ७ महिने भारतातील अनेक शेतकरी उपोषण करीत आहेत. आंदोलन करीत आहेत. मागण्या करीत आहेत. परंतु, तेथे त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही, अशा प्रकारची परिस्थिती आहे. केंद्र सरकारने आणलेल्या बिलाला माननीय सर्वोच्च न्यायालयाने सध्या स्थगिती दिलेली आहे. महाविकास

असुधारित प्रत

आघाडी सरकारच्या शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस या तिन्ही पक्षांची अशी भूमिका आहे की, या विधेयकामध्ये काही दुरुस्त्या सुचवित असताना त्यामध्ये ...

नंतर श्री.शिंदे ...

असुधारित प्रत

श्री.अजित पवार...

शेतकरी विरोधी ज्या बाबी होत्या त्यासंदर्भात तिन्ही विधेयकामध्ये दुरुस्त्या सुचविण्यात येत आहेत. त्यामध्ये एक विधेयक अन्न व नागरी पुरवठा विभागाचे आहे, दुसरे विधेयक पणन विभागाचे आहे व एक विधेयक कृषि विभागाचे आहे. शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे, त्यांचे शेत मालाचे पैसे वेळेवर मिळाले पाहिजेत, त्यांच्या मालाला आधारभूत किंमत मिळाली पाहिजे, अशा वेगवेगळया प्रकारच्या बाबी उक्त विधेयकांमध्ये नमूद आहेत. एक गोष्ट खरी आहे की, राज्य सरकारकडून आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी तिन्ही विधेयके सभागृहामध्ये मांडण्यात येत आहेत. सदरहू विधेयके जनतेला चर्चेकरिताही खुली ठेवण्यात आली आहेत. सदरहू विधेयकांच्या संदर्भात शेतकऱ्यांचे, त्यांच्या संघटनांचे काही म्हणणे असू शकते ते २-३ महिन्यात मांडण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यांचे म्हणणेही शासनाला प्राप्त होईल. सदरहू विधेयकाची माहिती मंत्री महोदय २-५ मिनिटांमध्ये विषद करतील. त्यामुळे या विधेयकाचा विषय राज्यातील जनतेला व शेतकऱ्यांना सभागृहाच्या माध्यमातून समजेल. त्यामध्ये शेतकऱ्यांना आणखी विधायक सूचना करता येतील. कोकण, विदर्भ, मराठवाडा,

असुधारित प्रत

पश्चिम महाराष्ट्र व खान्देशातील शेतकरी यांचे प्रश्न वेगवेगळे आहेत. पणन विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना त्यांचा माल कोठे विक्री करता येईल, या विषयाला अनेक कांगोरे आहेत. आज उक्त विधेयकांवर कोणतीही चर्चा करण्यात येणार नाही. सदरहू विधेयके आज टेबल करण्यात येत असून त्या संदर्भात जनतेच्या सूचना स्वीकारण्यासाठी २ महिन्यांची मुदत देण्यात येत आहे. त्यानंतर नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये उक्त विधेयकावर चर्चा करुन त्यांना अंतिम स्वरुप देण्यात येईल.

**तालिका सभाध्यक्ष (श्री.भास्कर जाधव)** : सदरहू विधेयकांच्या संदर्भातील स्पष्टता सुरुवातीला करावयास पाहिजे होती. म्हणजे विधेयक क्रमांक १७ पासून खुलासा करण्यास मंत्री महोदयांना अनुमती देता आली असती. सन्माननीय सदस्य श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे म्हणणे देखील बरोबर आहे. मंत्री महोदयांना सांगू

**तालिका सभाध्यक्ष...**

इच्छितो की, सदरहू विधेयकांवर विचार, खंडश: विचार करणे म्हणजे माझा समज होता की, उक्त विधेयके आजच मंजूर करावयाची आहेत. त्यामुळे मी मंत्री महोदयांना

असुधारित प्रत

विधेयक इंट्रोड्यूस करण्यास सांगितले व चर्चेच्या वेळी सभागृहातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात येईल, असे म्हणालो होतो. सरकार म्हणून या विधेयकाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला काय देण्यात येत आहे, यासंदर्भातील महत्त्वाचे मुद्दे मंत्री महोदयांनी सांगावेत.

**(अध्यक्षस्थानी माननीय उपाध्यक्ष)**

श्री.बाळासाहेब पाटील : अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये कृषी व पणन कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी मुंबई कृषि उत्पन्न अधिनियम, १९३९ अस्तित्वात होता. मध्य प्रांत व वऱ्हाड, कापूस बाजार अधिनियम, १९३९ हा अस्तित्वात होता. तसेच हैद्राबादचा फसली अधिनियम, १९३९ अस्तित्वात होता. या कायद्यांमध्ये बदल करणे आवश्यक होते. कारण त्यानंतरच्या काळामध्ये शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग होत होते. त्यावर अभ्यास करण्यासाठी तत्कालीन शासनाने लाड व शिरनामे समिती स्थापन केली होती. सदरहू समितीने सर्व कायद्यांचा अभ्यास केला व राज्यासाठी एकच कायदा अस्तित्वात असावा या उद्देशाने एक कायदा करण्यात आला. सदरहू विधेयक सन १९६३ मध्ये मांडण्यात आले होते व दिनांक ५ मे, १९६४ रोजी त्याला कायद्याचे स्वरुप देण्यात आले. त्याची

असुधारित प्रत

अंमलबजावणी दिनांक २५ मे, १९६७ पासून सुरु करण्यात आली.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाचा मूळ उद्देश आहे की, शेतकऱ्यांनी पिकवलेला माल योग्य रितीने विक्री झाला पाहिजे, त्याची फसवणूक होऊ नये, खरेदीदारीकडून एकत्रित मालाची प्रतवारी ठरविणे सोयीचे व्हावे व चांगल्या दर्जाच्या शेत मालास उत्तेजन मिळावे. मी आपल्या माहितीसाठी एकच आकडेवारी सांगणार आहे.

श्री.बाळासाहेब पाटील...

अध्यक्ष महोदय, राज्यामध्ये एकंदरीत ३०६ कृषि उत्पन्न बाजार समित्या आहेत. उक्त समित्यांच्या मध्यमातून सन २०२०-२१ या कालावधीत सुमारे ४९ हजार कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. तसेच पर्यायी बाजार व्यवस्थेमध्ये १,५०० कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. तसेच ६० खाजगी बाजार समित्यामध्ये ५,२५८ कोटी रुपयांची उलाढाल झाली आहे. राज्य शासनाने थेट पणन लायसन्स ही संकल्पना राबविली असून उक्त लायसन्सधारकांची संख्या १,२६२ इतकी आहे. ६१४ शेतकरी उत्पादक कंपन्या आहेत त्यांची उलाढाल ३,१००

असुधारित प्रत

कोटी रुपये आहे. एकल परवानाधारक ४२ असून त्यांची उलाढाल ७,१९१ कोटी रुपये आहे. सदरहू काम अतिशय व्यवस्थितपणे सुरु आहे. सद्य:स्थितीत बाजार कायद्यानुसार शेत मालाचे योग्य वजन करणे, शेती मालाला वाजवी किंमत देणे व शेतकऱ्यांना शेती माल विक्रीची किंमत वेळेवर अदा करणे ही कार्यवाही करण्यात येते.

अध्यक्ष महोदय, केंद्र शासनाने अन्न धान्य, कृषि व पणन संदर्भात काही नवीन कायदे केले आहेत. यामुळे राज्यात व देशात फार मोठा जनक्षोभ उसळा आहे. दिल्ली येथे मागील ७ महिन्यांपासून शेतकरी बांधवांचे आंदोलन सुरु आहे. सदरहू आंदोलनाच्या ठिकाणी जाऊन राज्यातील व देशातील शेतकरी बांधव पाठिंबा देत आहेत. सदरहू कायद्यामुळे शेतकऱ्यांच्या अधिकारांवर गदा येत आहे, त्यामुळे उक्त आंदोलन सुरु आहे. परंतु त्यांना योग्य तो न्याय देण्यात येत नाही.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने उक्त कायद्यामध्ये बदल करुन पॅनकार्डच्या माध्यमातून लायसन्स घेण्याची तरतूद केली आहे. आज देशामधील कोणत्याही भागातील व्यक्ती देशातील कोणत्याही भागामध्ये जाऊन पॅनकार्ड काढता येत आहे. त्यामुळे लायसन्स धारकाकडून शेतकऱ्यांचा जो माल घेतला जाईल त्याला योग्य दर व पैसे मिळतील याची खात्री नाही. या संदर्भात चर्चा होणे आवश्यक आहे. तसेच

असुधारित प्रत

त्या भागामध्ये कोणतीही यंत्रणा कार्यरत नसल्याने शेतकऱ्याच्या मालास दर्जा कसा

श्री.बाळासाहेब पाटील...

आहे, त्याला आधारभूत किंमत देण्यात येते की नाही, हे सिध्द करता येणार नाही. अशा प्रकारच्या काही अडचणी आहेत. एखादा व्यापारी पळून गेला तर त्याचा शोध कोठे घ्यावा, हा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच त्या व्यक्तीवर कोणती कारवाई करावयाची ? याप्रकरणी केंद्र शासनाच्या कायद्यात सूचविण्यात आले आहे की, संबंधित तहसिलदार किंवा प्रांत अधिकारी यांचेकडे दाद मागावी. परंतु त्यांच्यावर त्यांच्या मुळ महसूल विभागाच्या कामाचा अधिक ताण असल्याने त्यांच्याकडून उक्त प्रकरणी सक्षमपणे कारवाई होऊ शकणार नाही व शेतकऱ्यांना न्याय मिळू शकणार नाही.

अध्यक्ष महोदय, सदरहू कायद्यामध्ये सुधारणे करणे आवश्यक आहे. लायसन्स हे सक्षम यंत्रणेकडून देण्यात आले पाहिजे. सदरहू यंत्रणा संबंधित व्यापारी किंवा अडत्याची सर्व माहिती घेईल व त्यास लायसन्स देईल. या प्रकरणी काही अडचण आली तर दाद कोणाकडे मागावयाची हा

असुधारित प्रत

मोठा प्रश्न आहे. सिस्टमच्या माध्यमातून दाद मागविण्याची कायद्यात तरतूद करण्यात आली आहे.

अध्यक्ष महोदय, एखाद्या शेतकऱ्यास त्याच्या मालाचा मोबदला मिळाला नाही तर संबंधीतास शिक्षा करण्याची तरतूद कायद्यामध्ये असणे गरजेचे आहे व ती छळवणूक कायद्याखाली करणे गरजेचे आहे. त्यानुसार संबंधितास शिक्षा दिली पाहिजे व शेतकऱ्याला ७ दिवसांमध्ये त्याचा मोबदला दिला पाहिजे. तो दिला नाही तर ३ वर्ष व ५ लक्ष रुपये यापेक्षा कमी नसेल एवढी दंडाची तरतूद करण्यात आली आहे. अलिकडील काळात शेतकरी स्वत:च्या शेतीमध्ये निरनिराळे प्रयोग करतो. या माध्यमातून एक किंवा दोन एकर शेती असलेला शेतकरी लाखो रुपयांचे उत्पन्न घेतो.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब पाटील……

शेतकऱ्यांना वेळेवर पैसे मिळाले नाही तर त्यांचे वर्षभराचे अर्थकरण कोलमडून पडेल. त्यामुळे अशा प्रकारचे बदल करणे आवश्यक आहेत. त्यादृष्टीने आज हे विधेयक मांडण्यात आले आहे.

अध्यक्ष महोदय, सन १९६३-६४ सालापासून मार्केट कमिट्यांमुळे शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये आर्थिक परिवर्तन घडून आलेले आहे. भाजीपाला, फळे आणि मसाल्याचे पदार्थ या शेतमालाच्या पणनसाठी कोणत्याही परवान्याची गरज नाही. ग्राहकांना ज्या गोष्टी लागतात त्या वस्तू नियमन मुक्त करण्यात आलेल्या आहेत.

अध्यक्ष महोदय, शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्या ठिकाणी व्यापार चालू केला. अनेकांना गाळे उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. अनेकजण त्या ठिकाणी व्यवसाय करीत आहेत. शेतकऱ्यांना योग्य प्रकारचा न्याय त्या ठिकाणी मिळू शकतो. सर्वांना सक्षमपणे संरक्षण देणे, त्यांचे रक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. म्हणून हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले आहे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, दरम्यानच्या काळात कॅबिनेटमध्ये या विधेयकावर चर्चा करण्यात आली होती. नंतरच्या काळामध्ये काही शेतकरी संघटना जसे की, माजी खासदार श्री.राजू शेट्टी, श्रीमती मेघा पाटकर अशी अनेक मंडळी आम्हाला भेटली. कृषी क्षेत्रामध्ये काम करणारी मंडळी भेटण्यासाठी आली होती. त्या सर्वांनी अशा आशयाचे विधेयक मांडण्याची सूचना केली. कारण देशामध्ये याबाबत फार मोठा असंतोष आहे. या विधेयकासंदर्भात आमची काही मते आहेत, ती मते मांडण्यासाठी आम्हाला काही अवधी द्यावा, अशी त्यांनी विनंती केली होती.

अध्यक्ष महोदय, राज्य शासनाने हे विधेयक आणताना शेतकरी हिताला पहिले प्राधान्य दिलेले आहे. कारण आज आपण देशभरातील शेतकऱ्यांची अवस्था पाहतो आहोत. शेतकऱ्यांसाठी कोणत्याही प्रकारची हमीभावाची यंत्रणा उभी केली जात नाही. फक्त उत्पन्न दुप्पट करणार, तिप्पट करणार, हमी भाव देणार एवढेच सांगितले

श्री.बाळासाहेब पाटील......

जात आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र काहीही केले जात नाही. सात-सात महिन्यांपासून शेतकरी आंदोलने करीत आहेत, हे आंदोलने दडपण्याचे काम केले जात आहे. राज्यामध्ये सुद्धा

अनेक प्रकारे आंदोलने केली जात आहेत. ही आंदोलने देखील दडपण्याचे काम केले जात आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी, त्यांनी पिकवलेल्या मालाला स्वायत्तता देण्यासाठी, त्याला योग्य असा भाव देण्यासाठी हा कायदा करणे आणि त्यामध्ये बदल करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने पारित केलेल्या कृषी कायद्यांना माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. केंद्र सरकारची तिनही कृषी विधेयके शेतकऱ्यांसाठी फायद्याची आहेत काय, याबाबत सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. हे कायदे मागे घेण्यात यावेत, यासाठी दिल्लीमध्ये आंदोलन चालू आहे. सदर आंदोलनामुळे लोकांना ये-जा करण्यासाठी त्रास होतो आहे. त्याबाबतचा विचार करण्यात आलेला नाही. राज्याचे व शेतकऱ्यांचे रक्षण करण्यासाठी शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम,२०२० महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आलेले आहे.

-------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. XIX OF 2021**

(A BILL FURTHER TO AMEND THE ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.छगन भुजबळ (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक-१९ अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

अध्यक्ष महोदय, भारत सरकारने शेतकरी उत्पादनाचे व्यापार आणि वाणिज्य अधिनियम, २०२०, शेतकरी सक्षमीकरण, संरक्षण, आश्वाशित किंमत, शेती सेवा करार अधिनियम, २०२०, आवश्यक वस्तू सुधारणा अधिनियम, २०२० असे कृषी क्षेत्राशी संबंधित तीन अध्यादेश दिनांक ५ जून २०२० ला प्रख्यापित केले होते. या तिनही अध्यादेशाचे रुपांतर अधिनियमात करण्याच्या विधेयकास संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये दिनांक २७/०९/२०२० ला मान्यता देण्यात आली.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, सदर विधेयकांना मान्यता दिल्यानंतर गेल्या वर्षाच्या माहे नोव्हेंबर २०२० पासून दिल्लीच्या दरवाज्यावर लाखो शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. सदर आंदोलन हे खूप मोठे आहे आणि अनेक दिवसांपासून चाललेले आहे. उन्हाळा, पावसाळा, हिवाळा, कोरोना या सगळया पार्श्वभूमीवर आपली लेकरेबाळे घेऊन शेतकरी दिल्लीच्या दरवाज्यावर उभी आहेत.

अध्यक्ष महोदय, अख्ख्या जगाने या आंदोलनाची दखल घेतली. कारण लाखो शेतकरी आंदोलन करीत आहेत. ते त्याच ठिकाणी जेवण करीत आहे, तेथेच झोपत आहेत. पाणी त्यांच्या तंबुमध्ये घुसते आहे. लेकरेबाळे घेऊन शेतकरी उभे राहून आंदोलन करीत आहेत.

श्री.छगन भुजबळ......

अध्यक्ष महोदय, कोरोना आल्यानंतर अमुक करा तमुक करा असे आपण करीत आहोत. पण सदर आंदोलनातील जवळपास २०० लोक कोरोनामुळे आणि इतर रोगांमुळे दगावलेले आहेत. दुर्दैवाने कोणी आत्महत्या केली तर आपण त्याच्याप्रती किती संवेदना प्रगट करतो. ताबडतोब चौकशी करतो. जे कोणी गुन्हेगार असतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे आपण आदेश देतो आणि त्यानुषंगाने

कार्यवाही केली जाते. असे असताना या आंदोलनातील २०० पेक्षा जास्त लोकांचा बळी गेला. कदाचित यापेक्षाही जास्त जणांचा बळी गेला असेल. दुर्दैव असे आहे की, काही दिवस मंत्री महोदय यायचे आणि केवळ चर्चा व्हायची. हा खेळ महाराष्ट्राने, संपूर्ण देशाने आणि जगाने पाहिला आहे. शेतकऱ्यांनी भेटण्यासाठी आत जाऊ नये म्हणून केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या रस्त्यामध्ये मोठमोठे खिळे पेरले होते. हा प्रकार लोकशाहीला काळिमा लावणारा होता. अख्ख्या जगाने या बाबीची नोंद घेतली. त्यानंतर केंद्र सरकारवर टीका होऊ लागल्यामुळे रस्त्यात पेरले गेलेले खिळे बाहेर काढण्यात आले.

अध्यक्ष महोदय, सन १९७१ सालचा दुष्काळ मी पाहिलेला आहे. या देशामध्ये खायला अन्न नव्हते हे मी स्वत: पाहिलेले आहे. अमेरिकेहून महाराष्ट्रामध्ये येणारा तो लाल गहू मी पाहिलेला आहे आणि तो खाल्लेला देखील आहे. याच राज्याचे स्वर्गीय मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांनी सांगितले की, मी ही परिस्थिती बदलून टाकीन नाही तर मला चव्हाट्यावर फाशी द्या. गावागावामध्ये गेले. हायब्रीडचे बियाणे निर्माण केले, तसेच नवनवीन बियाणे तयार करुन शेतकऱ्यांना देण्यात आले. तत्कालीन शासनाने शेतकऱ्यांना साथ दिली व शेतकऱ्यांनी मेहनत करुन मोठ्या प्रमाणावर धान्य उगविले. त्यानंतर तीच कृषी क्रांती सुरू

असुधारित प्रत

राहिली. युपीए सरकारच्या काळामध्ये तत्कालीन माननीय प्रधानमंत्री श्री.मनमोहन सिंग, माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले. तेव्हा हमीभाव दुप्पट, तिप्पट, चारपट वाढवून देण्यात आला. याचा परिणाम असा झाला की, संपूर्ण देशात काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत एवढे अन्नधान्य पिकविण्यात आले की,

श्री.छगन भुजबळ......

सव्वाशे कोटी लोकांची भूक भागवून परदेशातील २५ देशांच्या अन्नाची गरज आपल्या देशाने भागविली आहे.

अध्यक्ष महोदय, कोरोनामध्ये तुम्ही आम्ही सगळयांनी सामाजिक अंतर पाळला, सॅनिटायझरचा वापर केला, गर्दीमध्ये जाणे टाळले, मुखपट्टीचा वापर केला. परंतु माझा शेतकरी राजा आपल्या कुटुंबासहित शेतामध्ये राबत होता. तुमच्या आमच्यासाठी त्याने कोरोना पाहिला नाही, पाऊस पाहिला नाही, रोगराई पाहिली नाही. त्याने फक्त अन्नधान्य निर्माण करण्याचे काम केले.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री. छगन भुजबळ......

अध्यक्ष महोदय, आज देशामध्ये आणि जगामध्ये अन्नधान्य पिकविले जात आहे. शेतकऱ्यांचे आपल्यावर खूप उपकार आहेत. मला असे वाटते की, शेतकरी देखील कोरोना योद्धे आहेत. या कोरोना काळातही ते आपणा सर्वांची भूक भागवित आहेत. त्यांच्यामुळे आज कोणीही उपाशी राहत नाही. माननीय पंतप्रधानांकडूनही त्यांच्यासाठी काही योजना तयार करण्यात येत असतात. पीएमकेवाय योजनेतून त्यांना धान्य देऊ शकतो. आज देशात अन्नधान्य ठेवण्यासाठी गोडाऊनमध्ये जागा शिल्लक नाही. इतके अन्नधान्य आज आपण पिकवित आहोत. असे असताना त्या शेतकऱ्यांनी काय गुन्हा केला आहे. केंद्र सरकारने केलेले कृषि कायदे शेतकऱ्यांच्या मुळावर येणारे आहेत. ते कृषि कायदे रद्द करण्यात यावेत, अशी त्यांची मागणी आहे. त्या कायद्यात बदल करावा, असे ते सांगत आहेत. परंतु त्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. केंद्र सरकारचा हा अट्टहास का सुरु आहे ? अनेक यंत्रणा उभ्या करण्यात आल्या. आगगाड्या बोलविण्यात आल्या होत्या. हा सर्व कारभार काही ठराविक लोकांकडे जाणार आहे. हे सर्व सुरु असताना शेतकऱ्यांच्या हमीभावाची खात्री नाही. असे असताना त्या शेतकऱ्यांनी कोणाकडे दाद मागावयाची.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, युपीए सरकारने शेतकऱ्यांना हमीभाव दिला होता. त्यामुळेच आज देशात मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन होत आहे. कधी नव्हे ते माननीय सर्वोच्च न्यायालयाने यामध्ये हस्तक्षेप केला आहे. त्यांनी सांगितले की, हे जे प्रकार सुरु आहेत ते योग्य नाहीत. कृषि कायद्याच्या विरोधातील आंदोलनाबाबत कॅनडासारख्या इतरही अनेक देशांनी चिंता व्यक्त केली आहे. आपणास कल्पना आहे की, दोन-चार दिवसांचे आंदोलन करावयाचे म्हटले तरी किती त्रास सहन करावा लागतो. असे असताना तेथील शेतकरी आठ महिन्यांपासून आंदोलन करीत आहेत. तेथील शेतकरी दिल्लीमध्ये गेल्यानंतर त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले गेले. ते शेतकरी पाकिस्तानमधून आलेले आहेत काय ? ते शेतकरी देशाचे शत्रू आहेत काय ? आज त्याच शेतकऱ्यांच्या मतांवर संसद आणि ही विधानसभा सुरु आहेत. असे असताना आपण त्यांचे म्हणणे ऐकले पाहिजे. ज्यावेळेस अशा प्रकारची

श्री. छगन भुजबळ......

आंदोलने होतात त्यावेळेस आपणही केलेले कायदे रद्द करीत असतो. तयार केलेले कायदे जर लोकोपयोगी नसतील तर ते रद्द केले पाहिजेत. आपण आपला अट्टहास सोडत असतो.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, मी माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छितो की, जर आपणास काँग्रेस पक्षाने काय काम केले ? हे कोणी विचारले तर आपण ते यापुढील काळात सांगू नये. याचे कारण आपण केलेली कामे सांगितली तर ते लोक आपण केलेले कामही विकून टाकतील. आपण त्यांच्या लक्षात एखादी गोष्ट आणून दिली तर ती देखील ते विकून टाकतील. कोणी काही बोलावयास लागले तर लगेच त्याच्या पाठीमागे ई.डी. चा ससेमिरा लागत असतो. कोणतेही आरोप लावण्यात येत असतात. वर्तमानपत्रामध्ये काहीही बातम्या छापून येतात. याचे कारण असे की, त्या कायद्यानुसार जर आपणास अटक केली तर आपल्यावर लावण्यात आलेले आरोप खोटे आहेत, हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीची असते. तो व्यक्ती तुरुंगातून सिद्ध करीत असतो, की मी निर्दोश आहे. इतर कायद्यामध्ये पोलिसांनी एखाद्या व्यक्तीला अटक केली तर पोलीस सिद्ध करीत असतात की अमूक व्यक्ती आरोपी आहे किंवा नाही. परंतु ई.डी.च्या कायद्यात हे प्रकार नसतात. एखाद्या वृत्तवाहिनीने जर तेथील आंदोलक शेतकरी, त्यांची मुले कसे जगत आहेत ? हे दाखविले तर ती वृत्तवाहिनी बंद केली जाते. त्यामुळे ते आंदोलन दाखविण्यासाठी कोणतीही वृत्तवाहिनी हिम्मत करीत नाही. या सर्व गोष्टींचा विचार मानवतेच्या दृष्टीकोनातून केला पाहिजे. त्या

असुधारित प्रत

शेतकऱ्यांसोबत चर्चा करुन त्यांना परत घरी पाठविले पाहिजे. परंतु ते काम केंद्र सरकारकडून होताना आढळून येत नाही.

अध्यक्ष महोदय, कृषि कायद्याविरोधातील आंदोलनाकडे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांचे आणि जनतेचे लक्ष आहे. त्या शेतकरी बांधवाचे काय होणार ? याची सर्वजण चिंता करीत आहेत. त्या कृषि कायद्यामध्ये काय त्रुटी आहेत, हे सांगण्याचे काम अनेक राज्य सरकारने केले आहे. महाराष्ट्र राज्यातील अनेक शेतकरी नेते यांचाही यासाठी आग्रह आहे. माननीय

श्री. छगन भुजबळ......

मुख्यमंत्र्यांनी सर्व नेत्यांशी चर्चा केली होती. कायद्याच्या चौकटीत राहून या कृषि कायद्याबाबत काय करता येईल याची माहिती घेतली होती. शेतकऱ्यांना हमीभाव कसा मिळेल ? त्यांना कशा प्रकारे सुरक्षितता मिळेल ? याबाबत चर्चा केली होती. कोणीही व्यक्ती येऊन शेतकऱ्यांचा माल खरेदी करेल आणि त्यांना त्यांच्या मालाचा मोबदला दिला नाही तर ते शेतकरी काय करतील ? आपण त्या शेतकऱ्यांना कशा प्रकारे संरक्षण देणार आहोत ? या सर्वांसोबत इतरही अनेक गोष्टी आहेत. सध्या शेतकऱ्यांच्या

असुधारित प्रत

आंदोलनाची नोंद गिनिज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये होईल, अशा प्रकारचे तेथे आंदोलन सुरु आहे. आपण सर्वजण त्या शेतकऱ्यांबद्दल संवेदना व्यक्त करुन नंतर आपण ते आंदोलन कामाच्या व्यापात विसरुन जातो. परंतु तेथे पंजाब, हरियाणा राज्यातील अनेक शेतकरी अजूनही आंदोलन करीत आहेत. पंजाब राज्य हे या देशाच्या संरक्षणासाठी सदैव सर्वांपुढे असते. त्याच पंजाबचे शेतकरी आज रस्त्यावर उतरुन आंदोलन करीत आहेत. याचा आपण विचार केला पाहिजे. या कृषि कायद्यामध्ये शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या गोष्टींची तरतूद कशा प्रकारे करता येईल, यासाठी सर्व राज्य सरकारने ठराव केला पाहिजे. त्याबाबत मत नोंदवून कायदे केले पाहिजे. या सर्व कायद्यांवर त्यांनी संवेदना व्यक्त केल्या पाहिजेत. माझ्या सहकारी मंत्री महोदयांनी इतरही काही प्रश्न मांडले आहेत. अन्नधान्य संदर्भातील एक भाग हा अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधीत आहे. त्यात असे म्हटले आहे की, "....the supply of such foodstuffs, including cereals, pulses, potato, onions, edible oilseeds and oils, as the Central Government may, by notification in the Official Gazette, specify,.......".

यानंतर श्री. चौधरी......

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ.....

म्हणजे जीवनावश्यक वस्तुंच्या संदर्भात काही नियम करायचे असतील किंवा त्यांना रेग्युलेट करायचे असेल तर ते अधिकार केंद्राकडे जातील. खरे तर, शेती हा विषय केंद्र आणि राज्य यांच्या दोहोंच्या अखत्यारितील म्हणजे समवर्ती सुचीतील विषय आहे. या विषयाबाबत केवळ केंद्रानेच कायदे करावेत असे नसून त्याबाबतचे अधिकार राज्याला देखील आहेत. त्यामुळे या विधेयकाद्वारे आपण केंद्राच्या कायद्यामध्ये सुधारणा सुचवित आहोत की, जे अधिकार केंद्र सरकारला आहेत तेच अधिकार राज्य सरकारला देखील आहेत. हाच या विधेयकाचा मथितार्थ आहे.

अध्यक्ष महोदय, या विषयासंदर्भात केंद्राला जो अधिकार आहे तो अधिकार राज्याला का नसावा ? तो अधिकार असला पाहिजे व तशी तरतूद केंद्राच्या कायद्यात नसल्यामुळे ती समाविष्ट करण्यात यावी, अशी मागणी आपण याद्वारे करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, या विधेयकाच्या मसुद्यात शेतकरी, जनता, शेतकरी नेते किंवा कोणाला काही बोलायचे असेल तर त्यासाठी आपण त्यांना दोन महिन्यांचा अवधी देत

आहोत. हे सार्वभौम सभागृह शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहे हा दिलासा आपल्याला त्यांना द्यायचा आहे. आम्ही गप्प बसलेले नसून आम्ही तुमचे ऐकून घेऊन ज्या-ज्या सुधारणा करणे आवश्यक आहे त्या करणार देखील आहोत.

अध्यक्ष महोदय, अशा प्रकारे कायदे तयार करुन राज्यांना डावलण्यात येत असेल तर त्यांचा मुकाबला राज्याला देखील करावा लागेल. शेतकऱ्यांच्या संरक्षणाविरुध्द कुठलाही कायदा असला तरीही राज्य सरकार मात्र शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून त्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करीन. हे राज्यातीलच नव्हे तर देशातील शेतकऱ्यांना आणि जनतेला या सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून मला सांगायचे आहे. या महाराष्ट्र राज्याचे सार्वभौम सभागृह त्यांची नोंद घेत आहे, हेही मला सांगायचे आहे. त्यांनी नाराज होण्याचे कारण नाही. आम्ही त्यांच्या पाठीशी उभे आहोत.

श्री.छगन भुजबळ.....

अध्यक्ष महोदय, माझे या निमित्ताने आपल्या माध्यमातून भारत सरकारला हे देखील सांगणे आहे की, हे शेतकरी आपलेच आहेत, त्यांनीच आपल्याला मतदान केलेले आहे. असे असताना त्यांचे ऐकायला काय हरकत

असुधारित प्रत

आहे ? त्यांचे ऐकावे. दिल्ली दरवाजावर शेतकऱ्यांचा जीवघेणा जो खेळ सुरु आहे तो थांबवावा. तेथे शेतकऱ्यांवर वॉटर जेटने पाणी ओतले जात आहे, गॅस सोडले जात आहेत, कधी वीज पुरवठा बंद केला जातो आहे तर कधी दुसरेच काही केले जात आहे. परंतु तरीही शेतकरी मात्र मागे हटले नाहीत. उन्हात, पावसात, हिवाळयात रानात काम करणारा हा शेतकरी आहे. प्रतिकूल वातावरणात काम करताना जो मागे हटत नाही तो अशा कृतींमुळे कसा मागे हटेल ? तो ताठ कण्याने उभा आहे. त्याच्या पाठीशी महाराष्ट्र सरकार व जनता देखील आहे हे दाखविण्यासाठीच हे विधेयक आज सभागृहामध्ये मांडण्यासाठी अनुमती मागितलेली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपाध्यक्ष :** अनुमती देण्यात आली आहे.

श्री.छगन भुजबळ : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक - १९ मांडतो.

**उपाध्यक्ष :** विधेयक मांडण्यात आले आहे.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** अत्यावश्यक वस्तू (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XIX OF 2021**

(A BILL FURTHER TO AMEND THE ESSENTIAL COMMODITIES ACT, 1955, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.छगन भुजबळ (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १९ - अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक, दोन महिन्यांच्या अवधीत लोकाभिप्राय अजमावण्यासाठी परिसृत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

**उपाध्यक्ष :** आता मी विधेयक दोन महिन्यांच्या अवधीत लोकाभिप्राय अजमावण्यासाठी परिसृत करावे हा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. XVII OF 2021**

(A BILL TO AMEND THE FARMERS (EMPOWERMENT AND PROTECTION) AGREEMENT ON PRICE ASSURANCE AND FARM SERVICES ACT, 2020, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.दादाजी भुसे (कृषी मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १७ - शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) आश्वासित मूल्य व कृषि सेवा करार अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यामध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयक, दोन महिन्यांच्या अवधीत लोकाभिप्राय अजमावण्यासाठी परिसृत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने संसदेमध्ये जे तीन अधिनियम पारीत केले आहेत त्यातील दोन अधिनियमांसंदर्भात माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात, माननीय मंत्री श्री.बाळासाहेब पाटील आणि माननीय मंत्री

असुधारित प्रत

श्री.छगन भुजबळ यांनी महाराष्ट्राची भूमिका आणि शेतकऱ्यांप्रतीचा आदर या ठिकाणी व्यक्त केला आहे.

अध्यक्ष महोदय, आपणा सर्वांना ज्ञात आहे की, आपण शेतकरी बांधवांना शेतकरी राजा म्हणून संबोधतो. शेतकऱ्यांना आपण देशाचा कणा म्हणतो, अन्नदाता म्हणतो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री.उद्धव बाळासाहेब ठाकरे हे शेतकऱ्यांप्रती भावना व्यक्त करताना शेतकऱ्यांना अन्नदेवता असे म्हणून संबोधतात.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या संदर्भात जे तीन अधिनियम संसदेमध्ये पारीत केले त्यामध्ये अनेक त्रुटी आणि उणिवा आहेत. त्यामुळे सहा महिन्यांपूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कॅबिनेट बैठकीमध्ये माननीय उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली या विषयाबाबत एक उप समिती गठीत करण्यात आली.

श्री.दादाजी भुसे.....

त्या उप समितीमध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, माननीय मंत्री श्री.अशोक चव्हाण, माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ, माननीय मंत्री श्री.जयंत पाटील, माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात, माननीय मंत्री श्री.एकनाथ शिंदे, माननीय मंत्री श्री.सुनिल केदार,

असुधारित प्रत

माननीय मंत्री श्री.बाळासाहेब पाटील यांच्यासह कृषीमंत्री या नात्याने मला देखील शेतकऱ्यांप्रती भावना व्यक्त करण्याची संधी मिळाली.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने जे तीन अधिनियम पारीत केलेले आहेत त्यामध्ये ज्या उणिवा किंवा त्रुटी आहेत त्या आम्ही या विधेयकाच्या माध्यमातून अधोरेखित केलेल्या आहेत. कोणताही नियम किंवा कायदा करायचा असेल तर सर्वप्रथम तो ज्यांच्याशी संबंधित आहे, येणाऱ्या काळात ज्यांच्यावर त्याचा परिणाम होणार आहे त्यांच्याशी अगोदर संवाद साधला पाहिजे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. शासनाकडून त्यांना काय अपेक्षा आहेत त्या जाणून घेऊन त्याचे प्रतिबिंब कायद्यामध्ये उमटले पाहिजे. परंतु सांगताना अतिशय खेद वाटतो की, केंद्र सरकारने अतिशय घाई-गडबडीने हे कायदे पारीत केले. आताच माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा आपल्यासमोर मांडल्या आहेत.

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. दादाजी भुसे....

अध्यक्ष महोदय, आपण पाहतो की, गेल्या ८ महिन्यांपासून दिल्लीमध्ये शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू आहे. यापूर्वी असे आंदोलन घडले आहे की, नाही हे मला माहिती नाही. परंतु आता घडत असलेले शेतकऱ्यांचे हे आंदोलन माझ्या राजकीय जीवनातील पहिले आंदोलन आहे. म्हणून शेतकऱ्यांप्रती आदर व्यक्त करीत असताना जे आंदोलनकर्ते बांधव आहेत त्यांच्या पाठीमागे संपूर्ण महाराष्ट्राचा शेतकरी उभा आहे, हे दाखविण्यासाठी आपण आज हे विधेयक येथे आणत आहोत. खऱ्या अर्थाने केंद्र सरकारने हे बिल आणण्यापूर्वी केंद्र सरकारने जो अधिनियम केला आहे त्याबाबत शेतकऱ्यांशी संवाद साधला असता, त्यांच्याशी चर्चा केली असती आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेतले असते तर आज लाखो शेतकऱ्यांवर दिल्लीमध्ये आंदोलन करण्याची वेळ आली नसती. आपण दूरचित्रवाहिन्यांच्या माध्यमातून दिल्लीतील बातम्या पाहतो, तेथील परिस्थिती पाहतो. तेथे लाखो शेतकरी, त्यांनी लहान मुले, त्यांच्या कुटुंबातील महिला गेल्या अनेक महिन्यांपासून कधी थंडी, कधी वारा तर कधी ऊन या परिस्थितीशी सामना करीत आपली मागणी लावून धरीत आहेत. मला वाटते की, या आंदोलनामध्ये २०० हून अधिक शेतकरी बांधव शहिद

असुधारित प्रत

झाले आहेत. त्या सर्वांच्या प्रती सर्व आदर व्यक्त करतो. मला वाटते की, आपण या आंदोलनाला सलाम सुध्दा केला पाहिजे.

अध्यक्ष महोदय, एक नवी दिशा या आंदोलनाच्या माध्यमातून त्या शेतकऱ्यांनी घालून दिली आहे. अगदी मुद्देसूद बोलायचे झाले तर आश्वासित किंमत आणि शेती सेवा विषयक करार याबाबत जे प्रारुप तयार करण्यात आले होते त्यात आम्ही काही सूचना केल्या आहेत. त्याबाबत केंद्र सरकारचे तिन्ही अधिनियम पाहिले तर या तिन्ही अधिनियमांत एमएफपीच्या संदर्भात कुठेच उल्लेख केलेला नाही. एकीकडे आपण कायदे करायचे, दुसरीकडे शेतकऱ्यांच्या प्रती मोठ्या गोष्टी करायच्या की, शेतकऱ्याला जो खर्च येतो त्याच्या दीडपटीने उत्पन्न मिळाले पाहिजे. त्याला ५० टक्के नफा मिळाला पाहिजे, असे एकीकडे बोलायचे आणि दुसरीकडे

श्री. दादाजी भुसे......

त्यासंबंधी कायदे करीत असताना किमान आधारभूत किंमत त्या किंमतीबाबत, एमएफपीचा या तिन्ही अधिनियमांमध्ये कुठेही उल्लेख करायचा नाही. त्यामुळे शेतकरी आणि व्यापारी यांच्यामध्ये जे काही ट्रान्झॅक्शन

होते त्या व्यवहारात किमान आधारभूत किंमत हा मुळ गाभा अधोरेखित असला पाहिजे. ही प्रमुख सूचना या विधेयकाच्या माध्यमातून आणली आहे.

अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या प्रती आपण सर्वजण आदर व्यक्त करीत असतो. त्याचे संपूर्ण कुटुंब शेतामध्ये राब राब राबत असते. जगाचा पोशिंदा म्हणून आपण शेतकऱ्याला संबोधतो. गेल्या सव्वा ते दीड वर्षाचा विचार केला तर कोरोना आजाराचे जे नवीन संकट जगाच्या पाठीवर आले आहे त्या संकटाचा समाना करीत असताना आपण पाहिले की, ४-४, ६-६ महिने, गावखेड्यापासून ते मुंबई पुण्यासारख्या मोठ्या शहरापर्यंत सर्व शहरे ठप्प होती. सगळीकडे बंद होते. परंतु मला अतिशय अभिमानाने आणि नम्रतेने सांगायचे आहे की, या सर्व ४-६ महिने आणि वर्ष वर्षभर लॉकडाऊनच्या कालावधीत खेडेगावातील झोपडी असो की, मुंबई सारख्या शहरातील ५० माळ्यांच्या इमारतीपर्यंत कोणालाही अन्नधान्य कमी पडले नाही, कोणालाही भाजीपाला कमी पडला नाही, कोणालाही दूध कमी पडले नाही किंवा कोणालाही फळे, अंडी मिळाली नाहीत, असे झाले नाही. या सर्व बाबींचे श्रेय कोणाला द्यायचे असेल तर ते आपल्या शेतकरी बांधवाला द्यावे लागेल.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या काळात सरकारने वर्क फॉर्म होमचे नियम आम्ही घालून दिले होते. परंतु आपल्याला माहिती आहे की, शेती आणि शेतीच्या क्षेत्रातील कामे घरी बसून करता येत नाहीत. म्हणून संपूर्ण शेतकऱ्याचे कुटुंब शेतामध्ये राब राब राबत राहिले आणि त्याने संपूर्ण जगाच्या अन्नधान्याची आणि भोजनाची व्यवस्था त्याने करुन दिली. या बिलाच्या निमित्ताने मी महाविकास आघाडी सरकारचेही आभार व्यक्त करतो. मुख्यमंत्री महोदय आणि आमच्या सर्व नेते मंडळींनी कृषी क्षेत्राशी निगडीत ज्या काही बाबी असतील त्यांना त्यामधून शिथिलता दिल्यामुळे शेतीचे सर्व कारभार सुरळीत चालू शकले.

श्री. दादाजी भुसे.....

अध्यक्ष महोदय, आपल्याला माहिती आहे की, शेतकरी अतिशय काबाडकष्ट करुन शेती करीत असतो. बऱ्याचशा गोष्टी त्याच्या हातामध्ये नसतात. आजही आपण पावसाची वाट पाहत आहोत. काही ठिकाणी कदाचित दुबार पेरणीचे संकट निर्माण होऊ पाहत आहे. जेव्हा पावसाची अपेक्षा असते तेव्हा पाऊस पडत नाही. जेव्हा पावसाची गरज नसते त्यावेळी अवकाळी पाऊस किंवा गारपीट होते. त्यातून शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते. त्यामुळे अतिशय प्रतिकूल

परिस्थितीत, काबाडकष्ट करुन संपूर्ण जगाचा पोशिंदा म्हणून शेतकरी बांधव त्याच्या कुटुंबासह राबतो. मी वारंवार कुटुंबाचा उल्लेख करीत आहे. आपण पाहतो की, त्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील लहान मुले सुध्दा शेतावर काम करीत असतात. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या प्रती आदर व्यक्त करीत असताना कायद्यामध्ये त्या पध्दतीच्या तरतुदी केल्या नाहीत तर मला वाटते की, आपले निश्चितपणे ते अपयश असेल. त्यामुळे हे तिन्ही कायदे सभागृहाच्या पटलावर ठेवत असताना महाराष्ट्रातील तमाम शेतकरी बांधवांना आणि नागरिकांना त्यांचे मत मांडण्यासाठी आताच मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांनी सांगितले त्यानुसार २ महिन्यांसाठी आम्ही खुले करणार आहोत. या तिन्ही कायद्यांमध्ये किमान आधारभूत किंमतीचा उल्लेख केंद्र सरकारने केलेला नाही. त्यामुळे आपण त्यामध्ये अशी सुधारणा सुचवित आहोत की, किमान आधारभूत किंमतीइतकी किंवा त्यापेक्षा अधिक किंमत शेतकऱ्याला प्रदान केल्याखेरीज तो कृषी करार वैध असणार नाही. कारण यामध्ये शेतकरी बांधवांचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे आपण हे प्रावधान करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने जे अधिनियम केलेत त्यानुसार जर व्यापाऱ्याचे शेतकऱ्याचे पैसे बुडविले तर किंवा कराराचा भंग केला तर त्याने एसडीएमकडे म्हणजे

असुधारित प्रत

प्रांत अधिकाऱ्याकडे जायचे. मला वाटते की, प्रांत अधिकाऱ्यांकडे आधीच महसुलाशी निगडीत इतकी कामे असतात की त्यामध्ये आणखी या एका अतिरिक्त कामकाज दिले जाईल. त्यामुळे या स्थितीत शेतकरी बांधवांना वेळेत न्याय मिळू

श्री. दादाजी भुसे.....

शकेल काय, त्याला किती कालावधी लागेल, ते सांगता येणार नाही. म्हणून आम्ही यामध्ये काही बदल सूचवित आहोत. त्यातून शेतकरी बांधवाला त्याच्या न्याय हक्कासाठी दिवाणी आणि फौजदारी अशा दोन्ही माध्यमातून तो न्याय मागू शकेल. आपण पाहतो की, दिवाणी कोर्टामध्ये अनेक वर्षे खटले प्रलंबित असतात. एखादा छोटा शेतकरी मोठ्या कंपन्यांच्या विरोधात किंवा व्यापाऱ्यांच्या विरोधात तो कसा काय टिकू शकेल. त्यामुळे त्याच्यासाठी फौजदारी गुन्ह्याचेही प्रावधान या सुधारणांमध्ये केलेले आहे. या अधिनियमांमध्ये दुरुस्त्या सूचवित असताना शेतकऱ्याला किमान ७ दिवसांच्या आत त्याचे पेमेंट मिळाले नाही तर संबंधित व्यापाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन ३ वर्षे शिक्षेचे प्रावधान केले आहे आणि त्यासोबत किमान ५ लाखापर्यंत दंड अशा

असुधारित प्रत

प्रकारचे प्रावधान केलेले आहे. जेणेकरुन शेतकऱ्यांची फसवणूक करण्याची हिंमत कोणीही करु शकणार नाही. ही भावना या विधेयकाच्या पाठीमागे आहे.

अध्यक्ष महोदय, सामान्यातल्या सामान्य शेतकऱ्यालाही न्याय मिळाला पाहिजे म्हणून या सुधारणा सूचविल्या आहेत. शेतकऱ्याची छळवणूक अशी जी व्याख्या आहे त्यामध्ये जो काही करार व्यापाऱ्याने शेतकऱ्याशी करीत असताना ज्या बाबी अधोरेखित केल्या असतील त्याप्रमाणेच त्याने मार्गक्रमण केले पाहिजे. त्या विहित अटी व शर्तीनुसार जर त्या व्यापाऱ्याने शेतकऱ्याचे पेमेंट केले नाही तर त्याला छळवणूक या संज्ञेमध्ये बसविले आहे.

यानंतर श्रीमती कोळगिरे.......

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री. दादाजी भुसे....

जेणेकरुन सात दिवसांच्या आत त्याला पैसे मिळाले नाहीतर तो शेतकरी बांधव दिवाणी, फौजदारी या दोन्ही प्रावधानाच्या माध्यमातून न्याय मागू शकतील. त्यामुळे संबंधीतांवर गुन्हा सुद्धा दाखल होऊ शकणार आहे. राज्य शासनाद्वारे नियम करण्याचे एक प्रावधान आपण राखून ठेवलेले आहे. उद्याच्या कालावधीमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांच्या किंवा नागरिकांच्या वतीने ज्या काही सूचना येतील त्याची तरतूद राज्य शासनाच्या प्रावधानामध्ये करु शकू, ही प्रोव्हिजन सुद्धा या कायद्यामध्ये करण्यात आली आहे. अध्यक्ष महोदय, वेळेचे भान ठेवून आताच्या घडीला हे जे प्रारुप ठेवण्यात आलेले आहे त्याला संपूर्ण सभागृहाने मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**(अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभाध्यक्ष श्री. दिलीपराव बनकर)**

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : अध्यक्ष महोदय, शेतकऱ्यांच्या संदर्भातील तीन कायदे आज सभागृहामध्ये मांडण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील जनतेला, शेतकऱ्यांना आपण ते विचारार्थ देत आहोत. आज देशामध्ये सातत्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा सुरु आहे. केंद्र सरकारने जे तीन कायदे मंजूर केले ते शेतकऱ्यांच्या विरोधातील आहेत त्यामुळे त्यांना काळे कायदे म्हणून संबोधले जात आहे. या कायद्यामध्ये ज्या त्रुटी किंवा दोष आहेत ते दूर करण्याचा प्रयत्न सरकारने आणलेल्या कायद्यातून होत आहे. ज्यावेळेस हे तीनही कायदे मंजूर करण्यात आले त्यावेळेस लोकसभेत आणि राज्यसभेत कोणतीही चर्चा झाली नाही. हे कायदे मंजूर होत असताना त्यावेळेस ज्या सन्माननीय सदस्यांनी चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा त्यांना निलंबित केले गेले. त्यामुळे आज आवर्जून आठवण येते की, त्या निलंबित होणाऱ्या सन्माननीय सदस्यांमध्ये खासदार स्व. राजीव सातव आणि इतर ही सात ते आठ जण होते. त्यांची एकच मागणी होती की, आम्हाला या कायद्यावर बोलून शेतकऱ्यांचे काय म्हणणे आहे ते मांडू द्या. परंतु त्यांचे म्हणणे न मांडू देता कायदे मंजूर झाले. यातील सर्वात मोठा दोष हा आहे

असुधारित प्रत

की,कोणत्याही पद्धतीने ते कायदे शेतकऱ्यांच्या बाजुचे नाहीत, त्यांना न्याय देणारे नाहीत किंवा त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणारे नाहीत. काही धनदांडग्यांकरिता म्हणून हे कायदे निर्माण करण्यात आलेले आहेत. परंतु त्याचबरोबर दुसरा एक दोष आहे की, जे विषय राज्य शासनाचे आहेत, राज्याचे आहेत त्या विषयांमध्ये सुद्धा यांचा हस्तक्षेप, आक्रमण आहे. त्यांना बाजुला ठेवून तसेच कोणत्याही प्रकारे विचारात न घेता हे कायदे मंजूर करण्यात आले.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, त्यावेळेस संपूर्ण देशभर आंदोलने झाली. पंजाब, हरियाणा राज्याच्या शेतकऱ्यांचे आंदोलन ८ महिन्यापासून आजही सुरु आहे. त्यामध्ये शेकडो शेतकऱ्यांनी बलिदान सुद्धा दिलेले आहे. ते आंदोलन सुरु झाल्यानंतर काय परिस्थिती निर्माण झाली आणि केंद्र सरकार त्यांच्याशी कसे वागले हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही कारण यापूर्वी माननीय

श्री. बाळासाहेब थोरात....

मंत्री श्री. छगन भुजबळ यांनी चांगल्या प्रकारे सांगितले आहे. कडाक्याची थंडी असताना पाणी मारणे, त्यांच्या रस्त्यामध्ये खिळे ठोकणे, त्यांची लाईट बंद करणे, त्यांचे

जेवण बंद करणे असे सर्व प्रकार करण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. माननीय मंत्री त्यांच्यासोबत चर्चा चर्चा करायचे पण माननीय पंतप्रधानांनी तर त्यांच्याकडे पाहिले पण नाही. या माध्यमातून शेतकऱ्यांची अवहेलना करण्याचे काम केले गेले.

अध्यक्ष महोदय, ज्यावेळेस देश अन्नधान्याच्या बाबतीत टंचाई होती त्या काळामध्ये शेतकऱ्यांनी सर्वात जास्त काम केले. परदेशातील मिलो खावा लागत होता अशी परिस्थिती आपल्या देशाची होती. देशाचे माननीय माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी भाक्रा-नानगल सारखे धरण उभे केले. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, भाक्रा-नानगलसारखी धरणेच तीर्थस्थाने असतील हे त्यांचे तेथील वाक्य आहे. पंजाब राज्याचे योगदान तर खूप मोठे आहे. देशात हरितक्रांती होत असताना सर्व देशाला धान्य पुरविण्याचे काम त्यांनी केले. त्याच देशातील शेतकऱ्यांची अवहेलना केली गेली, ही वस्तुस्थिती आहे. हरितक्रांतीसाठी माननीय इंदिरा गांधींनी ज्या पद्धतीचे नेतृत्व केले त्याच पद्धतीने देशातील शेतकऱ्यांनी खूप काबाडकष्ट केले म्हणून धनधान्याच्या बाबतीत आपण संपन्न झालो. यामध्ये महाराष्ट्र राज्याचा पण उल्लेख केला पाहिजे. कारण महाराष्ट्राच्या विधानसभेमध्ये माननीय स्व. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक स्वप्न पाहिजे.

असुधारित प्रत

तेच स्वप्न माननीय स्व. वसंतराव नाईक यांनी पूर्ण करण्याचे काम आहे. त्याच पद्धतीने आपण आज महाराष्ट्र राज्य सुद्धा स्वयंपूर्ण केलेले आहे. परंतु महाराष्ट्रातील आणि देशातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण आतापर्यंत काम करीत आलो. परंतु केंद्र सरकारच्या या तीन कायद्यांनी सर्वांवर पाणी फिरवलेले दिसत आहे. या तीनही कायद्यांच्या बाबतीत तीनही माननीय मंत्र्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीने मांडणी केलेली आहे. यामध्ये त्रुटी हीच आहे की, यात शेतकऱ्यांची बाजू पाहिलेलीच नाही. माननीय स्व. यशवंतराव चव्हाण यांची राज्याकरिता मोठे योगदान म्हणजे शेतकऱ्यांसाठी बाजार समितीची व्यवस्था निर्माण करण्यात आली. शेतकऱ्यांच्या

श्री. बाळासाहेब थोरात....

माल खरेदी करणारी बाजार समिती मोडून काढण्याचे काम करुन केंद्र सरकार सातत्याने खाजगीकरणाकडे वाटचाल करण्याच्या कामाला प्रोत्साहन देण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न यामध्ये केल्याचे आम्हाला दिसून येत आहे.

अध्यक्ष महोदय, शेतीमाल खरेदी करण्याकरिता जे व्यापारी येणार आहेत त्यांच्या लायसन्सची व्यवस्था पाहिजे किंवा नाही ? तो व्यापारी कुठला राहणारा आहे किंवा त्याची काही कागदपत्रे याची व्यवस्था बाजार

असुधारित प्रत

समितीमध्ये असते. त्याला एक लायसन्स दिले जाते. परंतु केंद्र शासनाने लायसन्स काढून टाकले आहे. पॅनकार्ड असेल तर तु कुठुन काहीही खरेदी कर असे सांगितले. अध्यक्ष महोदय, आपण नाशिक जिल्ह्यातील आहात. तर आपल्या जिल्ह्याचा, शेतकऱ्याचा काय अनुभव आहे ते मला सांगा. व्यापारी किती फसवतात, गोड बोलून चार जणांची चांगल्या पद्धतीने खरेदी करतात आणि पाचव्या पासून फसवतात आणि शेतकऱ्यांचा कोटयावधी रुपयांचा माल घेऊन जातात. मागे एक पोलीस अधिकारी होते त्यांनी शेतकऱ्यांचे बरेच कोटी रुपये मोकळे करुन दिले. शेतकऱ्यांना फसवले तर त्याला त्याच्या कष्टाचे, श्रमाचे चार पैसे पुन्हा मिळाले पाहिजे आणि ज्याने फसवले त्याला शिक्षा झाली पाहिजे, असा कायदा करण्यात यावा.या सर्व दृष्टीने केंद्र सरकारच्या कायद्याने डोळेझाप केलेली दिसते. पॅनकार्ड घेऊन येणारा व्यापारी माल घेऊन जाईल तर मग उप विभागीय अधिकाऱ्यांकडे प्रांताला अपिल करायचे. या सर्व बाबतीत प्रांत काय करणार आहे? आपल्याकडे एवढया सर्व व्यवस्था असताना पण फसवणूक सुरु आहे त्यासाठी त्याला आणखी कशी शिस्त आणता येईल याचा प्रयत्न करायचा आहे. हे तीन्ही कायदे करताना काळजी घेऊन आम्ही तोच प्रयत्न केला आहे. लायसन्स देण्याची व्यवस्था असली पाहिजे, त्याकरिता प्राधिकरण निश्चित केले

असुधारित प्रत

जातील, नियमामध्ये निश्चित केले जातील. लायसन्स देत असताना त्या व्यापाऱ्याची संपूर्ण कागदपत्रे तयार केली जातील. एखाद्या शेतकऱ्याला फसवल्यास प्राधिकरणाकडे सांगितल्यानंतर फौजदारी व दिवाणी केसच्या बाबतीतील मदत ते प्राधिकरण करेल. पैसे वसुलीला, त्याच्या कष्टाचे, श्रमाचे पैसे मिळवून द्यायला हे

श्री. बाळासाहेब थोरात....

प्राधिकरण मदत करेल. तशा प्रकारचा प्रयत्न या तीन कायद्यामध्ये आम्ही केलेला आहे.

अध्यक्ष महोदय, हे कायदे करताना आधारभूत किंमत खूप महत्त्वाची आहे. पंजाब राज्यामध्ये सर्वात असंतोष आहे त्याच राज्याने सर्व देशाला आधारभूत किंमतीच्या आधारावर गहू, तांदूळ पुरविला. आपल्या कायद्यामध्ये सुद्धा केंद्र शासनाने आधारभूत किंमतीने खरेदी केली पाहिजे. त्यासाठी जी आवश्यक व्यवस्था असेल ती निर्माण करुन देण्याची जबाबदारी आपली आहे, अशी तरतूद आपण या कायद्यामध्ये केली आहे. एवढेच नाही तर सहकारी कायद्यामध्ये आधारभूत किंमतीप्रमाणे खरेदीचा करार असला पाहिजे. एक किंवा दोन वर्षाच्या करारामध्ये मिच्युअल अंडरस्टँडिंगने शेतकरी ते करु शकतील. त्यामध्ये सुद्धा शेतकऱ्यांना फसवणाऱ्यावर फौजदारी तसेच दिवाणी

असुधारित प्रत

स्वरुपाची कारवाई करणे आणि त्यातून शेतकऱ्यांला फसवणाऱ्याला ३ वर्षापर्यंत किंवा ५ लाख रुपये दंडाची शिक्षा आपण सुचविलेली आहे.

यानंतर कुमारी गिरप....

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब थोरात ...

शेवटी कुठे तरी धाक असला पाहिजे तो धाक निर्माण करण्याचा प्रयत्न आपण यामध्ये करीत आहोत. केंद्र सरकारने आता जीवनावश्यक वस्तूंचा पूर्णपणे ताबा घेतलेला आहे. त्यामध्ये साठेबाजीला पूर्ण परवानगी दिली की, तुम्ही कितीही माल घ्या, तो साठवा. त्याचा परिणाम काय होणार आहे हे आज मला वाचायला मिळत आहे. माननीय श्री.छगन भुजबळ यांनीही सांगितले की, पंजाबमध्ये वगैरे मोठे गोदाम उभे राहत आहेत. केंद्र सरकार साठवणुकीला परवानगी देत असल्याने ते प्रचंड साठे करणार. देशामध्ये टंचाई निर्माण करणार व त्यातून मोठ्या प्रमाणावर नफेखोरी करण्याचे काम करणार. या मूठभर नफेखोरांना ताकद देण्याचे काम केंद्र सरकार करत असल्याचे आपल्याला दिसत आहे.

अध्यक्ष महोदय, त्यांनी ठरवले तर जीवनावश्यक, त्यांनी नाही ठरवले तर जीवनावश्यक नाही. माननीय श्री.छगन भुजबळ यांनी हे देखील सांगितले की, त्याचा अधिकार राज्यालाही असला पाहिजे. या सर्व गोष्टी फक्त शेतकरी जीवनाकरिताच उपयोगाच्या आहेत असे मानण्याचे कारण नाही. अशा पध्दतीने साठेबाजी

असुधारित प्रत

करण्याची परवानगी देऊन,टंचाई करुन शेती माल विकला गेला तर शहरातील मंडळींनाही प्रचंड महाग दराने जीवनावश्यक वस्तू घ्याव्या लागणार आहेत. या सर्व गोष्टी लक्षात घेता केंद्र सरकारच्या चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्न आपण या निमित्ताने करीत आहोत.

अध्यक्ष महोदय, कायदे करण्याचा राज्याचा, या विधिमंडळाचा अधिकार आहे. केंद्र सरकार त्यावर अतिक्रमण करु शकत नाही, हे मांडणारी ही बिले आहेत. आमच्या तिनही मंत्री महोदयांनी अत्यंत सुंदर पध्दतीने त्यांची मांडणी केलेली आहे. माननीय श्री.अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आमची समिती होती. आम्ही खूप अभ्यास केला, खूप चर्चा केली. अनेकांशी चर्चा करुन आम्ही ही विधेयके आणलेली आहेत.

अध्यक्ष महोदय, राज्यातील शेतकऱ्यांकरिता काम करणाऱ्या काही संघटना आम्हाला भेटल्या, काही व्यक्ती भेटल्या, त्यांचे काही म्हणणे होते. ज्यांना विचार मांडावयाचे आहेत त्यांनी ते विचार मांडावेत, त्याकरिता दोन महिन्याकरिता एक

श्री.बाळासाहेब थोरात ...

व्यवस्था निर्माण करण्यात येईल. त्या व्यवस्थेकडे त्यांचे विचार त्यांनी पोहोचवावेत. आम्ही पुन्हा पुन्हा चर्चा करु

असुधारित प्रत

व पुढच्या काळात शेतकऱ्यांना आधार देणारे, शेतकऱ्यांना ताकद देणारे, त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणारे असे कायद्यातील बदल आपण त्यामध्ये करुन घेऊ. याकरिता आम्हाला आपले, या सभागृहाचेही सहकार्य हवे आहे.

अध्यक्ष महोदय, ज्या ज्या सन्माननीय विधानसभा अथवा विधानपरिषद सदस्यांना यामध्ये काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांचेही स्वागत केले जाईल. शेवटी कायद्याच्या चाकोरीत राहून आपल्याला केंद्र सरकारलाही त्यांनी केलेल्या कायद्यामध्ये बदल करण्यास भाग पाडणे... आम्ही तर रद्द करा असेच म्हणतो, शेतकऱ्यांचे आंदोलन थांबवा असे म्हणतो परंतु, शेतकऱ्यांच्या दृष्टीने त्यात अनुकूल बदल झाले पाहिजेत याकरिता आम्ही आग्रही राहणार आहोत, एवढेच या निमित्ताने सांगतो व माझे दोन शब्द संपवतो.

...........

असुधारित प्रत

श्री.श्यामसुंदर शिंदे (लोहा): अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ च्या वि.स.वि., क्रमांक १७ वर बोलण्याकरिता उभा आहे. अन्य सन्माननीय सदस्यांनी शेतीच्या प्रश्नाबाबत उद्बोधक माहिती दिलेली आहे. शासनाची भूमिका, शेतकऱ्याचे हित कसे साधले जाईल, याबाबत येथे सांगोपांग चर्चा झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, मी आपल्या माध्यमातून शेती विम्याच्या विषयाच्या बाबतीत हे सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघात २ तालुके आहेत. आज मतदारसंघातील सर्व तालुक्यात विमा मिळतो. फक्त २ तालुक्यांत विमा मिळत नाही. हा जो अन्याय आहे तो आपण दूर करावा, अशी मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना विनंती करतो. मतदारसंघात आजूबाजूच्या सर्व ठिकाणी विमा उपलब्ध होतो आणि फक्त एकाच मतदारसंघात विमा उपलब्ध होत नाही हे अन्यायकारक आहे असे माझे स्वत:चे मत आहे. हा अन्याय दूर करावा, अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो......

श्री. दादाजी भुसे : अध्यक्ष महोदय, मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, सदरहू विधेयक लोकाभिप्राय मागविण्यासाठी परिसृत करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. त्यामुळे आता सन्माननीय सदस्यांनी विधेयकावर विचार व्यक्त न करता लोकाभिप्राय

असुधारित प्रत

प्राप्त झाल्यानंतर ज्यावेळेस हे विधेयक या सभागृहात विचारार्थ मांडण्यात येईल त्यावेळेस त्यावर सविस्तर विचार व्यक्त करावेत.

**तालिका सभाध्यक्ष** : ठीक आहे. आता मी विधेयक दोन महिन्यांच्या अवधीत लोकाभिप्राय अजमाविण्याकरिता परिसृत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...........

असुधारित प्रत

**पृ.शी. :** शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. XVIII OF 2021**

(A BILL TO AMEND THE FARMERS' PRODUCE TRADE AND COMMERCE (PROMOTION AND FACILITATION) ACT, 2020, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA).

श्री.बाळासाहेब पाटील (पणन मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०२१ चे वि.स.वि. क्रमांक १८ - शेतकरी उत्पन्न व्यापार व वाणिज्य (प्रचालन व सुलभीकरण) अधिनियम, २०२०, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, दोन महिन्यांच्या अवधीत लोकाभिप्राय अजमाविण्याकरिता परिसृत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

**तालिका सभाध्यक्ष** : आता मी विधेयक दोन महिन्यांच्या अवधीत लोकाभिप्राय अजमाविण्याकरिता परिसृत करावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत

........

असुधारित प्रत

**पृ.शी.:** प्रतिष्ठा व विशेषाधिकाराचे संरक्षण न होणे

**मु.शी.:** प्रतिष्ठा व विशेषाधिकाराचे संरक्षण न होणे या विषयाबाबत श्री.नरेंद्र भोंडेकर, वि.स.स., यांनी श्री.वसंत जाधव, पोलीस अधिक्षक भंडारा व श्री. ताजने, पोलीस निरीक्षक, जवाहनगर, पो.स्टेशन भंडारा यांच्याविरुध्द दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र भोंडेकर यांनी, 'प्रतिष्ठा व विशेषाधिकाराचे संरक्षण न होणे', या विषयाबाबत श्री.नरेंद्र भोंडेकर, वि.स.स., यांनी श्री.वसंत जाधव, पोलीस अधिक्षक भंडारा व श्री. ताजने, पोलीस निरीक्षक, जवाहनगर, पो.स्टेशन भंडारा यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे. सन्माननीय सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

असुधारित प्रत

श्री. नरेंद्र भोंडेकर ( भंडारा) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम २७३ अन्वये आपण मला माझी विशेषाधिकार भंगाची सूचना मांडण्यास अनुमती दिली याकरिता मी आपला आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, दिनांक ४.१.२०२१ रोजी आमचे शिवसेनेचे काही जिल्हा संघटिका व सह संघटिका यांच्या सोबत काही कार्यकर्ते तसेच महिला व पुरुष पदाधिकारी शिवसैनिक भंडारा येथील महर्षी विद्यामंदिर, बेला या ठिकाणी विद्यार्थ्यांची फी न दिल्यामुळे त्यांना परीक्षेस किंवा अभ्यासक्रमास बसू दिले जात  नव्हते त्याबाबत विचारणा करण्याकरिता गेले होते. त्यांना दीड तास गेटच्या बाहेर ठेवण्यात आले. गेटच्या आतमध्ये त्यांना येऊ दिले नाही. त्यांनी मला फोन केला की, आमदार महोदय आम्हाला आतमध्ये येऊ दिले जात नाही. आमच्या मुलांच्या शिक्षणाचे नुकसान होत आहे.

श्री.नरेंद्र भोंडेकर ....

अध्यक्ष महोदय, त्यांनी मला त्याकरिता तेथे बोलावल्यानंतर मी तेथे गेलो असताना गेटवरच त्या शाळेचे काही पदाधिकारी "हम आमदार, खासदार को पहचानते नहीं", असे बोलले. त्यावर कार्यकर्ते थोडेसे

असुधारित प्रत

आक्रमक झाले. त्यामुळे थोडीशी भांडणाची परिस्थिती निर्माण झाली. मी प्रिन्सीपलकडे गेलो व त्यांना विनंती केली. ते देखील असेच म्हणत होते की, "हम आमदार, खासदार को पहचानते नहीं, हमको महाराष्ट्र शासन से कोई लेना-देना नहीं है.".

अध्यक्ष महोदय, या सर्व भांडणामुळे आम्ही त्यांच्या केबिनच्याबाहेर दीड तास बसलो. सर्व शिक्षण अधिकाऱ्यांना बोलावले ते देखील म्हणाले की, साहेब हे आमचे देखील ऐकत नाहीत. सांगण्याचे कारण असे की, हे सर्व भांडण झाल्यानंतर अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर पोलीस अधीक्षक श्री.वसंत जाधव व पोलीस निरीक्षक श्री.ताजणे यांनी त्यांच्यावर गुन्हे नोंदविण्याच्या आधीच आमच्यावर गुन्हे नोंदविले. जे गुन्हे नोंदवले ते सुध्दा कलम १४१, १४२, १४३, १४७ अन्वये नोंदवले. सर्वात महत्वाचे म्हणजे ४५२, ४२७ या कलमान्वयेही गुन्हे नोंदवले गेले.

अध्यक्ष महोदय, मी गुंड नव्हतो की, कुणाच्या घरात गेलो नव्हतो. काही लोक परीक्षेची फी देऊ शकले नाहीत किंवा जे कमी फी देत होते त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी तेथे गेलो होतो. पोलीस अधीक्षक यांना न विचारता मी पोलीस निरीक्षकांना याबाबत विचारल्यानंतर असे समजले की, पोलीस अधीक्षकांचा आदेश आहे म्हणून तुमच्यावर

असुधारित प्रत

गुन्हा नोंदविण्यात येईल. हे असे खोटे-नाटे गुन्हे माझ्यावर नोंदविले आहेत. याकरिता माझी आपणांस व या सभागृहाला विनंती आहे की, या पोलीस अधीक्षक व निरीक्षकांना निलंबित करावे. तसेच, या सभागृहाच्या विशेषाधिकार समितीने माझे निवेदन मान्य करावे.

**तालिका सभाध्यक्ष** : सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना मला प्राप्त झाली आहे. ती तपासून त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

........... नंतर

श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

**पृ.शी.:** माननीय उप मुख्यमंत्री स्थानिक कार्यक्रमासाठी आले असता त्यांना भेटण्यापासून स्थानिक लोकप्रतिनिधी यांना वंचित ठेवणे

**मु.शी.:** "माननीय उप मुख्यमंत्री स्थानिक कार्यक्रमासाठी आले असता त्यांना भेटण्यापासून स्थानिक लोकप्रतिनिधी यांना वंचित ठेवणे" या विषयाबाबत श्रीमती सरोज आहिरे यांनी सौ.शर्मिष्ठा घार्गे-वालवालकर, अप्पर पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, श्री.अनंत तारगे, पोलीस निरिक्षक, दिंडोरी पोलीस स्टेशन व श्री.आनंद निकम, पोलीस

असुधारित प्रत

निरिक्षक यांच्याविरुध्द दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना

**तालिका सभाध्यक्ष (श्री.दिलीप बनकर) :** सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज आहिरे यांनी "माननीय उप मुख्यमंत्री स्थानिक कार्यक्रमासाठी आले असता त्यांना भेटण्यापासून स्थानिक लोकप्रतिनिधी यांना वंचित ठेवणे" या विषयाबाबत सौ.शर्मिष्ठा घार्गे-वालवलकर, अप्पर पोलीस अधिक्षक, नाशिक (ग्रामीण) तसेच

**तालिका सभाध्यक्ष...**

श्री.अनंत तारगे, पोलीस निरिक्षक, दिंडोरी पोलीस स्टेशन व श्री.आनंद निकम, पोलीस निरीक्षक यांच्याविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

असुधारित प्रत

श्रीमती सरोज आहिरे ( देवळाली ) : अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र विधानसभा नियम २७३ अन्वये सौ.शर्मिष्ठा घार्गे-वालवालकर, अप्पर पोलीस अधिक्षक, नाशिक (ग्रामीण) तसेच श्री.अनंत तारगे, पोलीस निरिक्षक, दिंडोरी पोलीस स्टेशन व श्री.आनंद निकम, पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना मी मांडत आहे.

अध्यक्ष महोदय, मी पुढील विषयावर हक्क भंग सूचना सादर करीत आहे. दिनांक १ जुलै, २०२१ रोजी महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री महोदय श्री.अजित पवार हे नाशिक दौऱ्यावर आले असताना ओझर विमानतळ येथे शासकीय कार्यक्रमाच्या निमित्ताने आगमनाच्या वेळी नाशिक पोलिसांकडून लोकप्रतिनिधी, आमदार या नात्याने मी श्रीमती सरोज अहिरे स्वत: ओझर विमानतळ येथे त्यांचे स्वागत करण्यासाठी गेले होते. त्यावेळी पोलीस अधिकारी सौ.शर्मिष्ठा घार्गे-वालवालकर, अप्पर पोलीस अधिक्षक, नाशिक (ग्रामीण) यांनी माझी गाडी अडवली व गाडीतून

मला खाली उतरवून पायी येण्यास भाग पाडले व अरेरावी भाषा करत माझा खूप मोठा अवमान केला व मला त्या ठिकाणी येण्यास मज्जाव घातला होता. त्याच दिवशी

श्रीमती सरोज आहिरे...

सायंकाळी ६ वाजता माननीय उप मुख्यमंत्री महोदय पुणे येथे जाण्याकरिता रवाना होत असताना आम्ही स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने त्यांना निरोप देण्यासाठी गेलो असता विमानतळाच्या आत प्रवेश नाकारुन गेट जवळच आमच्या गाड्या अडवण्यात आल्या. त्याचप्रमाणे आमच्यासमोर इतर आमदार महोदय व उच्च पदस्थ अधिकारी यांना विमानतळ येथे प्रवेश देण्यात आला होता. परंतु मला व पालघर येथील माननीय आमदार श्री.सुनील भुसारा यांना पोलीस प्रशासनाकडून सापत्नभावाची वागणूक देण्यात आली. तसेच त्यावेळी श्री.अनंत तारगे, पोलीस निरिक्षक, दिंडोरी व श्री.आनंद निकम, पोलीस

निरिक्षक यांनी आमच्याशी हुज्जत घातली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, वरिष्ठांच्या आदेशान्वये तुम्हाला परवानगी देण्यात येत नाही. अशा प्रकारचे आदेश देणारे व स्थानिक आमदार महोदयांना उप मुख्यमंत्री महोदयांच्या भेटीपासून वंचित ठेवणारे कोण वरिष्ठ अधिकारी आहेत, ज्यांनी आम्हाला उप मुख्यमंत्री महोदयांना निरोप देण्यापासून रोखले. यासंदर्भात चौकशी करण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, सदरचा घटना प्रसंगाच्या वेळी माननीय तालिका सभाध्यक्ष तथा सन्माननीय सदस्य श्री.दिलीप बनकर हे देखील उपस्थित होते. तसेच नाशिक जिल्ह्यातील माननीय आमदार सर्वश्री.हिरामण खोसकर, नितीन पवार, सुनील भुसारा यांच्या समोर उक्त घटना घडलेली आहे. आम्हाला उप मुख्यमंत्री महोदयांना भेटून

श्रीमती सरोज आहिरे...

त्यांना निरोप द्यावयाचा होता, त्यांचे आभार व्यक्त करावयाचे होते. ते माझ्याच मतदार संघातील विशेष कार्यक्रमासाठी साडे आठ वाजता आले होते. त्यांच्या स्वागताप्रसंगी व निरोपाच्या वेळी गेल्यानंतर सर्व लोकप्रतिनिधी यांचा अवमान पोलीस प्रशासनाने केला आहे.

अध्यक्ष महोदय, माझी सभागृहाच्या माध्यमातून विनंती आहे की, आमचा हक्क भंग करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात यावी.

श्री.सुहास कांदे : अध्यक्ष महोदय, आम्हा लोकप्रतिनिधी यांना अशा प्रकारची वागणूक नेहमीच मिळते. त्याबाबत आम्ही संबंधीत पोलीस अथॉरिटीकडे गेल्यास ते एचएलची जबाबदारी असल्याचे सांगतात व एचएलकडे गेल्यानंतर ते पोलीस प्रशासनाची जबाबदारी असल्याचे सांगतात. भारतीय जनता पक्षाच्या सरकारच्या

असुधारित प्रत

काळामध्ये प्रत्येक आमदार महोदयांना ५ वर्षांकरिता पास देण्यात आला होता. या सरकारमधील आमदार महोदयांना जिल्हाधिकारी यांना उक्त पास द्यावा. जेणेकरुन आमची भविष्यामध्ये अडवणूक होणार नाही याची नोंद घेण्यात यावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.विजय वडेट्टीवार : हे खरे आहे की, मुख्यमंत्री महोदय किंवा मंत्री महोदय शासकीय कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी जातात. त्यांना झेड प्लस किंवा वाय दर्जाची सुरक्षा असते. अशा वेळी आमदार महोदयांना त्यांच्यापर्यंत जाण्यास

श्री.विजय वडेट्टीवार...

रोखण्यात येते. मागील सरकारच्या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी यांचेमार्फत अशा कार्यक्रामासाठी ५ वर्षांकरिता पास देण्यात आले होते, हे खरे आहे. उक्त पास दाखविल्यानंतर सर्व अधिकारी लोकप्रतिनिधी यांना

असुधारित प्रत

मान्यवरांना भेटण्यासाठी परवानगी देत होते. अशाच पध्दतीची पास देण्याची कार्यवाही करण्यात येईल, हे मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो.

**तालिका सभाध्यक्ष :** सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना तपासून त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-------

असुधारित प्रत

**सन्माननीय विधानमंडळ सदस्यांना अवमानजनक वागणूक देणाऱ्या**

**शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत**

**तालिका सभाध्यक्ष** : सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य व या सर्वोच्च सभागृहाच्या माध्यमातून मी शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे की, अनेक सन्माननीय सदस्यांना त्यांच्या मतदारसंघात लोकोपयोगी विकासकामे करीत असताना शासकीय अधिकारी सहकार्य करत नाहीत, शासकीय कार्यक्रमांच्या उद्घाटनांना सदस्यांना निमंत्रित करीत नाहीत, कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेवर त्यांचे नाव छापत नाहीत, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन देत नाहीत, त्यांचे अर्ज, निवेदने, पत्र यांना प्रतिसाद देत नाहीत, बैठकांना आमंत्रित करीत नाहीत. अशा अनेक तक्रारी वारंवार माझ्याकडे प्राप्त होत आहेत . एकूणच शासनाद्वारे वेळोवेळी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे कसोशिने पालन होत नाही. परिणामी अनेक सन्माननीय सदस्य त्यासंदर्भात विशेषाधिकारांच्या सूचना देखील देत असतात. ही बाब अत्यंत गंभीर आहे . म्हणून शासनाने यासंदर्भात वेळोवेळी जी परिपत्रके निर्गमित केली आहेत त्यामध्ये अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांना अवमानकारक

असुधारित प्रत

वागणूक देणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कठोर कारवाई होणेस्तव तात्काळ सुधारणा करण्यात याव्यात. तसेच विधानमंडळ सचिवालयाकडून अशा प्रकरणासंदर्भात प्राप्त होणाऱ्या पत्रव्यवहाराची शासनाने तातडीने गंभीर दखल घेऊन संबंधित शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द जास्तीत जास्त कठोर स्वरुपाची कार्यवाही करावी, असे मी शासनास निदेश देत आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर माझ्याकडे पंधरा दिवसात सादर करावा असाही निदेश देत आहे .

------------

**<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन</u>**

श्री रईस शेख : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन है. आपने मुझे बोलने की अनुमति दी, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, किसानों के सिलसिले में सरकार ने आज तीन महत्वपूर्ण विधेयक सदन के पटल पर रखे है. इन विधेयकों के माध्यम से कृषि क्षेत्र में जो किसान काम कर रहे है, उनको न्याय मिलेगा. इसके लिए मैं महाविकास आघाडी सरकार को धन्यवाद देना चाहूंगा.

अध्यक्ष महोदय, इसके साथ साथ राज्य का जो दूसरा सबसे बड़ा पावरलूम उद्योग है, उस ओर मैं सरकार का ध्यान आकर्षित करना चाहता हूं. इस बारे में मैं तीन मुद्दे रखना चाहता हूं. मैं सरकार से कहना चाहता हूं कि आज पावरलूम उद्योग की सबसे बड़ी जो समस्या है वह यार्न में फ्लक्च्युएशन की है. इस वक्त यार्न में जो फ्लक्च्युएशन हो रहा है, यार्न महंगा हो रहा है, उसके कारण कपड़े का दाम बढ़ नहीं सकता, क्योंकि यह इम्पोर्ट है. सरकार ने इस फ्लक्च्युएशन की ओर ध्यान देना चाहिए. मैं आपको एक उदाहरण देना चाहता हूं. ६०एस ग्रेड का एक यार्न जो जनवरी में ९५० रुपये प्रति पांच किलो था, वही यार्न आज १४५० रुपये हो गया. मुझे उम्मीद है कि आपके माध्यम से सरकार तक यह आवाज पहुचेगी और सरकार इसकी दखल लेगी.

अध्यक्ष महोदय, मेरा दूसरा महत्वपूर्ण मुद्दा टेक्सटाईल के बारे में यह है कि आज सब्सिडी लेने के लिए सरकार ने एक नई व्यवस्था बनायी है कि आपको अपने सारे दस्तावेज

ऑनलाईन भरने होंगे. मैं सरकार का और आपका ध्यान इस ओर आकर्षित करना चाहूंगा कि भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी जैसा शहर, जहां पर बहुत छोटे उद्योग है. वहां पर लैंड के पेपर्स, स्ट्रक्चर के पेपर्स या उस तरह की सुविधाएं नहीं है कि सारे पेपर्स सबमिट कर सके. मैं चाहता हूं कि इस बारे में सरकार ने खुलासा करना चाहिए और यह डिक्लेअर करे कि जो सब्सिडी पावर बिल में मिलती थी, वैसी

श्री रईस शेख...

ही उनको मिलेगी. सरकार से उम्मीद है कि जो छोटे पावरलूम है, २४ लूम, १२ लूम के पावरलूम है, उनके लिए ब्याजमुक्त कर्ज या इस तरह की सुविधा देने की जरुरत है. आज जिस तरह की परिस्थिति है, मालेगाव ने पावरलूम बंद कर दिया है. भिवंडी में में केवल तीन दिन पावरलूम चल रहा है. लाखों लोग रास्ते पर आने के लिए तैयार है. सरकार इस बारे में यदि तुंरत ध्यान नहीं देगी, तो एक ऐसी परिस्थिति निर्माण हो सकती है कि पूरा का पूरा भिवंडी शहर कई दिनों के लिए बंद हो जाएगा. मैं चाहता हूं कि सरकार मेरे इस मुद्दे पर ध्यान दे और इस बारे में निर्णय ले. धन्यवाद.

असुधारित प्रत

-----------

.....यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री मुफ्ती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक : अध्यक्ष महोदय, मेरा पॉईंट ऑफ इन्फोर्मेशन है. आपने मुझे बोलने का मौका दिया, उसके लिए मैं आपका शुक्रगुजार हूं.

अध्यक्ष महोदय, हमारा भारत देश सेक्युलर है. यहां के रहने वाले हर शहरी को अपने धरम के आधार पर जिंदगी गुजारने की पूरी आजादी है. इसी जुलाई महीने में बकरी ईद का त्यौहार है. सरकार के गोवंश कानून का पालन करते हुए मुस्लिम समाज के जो लोग कुर्बानी करना चाहते है, उन्हें बकरा, बकरी, भैंसा और भैंस इन जानवरों की ट्रान्सपोर्टींग और मंडी में सोशल डिस्टन्सींग के साथ खरीद-फरोस्त की सुविधा मुहैय्या की जाए. सरकार की गाईडलाईन में अलामती कुर्बानी का एक लफ्ज है. मैं यह कहना चाहता हूं कि इस्लाम धर्म में अलामती कुर्बानी की कोई गुंजाईश नहीं है. आज यदि कुर्बानी पर इस तरह से बंदिश लायी जाएगी, तो कल आगे चल कर जो नमाज है, रोजा है, झकात है, हज है, इस्लाम धर्म के जितने भी अमाल है, उन तमाम में दिक्कते आएगी. सरकार से मेरी विनती है कि कुर्बानी की इस अजीम इबादत और पूजा की अदायगी में सरकार सहुलियत दे, ताकि मुस्लिम समाज आसानी से इस अजीम इबादत और पूजा को अंजाम दे सके.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, मालेगाव शहर में गुंडागर्दी और दादागिरी बढ़ती जा रही है. लोग कुत्ता गोली खा रहे है, गांजा पी रहे है, शराब पी रहे है. नशा और गुटखे का कारोबार धुमधाम से चल रहा है. उसके कारण इन नशीली चीजों की गैरकानूनी तरीके से जो खरीद-फरोस्त होती है, उस पर बंदिश आनी चाहिए. लोग नशा करके लूटमार करते है, डकैती करते है. मजदूरों की मजदूरी कटर मारकर छीन लेते है. ऐसी हालत में जब कि पावरलूम क्षेत्र में मंदी है, लोग घर चलाने के लिए, रोजी-रोटी के लिए परेशान है, मजदूरों को इस तरह से लूटा जा रहा है, मालेगाव शहर में कानून एवं व्यवस्था की हालत बिगड़ती और खराब होती जा रही है. सरकार से गुजारीश है कि वहां पर कानून व्यवस्था की स्थिति बनी रहे. मालेगाव में होने वाली गुंडागर्दी, चोरी, डकैती पर रोक लगनी चाहिए. धन्यवाद.

-----------

**विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत**

श्री.सुनील भुसारा (विक्रमगड) :अध्यक्ष महोदय, मी आपणास हक्क भंगाची सूचना दिलेली आहे. त्यानुषंगाने मी थोडक्यात माहिती देऊ इच्छितो.

अध्यक्ष महोदय, रविवार, दिनांक ०४ जुलै, २०२१ रोजी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार नाशिक

असुधारित प्रत

दौऱ्यावर आले होते. तेव्हा त्यांना भेटण्यासाठी माझ्यासह सन्माननीय सदस्या श्रीमती सरोज आहिरे, श्री. हिरामण खोसकर असे तिघेजण आम्ही विमानतळावर गेलो होतो. परंतु आत आम्हाला जाऊ दिले नाही. तेथे सुरक्षा अधिकारी म्हणून श्री.आनंदाकुमार तारगे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिडोंरी व श्री.निकम नावाचे अधिकारी होते. श्री.निकम यांचे पूर्ण नाव मला सांगता येणार नाही. ते आत जाऊ देत नव्हते. तेव्हा आम्ही त्यांना सांगितले की, आम्ही आमदार आहोत. आमच्यासोबत आमचे सुरक्षा रक्षक देखील होते. तरी देखील त्यांनी आम्हाला आत जाऊ दिले नाही. आमच्या समोर तेथील प्रांत अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आत जाऊ दिले. परंतु आम्हाला आत जाऊ दिले नाही. आत कोणालाही सोडण्यात येऊ नये, असे माननीय श्री.अजित पवार यांनी स्वत: सांगितले आहे, असे त्यांनी उत्तर दिले आहे. त्यावेळी त्यांनी आम्हाला अर्वाच्च भाषेचा प्रयोग करुन त्यांनी आम्हा तिन्ही आमदारांचा अपमान केलेला होता. त्यावेळी आम्ही त्यांच्याशी जास्त वाद घातलेला नाही. आम्ही त्यांना विनंती केली की, माननीय श्री.अजित पवार यांच्याकडे आमचे महत्त्वाचे काम आहे, आम्हाला त्यांना भेटायचे आहे. आत जाणे आवश्यक आहे, आम्हाला आत जाऊ द्या, अशी विनंती करुन देखील त्यांनी आम्हाला आत जाऊ दिले नाही.

अप्रकाशित प्रत

त्यानंतर माननीय श्री.अजित पवार व तेथील माननीय पोलीस अधीक्षक यांनी सांगून देखील त्यांनी आम्हाला आत जाऊ दिले नाही. त्यामुळे मी यानुषंगाने कालच हक्क भंगाची सूचना दिलेली आहे. माझी आपणास विनंती आहे की, संबंधित अधिकाऱ्यांवर अत्यंत कडक कारवाई करण्यात यावी, अशी मी विनंती करतो. धन्यवाद.....

-------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** राज्यातील संपूर्ण जनतेचे कोविड लसीकरण तातडीने पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने राज्यास प्रतिमाह तीन कोटी लसींचे डोस उपलब्ध करुन देणे

**मु.शी. :** राज्यातील संपूर्ण जनतेचे कोविड लसीकरण तातडीने पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारने राज्यास प्रतिमाह तीन कोटी लसींचे डोस उपलब्ध करुन देणे, या विषयासंबंधी माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांचा ठराव

असुधारित

श्री. राजेश टोपे ( सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील ठराव मांडतो.

"कोविड- १९ महामारीच्या वाढत्या प्रादुर्भावावर प्रतिबंधात्मक उपाययोजना अंतर्गत राज्यातील लोकसंख्येचे लसीकरण केंद्र शासनाच्या धोरणानुसार करण्यात येत आहे. राष्ट्रव्यापी कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण धोरणाची अंमलबजावणी दि. १६ जानेवारी, २०२१ रोजी राज्यात सुरु करण्यात आली. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रथम टप्प्यात आरोग्य सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी (Health care Workers) आणि

कोविड-१९ साथरोग प्रतिबंधात्मक कार्यक्रम अंमलबजावणीसाठी नियुक्त (Front line workers) यांचे लसीकरण सुरु करण्यात आले. व्दितीय टप्पा दिनांक १ मार्च, २०२१ पासून सुरु करण्यात आला यात जेष्ठ नागरिकांचे लसीकरण व ४५ वर्ष वयोगटावरील सहव्याधीग्रस्त नागरिकांचे लसीकरण करण्यात आले. दिनांक १ एप्रिल, २०२१ पासून ४५ वर्ष वयोगटावरील सर्व नागरिकांचे लसीकरण करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे दिनांक १ मे, २०२१ पासून वय वर्षे १८ ते ४४ वयोगटातील जवळपास ५.७१ कोटी लाभार्थ्यांचे कोविड-१९ लसीकरण करण्याबाबत केंद्र शासनाने घोषणा केली होती. दिनांक १ मे, २०२१ पासून खुल्या दराचे राष्ट्रीय कोविड-१९ वेगात्मक लसीकरण (Liberalized Pricing Accelarated & National Covid-19 Vaccination) धोरण लागू झाले आहे. तसेच केंद्र शासनाच्या वेळोवेळीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्यातील कोविड-१९ लसीकरण मोहिम राबवण्यात येत आहे.

श्री. राजेश टोपे......

वयोवृध्द आणि दिव्यांग नागरिकांसाठी केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्यांच्या घराजवळ कोविड लसीकरण केंद्र घेतले जातात. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार निवडलेल्या खाजगी रूग्णालयांत आणि

असुधारित प्रत

औद्योगिक आस्थापनेच्या ठिकाणी कोविड लसीकरण केंद्र घेतले जातात.

दिनांक २१.६.२०२१ रोजीच्या केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार देशातंर्गत लस निर्मात्याकडून मासिक लस उत्पादित केलेल्या एकूण उत्पादनापैकी ७५% लस केंद्र शासनाकडून खरेदी करून राज्याला पुरविली जात आहे. उर्वरीत २५% लस खाजगी रुग्णालयाला खरेदी करता येईल असा निर्णय झाला आहे. तसेच १८ ते ४४ वयोगटातील सर्व नागरिकांना लस पुरविण्याची जबाबदारी केंद्र शासनाने घेतल्याची घोषणा केंद्र सरकारने केली आहे.

लस पुरवठा तपशिल दिनांक ०५.०७.२०२१ पर्यंत :-

- केंद्र शासनाकडून प्राप्त लस पुरवठा – २,८४,३९,०६० डोसेस
- राज्य शासनाने खरेदी केलेल्या लसी – २५,१०,७३० डोसेस

कोविड लसीकरणाचे काम दिनांक ०५.०७.२०२१ पर्यंत

- एकूण लसीकरण – ३,४३,८२,५८३

यामध्ये खाजगी रुग्णालयांनी प्राप्त केलेल्या लसींचाही समावेश आहे.

आज अखेर राज्यातील एकूण ३,४३,८२,५८३ लाथार्थ्यांना कोविड लसीकरण करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात लसीकरणामध्ये अव्वल स्थानावर असून त्यानंतर लोकसंख्येने सर्वाधिक असणारे उत्तर प्रदेश –३.२६ कोटी, लसीकरणासह दुसऱ्या स्थानावर आहे. त्यांनतर लसीकरण झालेल्या राज्याचा क्रम पुढील प्रमाणे आहे. ३) गुजरात – २.६८ कोटी, ४) राजस्थान – २.५८ कोटी, ५) कर्नाटक - २.३८ कोटी, ६) पश्चिम बंगाल – २.२७ कोटी, ७) मध्य प्रदेश – २.१६ कोटी. याशिवाय इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वाया जाणाऱ्या लसींचे प्रमाण हे देखील अत्यंत कमी व नगण्य आहे.

श्री. राजेश टोपे......

आजपर्यंत तपासण्यात आलेल्या एकूण ४,२५,४२,९४३ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ६०,९८,१७७ (१४.३३%) नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. राज्यामध्ये आज अखेर एकूण १,२३,०३० एवढे मृत्यू झालेले आहेत. तसेच राज्यात आज रोजी एकूण १,२३,२२५ □क्टिव्ह रुग्ण असून हे देशात सर्वात जास्त आहेत.

डेल्टा पल्स या व्हेरियन्टचे एकूण २१ रुग्ण राज्यात आढळले असून ते अनुक्रमे रत्नागिरी -९, जळगाव-७, मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, रायगड (प्रत्येकी-१) असे जिल्हानिहाय रुग्ण आढळले आहेत.

असुधारित प्रत

राज्याने कोविड-१९ च्या आजारावर मात करण्यासाठी टेस्टिंग (Testing), ट्रेसींग (Tracing), उपचार (Treatment) या त्रिसुत्रीचा अवलंब केलेला आहे.

दिनांक २६.०६.२०२१ रोजी राज्यामध्ये एका दिवसात ७,३८,७०४ लोकांचे लसीकरण केले असून दिनांक ०३.०७.२०२१ रोजी एका दिवसात ८ लाखांपेक्षा जास्त नागरिकांचे लसीकरण केले आहे. महाराष्ट्र राज्याची दैनिक लसीकरणाची क्षमता ही १० ते १४ लाखाच्या दरम्यान असल्याने केंद्र शासनाने प्रत्येक महिन्यास किमान ३ कोटी लसींचे डोस राज्यास उपलब्ध करून दिल्यास राज्याचे लसीकरण लवकरात लवकर पुर्ण करता येईल. या संदर्भात राज्यातील सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधीचींही लसीकरण लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबतची मागणी आहे. हे लसीकरण लवकर पूर्ण झाल्यास जनतेमधील सामुहिक प्रतिकार शक्ती (Herd Immunity) मोठ्या प्रमाणात विकसीत होईल व या आजाराची तीव्रताही कमी होईल. परिणामी आरोग्य यंत्रणेवरचा ताण कमी होईल. तसेच स्तर – ३ चे निर्बंध कमी करता येतील. राज्यातील व्यवहार पूर्ववत सुरु करणे शक्य होईल. परिणामी अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता केंद्र सरकारने राज्यास प्रती महिना किमान ३ कोटी लसींचे डोस उपलब्ध करुन द्यावेत असा ठराव शासन मांडत आहे.".

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, साधारणपणे महाराष्ट्रमध्ये एकूण ४ कोटी २५ लाख कोरोना चाचण्या करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ६१ लाख चाचण्या पॉझिटिव्ह आलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये १ लाख २३ हजार लोकांचा कोरोनामुळे

श्री. राजेश टोपे……

मृत्यू झालेला आहे. जवळपास दीड वर्षानंतर देखील राज्यामध्ये एकंदरीत आज १ लाख २३ हजार □क्टीव्ह केसेस आहेत. □क्टीव्ह केसेसच्या बाबतीत महाराष्ट्र हा देशामध्ये एक नंबरवर आहे. या सर्व बाबी सांगण्याचा मतितार्थ एवढाच आहे की, या सर्व आकडेवारीवरुन देशामध्ये सर्वात जास्त कोरोनाचा प्रादूर्भाव महाराष्ट्रामध्ये झाल्याचे दिसून येते आहे.

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये डेल्टा प्लसचे २१ रुग्ण सापडले आहेत. तसेच राज्यामध्ये म्युकरमायकोसिसचे ५ हजार ५०० रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे या आजाराला गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये भारताच्या आर्थिक राजधानीचे शहर आहे. देशाच्या एकूण स्थूल उत्पन्नामध्ये आपल्या राज्याचा वाटा खूप मोठा आहे. या

असुधारित प्रत

सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता राज्यातील कोरोना संख्येबरोबर मृत्यू दर देखील कमी झाला पाहिजे. यासाठी आपणास लवकरात लवरक राज्यातील जनतेचे लसीकरण करणे ही काळाची गरज आहे. म्हणून हा ठराव सभागृहामध्ये मांडलेला आहे.

अध्यक्ष महोदय, संशोधनाच्या अभ्यासातून असे निदर्शनास आले आहे की, मोठ्या प्रमाणावर लोक संक्रमित झाले तर सामुहिक प्रतिकार शक्ती (Herd Immunity) येते किंवा लसीकरणाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर अँटीबॉडीज तयार केल्या तर सामुहिक प्रतिकार शक्ती (Herd Immunity) येते. त्यामुळे ही सामुहिक प्रतिकार शक्ती (Herd Immunity) लसीकरणाच्या माध्यमातून करावयाची आहे. त्यासाठी लवकरात लवकर लसीकरणे होणे आवश्यक आहे. ठराव मांडण्यामागील हा खरा हेतू आहे. हा हेतू साध्य करायचा असेल तर लसीकरण हे यावरील एकच उपाय आहे.

अध्यक्ष महोदय, तिसऱ्या लाटेची चर्चा मोठ्या प्रमाणावर होत आहे आणि त्याची भिती देखील अनेकांच्या मनामध्ये आहे. या तिसऱ्या लाटेची तीव्रता कमी

श्री. राजेश टोपे……

असुधारित प्रत

करावयाची असेल तर किंवा रुग्ण गंभीर होण्याचे प्रमाण कमी करायचे असेल तर आपणास लसीकरण करणे आवश्यक आहे.

अध्यक्ष महोदय, त्यामुळे दर महिन्याला महाराष्ट्र राज्याला तीन कोटी लसीचे डोस देण्याची मागणी या सार्वभौम सभागृहाच्या माध्यमातून केंद्र शासनाकडे करण्याबाबतचा हा ठराव आहे. आपण दर महिन्याला तीन कोटीचीच मागणी का करीत आहोत. याचे उत्तर असे आहे की, आपल्या राज्यातील आरोग्य यंत्राणा दर दिवशी १० ते १५ लाख लोकांचे लसीकरण करु शकते. एवढी आपली यंत्रणा सक्षम आहे. त्यामुळे आपण किमान प्रत्येक दिवशी १० लाख लोकांचे लसीकरण केले तर महिन्याला ३ काटी लोकांचे लसीकरण पूर्ण होईल.

अध्यक्ष महोदय, मी आताच सांगितल्याप्रमाणे राज्यामध्ये सामुहिक प्रतिकार शक्ती (Herd Immunity) तयार करावयाची असेल तर लवकर लवकर लसीकरण करणे होणे आवश्यक आहे. लसीकरणाचा कार्यक्रम एक वर्षाचा किंवा सहा महिन्याचा असू नये. कमीत कमी एक ते दीड महिन्यामध्ये उर्वरित लसीकरण पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी……

असुधारित प्रत

श्री. राजेश टोपे......

अध्यक्ष महोदय, दिनांक ५ जुलै, २०२१ रोजीपर्यंत राज्यात ३ कोटी ४३ लाख इतके लसीकरण झालेले आहेत. सध्या १८ वर्ष वयापुढील सर्वांचे लसीकरण करण्यात येत आहे. पाच वर्षापुढील सर्वांचे लसीकरण पुढील टप्प्यात करावयाचे झाले तर ९ कोटींच्या जवळपास ही संख्या जाणार आहे. त्यामुळे सध्या सहा कोटींच्या जवळपास लसीकरण करणे शिल्लक आहे. प्रतिमहिना तीन कोटी लसीकरण केले तर दोन महिन्यात हे लसीकरण पूर्ण होऊ शकते. महिन्याला तीन कोटी लसींचे डोस उपलब्ध झाले तर आपणास दोन महिन्यात सामुहिक प्रतिकारशक्ती निर्माण करणे शक्य होणार आहे. त्यामुळे तिसऱ्या लाटेची भिती राहणार नाही व मृत्यूदरही कमी होऊ शकेल. तसेच सर्वात जास्त सक्रीय रुग्ण आपल्या राज्यात असल्याने राज्य शासनाने जवळपास सर्व जिल्ह्यांचा समावेश कोरोना निर्बंधाच्या तिसऱ्या टप्प्यात केला आहे. यामुळे अनेक निर्बंध लादले आहेत. जसे की, दुपारी चार वाजल्यानंतर दुकाने बंद केली जात आहे. मुंबईची लोकल सध्या सुरु नाही. मुंबई शहराची लोकसंख्या एक कोटी २५ लाखंच्या जवळ आहे. असे असताना मुंबईतील लोकल सेवा बंद असेल तर लोक त्यांच्या कामाच्या ठिकाणी कसे जातील ?

अनेक पत्रकार, खाजगी कर्मचारी लोकल सुरु करण्याबाबत मागणी करीत आहेत. मी सांगू इच्छितो की, लसीकरणाची गती वाढविली तर लोकल ट्रेन सुरु करता येतील.

अध्यक्ष महोदय, अर्थव्यवस्थेला गती द्यावयाची असेल तर लवकरात लवकर मोठ्या प्रमाणात लसीकरण करणे गरजेचे आहे. राज्यातील सर्व व्यवहार पूर्ववत आणावयाचे असेल तर लसीकरणास अनन्यसाधारण महत्त्व द्यावे लागेल. देशात महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक लसीकरण झाले आहे. याचा अर्थ राज्य सरकार कार्यक्षमतेने काम करीत आहे. अनेकदा राज्य सरकारचे लसीकरण व्यवस्थापन योग्य नाही, अशा प्रकारच्या टीका केल्या जातात. परंतु तशी टीका करणे योग्य नाही. राज्य सरकारने लसीकरण अतिशय कार्यक्षमतेने सुरु केले आहे. येणाऱ्या काळात लसीकरण करीत असताना प्रत्येक जिल्ह्याची लोकसंख्या, ज्यांचा लसीचा दुसरा

श्री. राजेश टोपे......

डोस शिल्लक आहे, त्यांचे दुसऱ्या डोसचे लसीकरण हे सर्व निकष विचारात घ्यावे लागणार आहेत. तसेच ज्या जिल्ह्यामध्ये अधिक संसर्ग असेल तर तेही निकष विचारात घ्यावे लागतील. एखाद्या जिल्ह्यात अतिशय वेगाने लसीकरण केले जात असेल तर त्याठिकाणी अधिक लसींचा

असुधारित प्रत

पुरवठा करता येईल काय ? याचा विचार करावा लागणार आहे. तसेच राज्याच्या लसीकरणाच्या सरासरीपेक्षा जे जिल्हे लसीकरणात मागे पडले आहेत त्याही जिल्ह्यांना सरासरीमध्ये आणण्यासाठी लसींचा पुरवठा केला पाहिजे. येणाऱ्या काळात हे सर्व निकष विचारत घेऊन लसीकरण करावे लागणार आहे.

अध्यक्ष महोदय, केरळ राज्यात सर्वात कमी लसींचे डोस वाया जात आहेत. परंतु केरळ राज्यानंतर महाराष्ट्र राज्यात एक टक्क्यापेक्षाही कमी लसींचे डोस वाया जात आहेत. इतर काही राज्यात २ ते ३ टक्क्यांपर्यंत लसींचे डोस वाया जात आहेत. महाराष्ट्रातील साडेतीन कोटी लसीकरणाच्या तुलनेत गुजराज, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल या राज्यात दोन ते अडीच कोटी एवढेच लसीकरण झालेले आहे. महाराष्ट्र राज्य या सर्व राज्यांपेक्षा लसीकरणात पुढे आहे. या ठरावाला सभागृहाने पाठिंबा द्यावा, अशी मी विनंती करतो. तसेच हा ठराव केंद्र सरकारच्या आरोग्य विभागाकडे पाठविण्यासाठी एकमताने सहकार्य करावे, अशी विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, राज्यातील लसीकरणाबाबत काही लोकांच्या मनात गैरसमज असेल तर तोदेखील दूर केला जाईल. कोरोना महामारीवर सध्यातरी लसीकरण हाच एकमेव रामबाण ईलाज आहे. त्यासाठी येणाऱ्या काळात

असुधारित प्रत

राज्याला मोठ्या प्रमाणात लसींचे डोस उपलब्ध व्हावेत, यासाठी आजचा हा ठराव मांडण्यात येत आहे. या ठरावाच्या माध्यमातून केंद्र शासनावर मी कोणत्याही प्रकारची टीका करीत नाही. केंद्र सरकार लसीकरणाबाबत मदत करीत नाही, असे म्हणण्याचा या सरकारचा हेतू नाही. सध्या राज्य सरकार दररोज दहा लाख क्षमतेने लसीकरण करु शकते. परंतु लसींचा साठा उपलब्ध नसेल तर पूर्ण क्षमतेने लसीकरण केंद्रे सुरु ठेवता येत नाहीत. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील सर्वाधिक रुग्णवाढ, मृत्यूदर

श्री. राजेश टोपे......

या सर्व गोष्टींचा विचार करता लसीकरणाबाबत राज्याला झुकते माप दिले पाहिजे. केंद्र सरकारने याबाबत मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि सभागृहाने एकमताने या ठरावाला पाठिंबा द्यावा, अशी विनंती करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत

श्री. अमिन पटेल (मुंबादेवी) : अध्यक्ष महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी म.वि.स. नियम ११० अन्वये जो ठराव मांडला आहे, त्यावर बोलण्यासाठी आणि त्या ठरावाचे समर्थन करण्यासाठी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई शहर ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई शहरात लसीकरणाचे जे काम सुरु आहे त्याबाबत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री व मुंबई महानगरपालिका आयुक्त यांचे मी आभार मानतो. लसीकरणाच्या माध्यमातूनच कोरोना महामारी आटोक्यात आणता येणार आहे. दर महिन्याला तीन कोटी लसींचे डोस मिळाले तर राज्यातील प्रत्येक गावामध्ये लसीकरण करणे शक्य होणार आहे. लसीकरणामुळेच आपण लोकांचे प्राण वाचवू शकणार आहोत.

अध्यक्ष महोदय, जहां तक मुंबई की बात की जाए, तकरीबन २५० टीकाकरण केंद्र मुंबई में है. मुंबई महानगरपालिका उस केंद्र को चला रही है. लेकिन एक टीकाकरण केंद्र पर कभी कभी १०० वॅक्सिन डेली उपलब्ध होते है. अब आप बताईए कि इतना बड़ा इन्फ्रास्ट्रक्चर खड़ा करने के बाद, इतना स्टाफ रखने के बाद, इतना खर्चा करने के बाद अगर एक टीकाकरण केंद्र पर कम से कम

१०० और ज्यादा से ज्यादा ३०० वॅक्सिन मिलेगी, तो पूरे मुंबई का लसीकरण कब पूरा होगा? कोविड के कारण हमने कई बंधने डालकर रखे है जो कि जरुरी है. आज दुकाने ४.०० बजे बंद हो जाती है. मुंबई की लोकल ट्रेन बंद है. लोगों को तकलीफ होती है. आपके माध्यम से जो ठराव आज सदन के सामने पेश किया गया है, मेरी आपके माध्यम से केंद्र सरकार से भी यह अपेक्षा है कि उन्होंने महाराष्ट्र की ओर देखकर, ३ करोड़ टीकाकरण का जो ठराव आया है, उसको तुरंत मंजूर करना चाहिए और पूरे महाराष्ट्र और खास करके मुंबई जो आर्थिक राजधानी है, यहां पर पूरी वॅक्सिन देकर लोगों को सुरक्षित करने का काम तुरंत होना चाहिए, ऐसी मेरी विनती है. धन्यवाद.

असुधारित प्रत

श्री. सुनील प्रभु (दिंडोशी) : अध्यक्ष महोदय, म.वि.स. नियम. ११० अनव्ये मांडलेल्या ठरावाला समर्थन देत असताना मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे संपूर्ण राज्याच्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन करु इच्छितो. लसीकरणाबाबत माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी लसीकरणाचा विषय अतिशय चांगल्या प्रकारे हाताळला आहे. माननीय आरोग्य मंत्र्यांनी यात अतिशय चांगला पुढाकार घेतल्यामुळे लसीकरण मोहिम देशातील इतर राज्यांच्या तुलनेत आपल्या राज्यात चांगल्या प्रकारे सुरु आहे. यामध्ये आरोग्य अधिकारी, डॉक्टर, फ्रंटलाईन वर्कर, मुख्य सचिव, सचिव यांचेही मोठे योगदान आहे.

यानंतर श्री. चौधरी.....

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री.सुनील प्रभू......

त्यामुळेच आपण आपल्या राज्यात इतर राज्यांच्या तुलनेत जास्त लसी देऊ शकलो. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, केंद्राकडून उपलब्ध होणाऱ्या लसींच्या पुरवठयाप्रमाणे आपण प्रतिदिनी महापालिका क्षेत्र किंवा ग्रामीण भागामध्ये लस पुरवठा करतो. दिवसाला सुमारे ६ लाख नागरिकांचे लसीकरण आपण करु शकतो अशी तयारी देखील सरकारने केली आहे, ही दिलासा देणारी बाब आहे.

अध्यक्ष महोदय, डेल्टा प्लस व्हेरियंटच्या माध्यमातून कोरोनाची तिसरी लाट येऊ शकते याबाबत विविध आरोग्य तज्ज्ञ यू-टयूब, वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या यांच्यामधून माहिती देत आहेत. या बातम्यांमुळे जनतेमध्ये मोठया प्रमाणात भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे लोकांचे मनोधैर्य वाढवायचे असेल तर लसीकरण हा एकमेव कार्यक्रम आहे. देशातील महाराष्ट्र हे एकमेव राज्य असे आहे की जेथे अतिशय चांगल्या पध्दतीने लसीकरण कार्यक्रम राबविला जात आहे.

अध्यक्ष महोदय, या ठरावावर बोलताना मंत्री महोदय आणि सरकारकडे माझ्या काही मागण्या आहेत. अर्थात,

त्यांचे काम अतिशय चांगले आहे. त्यांच्या कामाचा महाराष्ट्रातील जनतेला अतिशय चांगला फायदा होत आहे. कोविडवर आळा घालण्यात लसीकरण अतिशय महत्त्वाचे आहे व ते महाराष्ट्राच्या १२ कोटी जनतेसाठी केले जात आहे. यामुळे लोकांचा आत्मविश्वास वाढत आहे. असे असले तरीही ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत अजूनही या कामात काही अडचणी आहेत.

अध्यक्ष महोदय, मुंबईसह राज्यातील इतर शहरातील महापालिका, नगरपालिका यांच्या माध्यमातून राज्य सरकारचा आरोग्य विभाग लसीकरणाचे काम करीत आहे. राज्य सरकारकडून लसीकरण केंद्रांना लस पुरवठा केला जातो. खाजगी रुग्णालयांना देखील मोठया प्रमाणात लसी दिल्या जातात. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या परवानगीनुसार मोठया सोसायटया, मॉल्स्, मोठे उद्योग समूह येथे देखील लसी खरेदी करुन नागरिकांना देण्याचे काम सुरु आहे. राज्य सरकारने त्यासाठी विशिष्ट दर ठरवून दिला आहे.

श्री.सुनील प्रभू......

त्यापेक्षा जास्त दराने जर कोणी लसीकरण करीत असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत देखील राज्य सरकारने तरतूद केली आहे, ही अतिशय चांगली गोष्ट आहे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, प्रत्यक्ष जनतेमध्ये जाऊन काम करीत असताना मागील अनेक दिवसांमध्ये आलेले अनुभव मी या निमित्ताने सांगू इच्छितो. जेणेकरुन, माननीय आरोग्यमंत्री व सरकार येणाऱ्या काळात त्याबाबत देखील काही निर्णय घेईन. सुरुवातीच्या काळात केंद्र व राज्य सरकारने ज्येष्ठ नागरिकांचे लसीकरण करण्याचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली त्या-त्या भागातील स्थानिक व नागरी स्वराज्य संस्थांनी केली. परंतु महाराष्ट्रामध्ये विविध वयोगटातील विकलांग नागरिक, मुले देखील मोठ्या संख्येने आहेत. हे नागरीक विकलांगतेमुळे लसीकरण केंद्रावर पोहचू शकत नाहीत. काही नागरिकांच्या दोन्ही किडन्या निकामी झालेल्या आहेत, काहींना अर्धांगवायू झालेला आहे तर काही नागरिक वेगवेगळ्या आजारपणामुळे बेडवरुन उठू शकत नाहीत. अशा नागरिकांना देखील लस मिळाली पाहिजे असे त्यांच्या कुटुंबियांना वाटते. त्यामुळे विकलांग, विविध दुर्धर आजारामुळे बेड रेस्ट घेणारे रुग्ण, इत्यादींचे लसीकरण करण्यासाठी सरकारच्या माध्यमातून योजना आणणे अतिशय आवश्यक आहे. जे लोक लसीकरण केंद्रावर जाऊन लस घेऊ शकत नाहीत त्यांना त्यांच्या घरीच लस उपलब्ध करुन देण्याचे नियोजन सरकारला येणाऱ्या काळात करावे लागेल. जेणेकरुन, सरकारच्या

असुधारित प्रत

१०० टक्के लसीकरण भुमिकेला देखील मोठया प्रमाणात हातभार लागेल.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये वेगवेगळया समाजातील, ग्रामीण भागातील अनेक लोक असे आहेत की ज्यांच्याकडे अद्यापपर्यंत आधार कार्ड नाही. जर तुमच्याकडे आधार कार्ड नसेल तर तुम्ही लस घेऊ शकत नाही असा सर्वसाधारण समज नागरिकांमध्ये आहे. कित्येक वृध्द व्यक्ती, आदिवासी यांनी देखील अद्याप आधार कार्ड काढलेले नाही.

श्री.सुनील प्रभू......

सरकारने आधार कार्ड काढून घेण्याची व्यवस्था केलेली असली तरीही या लोकांनी काढलेले नाही. परंतु त्यांना लस द्यायची असेल व आधार कार्ड नसेल तर त्याचा देखील विचार करुन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन, सरकारच्या १०० टक्के लसीकरण कार्यक्रमामध्ये भर पडेल.

अध्यक्ष महोदय, शहर असो किंवा ग्रामीण भाग असो तेथे विविध प्रकारचे लोक राहत असतात. मागील काही दिवसांमध्ये मुंबई शहरात काम करीत असताना आम्हाला जे अनुभव आले व लोकप्रतिनिधी या नात्याने ज्या तक्रारी आमच्याकडे आल्या त्यामध्ये असे दिसून आले की, काही

असुधारित प्रत

ठिकाणी मोठया प्रमाणात किन्नर लोकांचे वास्तव्य आहे. त्यांच्याकडे आधार कार्ड नाही किंवा ओळख पटविण्यासाठी इतर कोणतेही पुरावे नाहीत. ते रस्त्यावर भिक्षा मागून आपले जीवन कंठत असतात. या सर्वांना देखील लस देण्याची आवश्यकता आहे. कारण कोरोना विषाणूचे संक्रमण कुठूनही, कोणालाही आणि कसेही होऊ शकते. कोरोनावर मात करताना व तिसऱ्या लाटेचा सामना करण्याची तयारी करताना किन्नर लोकांच्या लसीकरणासाठी देखील एक योजना तयार करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष महोदय, मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे यांच्यासह राज्यातील इतर मोठया शहरांमध्ये भटक्या समाजाची प्रचंड लोकवस्ती आहे. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे ओळखपत्र नाहीत. त्यांच्यासाठी देखील येणाऱ्या काळात लसीकरणाचा कार्यक्रम राज्य सरकारच्या मार्गदर्शनाखाली त्या-त्या भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत राबविण्याची आवश्यकता आहे. किंबहुना ही काळाची गरज आहे.

अध्यक्ष महोदय, शिक्षित लोकांना वाटते की, मी लस घेतली पाहिजे. या जाणिवेतून ते स्वत: रांगा लावून लसीकरण करुन घेतात. परंतु राज्याच्या ग्रामीण व शहरी भागातील असा देखील काही वर्ग आहे की तो वेगवेगळया

असुधारित प्रत

कारणांमुळे लस घेण्यापासून दुरावला आहे. त्या कारणांच्या मुळापर्यंत गेले पाहिजे. त्या-त्या भागातील सी.डी.ओ., आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका यांना घराघरात जाऊन सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले पाहिजेत.

श्री.सुनील प्रभू......

ज्याप्रमाणे माझे कुटुंब, माझी जबाबदारी या योजनेंतर्गत सर्वेक्षण करुन घरातील प्रत्येक व्यक्तीचे नाव, त्यांना असणारे आजार याबाबतची माहिती गोळा केली त्याच धर्तीवर लसीकरणासाठीचा डेटाबेस तयार केला पाहिजे. घरातील व्यक्ती, त्यापैकी आजारी व्यक्ती कोणी आहे का, असेल तर कोणता आजार आहे असा सविस्तर डेटाबेस सरकारकडे आहे का, व असेल तर त्यावर सरकारमार्फत काय उपाययोजना केली जाणार आहे ? तसेच राज्यातील भिकारी, भटक्या विमुक्त जातीतील आधार कार्ड किंवा इतर ओळखपत्र नाहीत अशा व्यक्तींसाठी काय केले जाणार आहे ? आपल्या राज्यामध्ये प्रचंड मोठया प्रमाणात आदिवासी, वंजारी समाज राहतो. त्यांचे लसीकरण करण्यासाठी काय उपाययोजना केली जाणार आहे ? कारण आपल्या देशामध्ये अनेक लोक असे आहेत की ज्यांच्याकडे आधार कार्ड नाही. त्यांच्यासाठी सरकारला वेगळी योजना करावी लागेल.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्र्यांनी बोलताना अनेक गोष्टींचा उल्लेख केला. त्याबद्दल महाराष्ट्रातील १२

असुधारित प्रत

कोटी जनतेला अतिशय आत्मियता आहे. या सरकारने अतिशय चांगले काम केलेले आहे. परंतु भविष्यात देखील काळाची पावले ओळखून कोरोनाच्या विषाणुला रोखण्यासाठी आणखी काही गोष्टी करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व माननीय आरोग्यमंत्री यांच्यासह संपूर्ण सरकारने उपाययोजना कराव्यात, ही विनंती.

अध्यक्ष महोदय, आम्ही लोकांमध्ये जाऊन काम करताना आम्हाला जाणवलेल्या अडचणी, लोकांनी आमच्यापर्यंत व्यक्त केलेल्या भावना आम्ही आज या ठिकाणी मांडल्या आहेत. त्यामुळे याबाबत विचार करुन काय कार्यवाही केली जाणार आहे याची देखील माहिती माननीय आरोग्य मंत्र्यांनी दिली पाहिजे. जेणेकरुन, त्यांची भूमिका महाराष्ट्रातील १२ कोटी जनतेला देखील कळू शकेल.

अध्यक्ष महोदय, मला या ठरावावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

श्री. पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) : अध्यक्ष महोदय, आपण मला या अत्यंत महत्त्वाच्या ठरावावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

अध्यक्ष महोदय, मी सुरुवातीलाच महाराष्ट्राच्या महाविकास आघाडी सरकारचे अभिनंदन करतो की, त्यांनी अत्यंत अडचणीच्या काळात, तयारी नसताना, केंद्रातील धोरणात संदिग्धता असताना आणि त्यांनी घेतलेले निर्णय पुन्हा फिरविले असताना या परिस्थितीत देखील सन्माननीय मुख्यमंत्री, त्यांचे सर्व सहकारी आणि विशेषत: सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. राजेश टोपे यांनी स्वत: या कोविड-१९ च्या विरोधातील लढाईमध्ये जे नेतृत्त्व केले आणि जो मुकाबला केला त्याबद्दल मी सुरुवातीलाच त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

अध्यक्ष महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये आतापर्यंत सुमारे सव्वा लाख कोटी लोक कोविड आजाराने मृत्यूमुखी पडले आहेत आणि त्यांना श्रध्दांजली अर्पण करताना हाही प्रश्न मनामध्ये येतो की, खरंच एवढी लोकं मृत्यूमुखी पडली, देशात किती मृत्यूमुखी पडली त्याचा आकडा वेगळा आहे. पण आपल्याला या लोकांना वाचविता येता आले असते कां ? आरोग्य मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे लसीकरण

असुधारित प्रत

करणे हाच त्यावर उपाय होता. कारण एकदा आजार झाल्यानंतर अजूनपर्यंत त्यावर औषध सापडलेले नाही. ते औषध शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. जेव्हा औषध सापडेल तेव्हा सापडेल. परंतु प्रिव्हेंटीव्ह व्हॅक्सीन म्हणजे आजार होऊ नये याकरिता लस घेणे हाच एक आपल्या हातात उपाय राहिलेला आहे.

अध्यक्ष महोदय, आपण या ठरावाच्या माध्यमातून केंद्र सरकारकडे दरमहा ३ कोटी लसीचे डोस मिळण्याची मागणी केली आहे. खरं म्हणजे शासनाने यापेक्षा जास्त लसीकरण करण्याची क्षमता निर्माण केली आहे. आम्ही जेव्हा आमच्या स्थानिक सरकारी दवाखान्यामध्ये जाऊन लस घेतली तेव्हा आम्हाला अनुभव आला की, अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने माहिती देऊन तेथे ही लस देण्यात आली. पण ही लस उद्या उपलब्ध असेल की नाही, याबद्दल निश्चिती नव्हती. त्यामुळे माणसं पहाटे ५ वाजल्यापासून रांगेत उभी असायची की आपला नंबर कधी लागेल. त्यानंतर मोबाईल पवर नावे नोंदविण्याची सुविधा आल्यामुळे ज्यांच्याकडे मोबाईल होते

श्री. पृथ्वीराज चव्हाण.......

त्यांनी त्यांची नावे नोंदविली. परंतु यामध्ये केंद्र सरकारचा जो धरसोडपणा होता त्याची प्रत्येकाला किंमत मोजावी लागली आहे.

अध्यक्ष महोदय, आपण आता जी मागणी करतो ती पूर्ण होईल की नाही याबद्दल माझ्या मनात शंका आहे. कारण मुळातच केंद्र सरकारने या लढाईमध्ये ज्या चुका केल्या आहेत त्यांचा उल्लेख करणे गरजेचे वाटते. मुख्यमंत्री आणि आरोग्य मंत्री जेव्हा केव्हा केंद्र सरकारकडे जातील किंवा त्यांच्याशी चर्चा करतील आणि या लसींबद्दल आग्रह करतील त्याबाबत सांगू इच्छितो की, आपल्याला दर महिन्याला हे ३ कोटी लसींचे डोस मिळणार नाहीत. त्यामुळे या अनुषंगाने येणारे काही मुद्दे उपस्थित केले पाहिजेत.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने सर्वात मोठी चूक केली असे मी आवर्जून म्हणतो. माझा याबद्दल वाद निर्माण करण्याचा उद्देश नाही. पण ज्या चुका झाल्या त्या दुरुस्त केल्या पाहिजेत. जगात असा एकही देश नाही की ज्या देशामध्ये सर्वच्या सर्व लस केंद्र सरकारने विकत घेतली नाही. कुठल्याही देशाने आपल्या प्रादेशिक सरकारांना, म्युनिसिपल संस्थांना, आपल्या कार्पोरेशनला, आपल्या खासगी संस्थांना लसी घेण्यास सांगितले नाही. आपण जर स्वातंत्र्यापूर्वीचा इतिहास पाहिला तर ज्या ज्या प्रकारे

असुधारित प्रत

भारतात लस दिली गेली त्याची संपूर्ण जबाबदारी त्यावेळच्या केंद्र सरकारने घेतलेली आहे. मग ते ब्रिटीश सरकार असेल किंवा स्वतंत्र भारताचे सरकार असेल. आपल्याला माहिती असेल की, पोलिओ डोसची कॅम्पेन आपण कसे राबविले. त्यासाठी आपण कधीही खासगी लोकांकडून पैसे घेतले नाहीत.

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने आपल्या देशातील ज्या काही औषध निर्माण कंपन्या असतील त्यांना वन सिंगल ऑर्डर द्यायला पाहिजे होती आणि कमीत कमी किंमतीमध्ये तो डोस उपलब्ध करुन घ्यायला पाहिजे होता. इकॉनॉमी ऑफ स्केल हे अर्थशास्त्रातील अत्यंत महत्तवाचे प्रिंसीपल आहे. पण भारत सरकारने काय केले तर काही ऑर्डर्स दिल्या. प्रत्येक राज्यांना आपापल्या ऑर्डर्स देण्यास सांगितले. मुंबई महापालिकेला तुम्ही तुमच्या ऑर्डर्स द्या असे सांगितले. खासगी कंपन्यांना

श्री. पृथ्वीराज चव्हाण......

सांगितले. छोट्या छोट्या आणि लहान ऑर्डस मिळाल्यामुळे जी लस केंद्र सरकारने १५०/-, १६०/- व १७०/- रुपयांना विकत घेतली आणि दिली त्या लसीची किंमत आज बाजारामये १२००/- रुपये आहे. मी स्वत: माझ्या कुटुंबियांना ९००-९०० रुपयांची लस विकत घेऊन

असुधारित प्रत

दिली आहे. हे कशामुळे झाले, फायदा कोणाचा झाला, नफेखोरी कोणी केली ? जगातला एकही देश नाही की जेथे अशा छोट्या छोट्या ऑर्डस दिल्या जातात. राष्ट्रामध्ये केंद्र सरकार एकच लसीची ऑर्डस देते. जितक्या काही कंपन्या असतील त्यांना कमीत कमी किंमतीमध्ये म्हणजे इकॉनॉमी ऑफ स्केल या सिध्दांतावर ती लस खरेदी केली जाते. आपण असे का केले ?

अध्यक्ष महोदय, मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, कदाचित बऱ्याच जणांनी एक व्हीडीओ पाहिला असेल. त्यामध्ये भारत बायोटेकच्या मालकांनी त्या व्हीडीओमध्ये टेलिव्हीजनवर चर्चा सुरू असताना ४ लोकांमध्ये सांगितले की, माझी भारत बायोटेक ही कंपनी अत्यंत कमी खर्चामध्ये ही लस तयार करते. जगात सर्वात स्वत लस आमची कंपनी निर्माण करते. पुढे ते म्हणतात की, माझ्या एका लसीच्या एका कुप्पीची किंमत ही पाण्याच्या बाटलीपेक्षा कमी आहे. पाण्याची बाटली कितीला मिळते हे आपल्याला माहिती आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, स्वत: मालक म्हणतात की, त्या लसीची किंमत २० ते २५ रुपये इतकी कमी आहे. खरं म्हणजे ज्यांनी पाहिला नसेल त्यांना आपण हा व्हीडीओ काढून दाखविला पाहिजे. केंद्र सरकारने याची चौकशी

असुधारित प्रत

केली पाहिजे. संपूर्ण देशासाठी वन सिंगल ऑर्डर देण्यापेक्षा छोट्या छोट्या ऑर्डस दिल्यामुळे हा गोंधळ निर्माण झाला आहे. जगात हे कुठेही झालेले नाही. प्रादेशिक सरकारांना लस घ्या म्हणून कोणी सांगितले नाही, म्युनिसीपाल्टीला लस घ्या म्हणून कोणी सांगितले नाही, खासगी कंपन्यांनी लस घ्या म्हणून कोणी सांगितले नाही. प्रत्येक कंपनीला एकसारखी लस खरेदी करण्याची ऑर्डस द्यायला हवी होती. आपल्याला जर नफेखोरी करायची होती किंवा आपला तोटा कमी करायचा होता तर राज्य सरकारांकडून आपण पैसे घ्यायला हवे

श्री. पृथ्वीराज चव्हाण......

होते. मुंबई महापालिकेकडून पैसे घ्यायला हवे होते. पण केंद्र सरकारने पैसे घ्यायला हवे होते आणि केंद्र सरकारने कमीत कमी किंमतीमध्ये ती लस खरेदी करायला हवी होती, ही पहिली चूक झालेली आहे.

अध्यक्ष महोदय, आपण संशोधनावर किती खर्च केला आहे ? आपल्या देशात लस तयार झाली नाही असे आपण म्हणतो. गेल्या वर्षी हा एक गंभीर आजार आहे आणि त्यावर लसीकरणाशिवाय त्यावर उत्तर आपल्याला सापडणार नाही हे जेव्हा कळले तेव्हा अमेरिकेने सुरूवातीला ११.३ बिल्लीयन डॉलर्स रक्कम केवळ

असुधारित प्रत

संशोधनाकरिता दिले. म्हणजे जवळ जवळ ८४ हजार कोटी रुपये संशोधनाकरिता खर्च केले. आपल्या देशाने या संशोधनामध्ये किती रक्कम खर्च केली तर ३५ कोटी रुपये.

अध्यक्ष महोदय, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी ही पुण्याला विषाणूंवर संशोधन करणारी संस्था आहे. ही संस्था माजी पंतप्रधान कै. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सन १९५२ साली पुण्यामध्ये सुरू केली होती. ती दृष्टी होती की आपण संशोधनाचा खर्च केला पाहिजे. संशोधनाची यंत्रणा उभी केली पाहिजे. तरच आपल्याला असे काही प्रसंग आले तर आपल्याला काही तरी करता येईल. आज त्याच नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरॉलॉजी या संस्थेने संशोधन केले. त्यामुळे भारत बायोटेकची लस आज निर्माण झाली आहे. ती भारत बायोटेक संस्था भारत सरकारला ५ टक्के रॉयल्टी देते. हे योग्य आहे. ती रॉयल्टी जमा केली पाहिजे. पण भारत सरकार जी रॉयल्टी जमा करेल त्यातून आणखी या एन.आय.व्ही.सारख्या संस्था निर्माण केल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील हाफकिन इन्स्टीट्यूटला एन.आय.व्ही.चा दर्जा दिला पाहिजे आणि तेथे देखील अशा प्रकारचे संशोधन झाले पाहिजे. तरच आपल्याला कुणाकडे हात पसरण्याची गरज पडणार नाही. आपण आपली स्वत:ची लस स्वत: तयार करु शकू.

असुधारित प्रत

श्री. पृथ्वीराज चव्हाण.......

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने लसींची उपलब्धता वाढविण्याकरिता आपल्या देशात ज्या लसी निर्माण होतील त्या होतील. पण परदेशी निर्माण झालेल्या लसींना परवानगी का दिली नाही. डिसेंबर, जानेवारीपर्यंत परदेशी लसींना आपल्या देशामध्ये चाचणी करण्यासाठी किंवा परवानगी देण्यामध्ये दिरंगाई केली. स्वाभाविक आहे की, इतरांनी ऑर्डर्स दिलेल्या असल्यामुळे आपल्याला आता त्या ऑर्डर्स मिळणार नाहीत. त्यामुळे देखील लसींचा तुटवडा निर्माण झाला आहे. आपल्या राज्याची लोकसंख्या १४ कोटींच्या आसपास आहे. त्यापैकी आपल्याला १० कोटींपर्यंत सध्या लसी लागतील, असे आरोग्य मंत्री महोदयांनी सांगितले. २-२ डोस दिले तर २० कोटी डोस लागतील. पण जर १२ ते १८ वयोगटातील मुलांना लसी देण्याचा निर्णय झाला तर लसींची संख्या आपल्याला आणखी किती तरी कोटींनी आणि पटींनी वाढवावी लागेल. जो निर्णय आता इतर देशांमध्ये होत आहे. त्याचे संशोधन अजून झालेले नाही. पण बऱ्याच देशामध्ये १२ ते १८ वयोगटातील मुलांवर चाचणी सुरू झालेली आहे. त्याबाबत ह्युमन ट्रायल्स सुरू झालेला आहे. त्याबाबत आपण काय करीत आहोत, याची स्पष्टता झालेली नाही.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, केंद्र सरकारने काहीही सांगितले तरी ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत सर्व देशामध्ये २ डोसचे लसीकरण पूर्ण होईल यावर माझा विश्वास बसत नाही.

यानंतर श्रीमती कोळगिरे......

असुधारित प्रत

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

कारण आपल्यासमोर आकडे आहेत. आज महाराष्ट्र सरकारने एक क्षमता निर्माण केलेली आहे. तुम्ही ३ कोटी काय ४ कोटी लस उपलब्ध केली तरी पण माननीय मंत्री श्री. राजेश टोपे आणि त्यांची यंत्रणा लसीकरण करेल. पण आज लसच उपलब्ध नाही. यासाठी कोण जबाबदार आहे ? आज सव्वा लाख कोटी माणसे मृत्युमुखी पडलेले आहेत त्यापैकी काहींना वाचवता आले नसते पण आपण जर योग्य वेळी निर्णय घेऊन लस उपलब्ध करुन दिली असती तर काहींना वाचवता आले असते. आज भारत देश हा जगात सर्वात मोठया प्रमाणावर लस तयार करतो अशी आपण आपली पाठ थोपटवून घेतो. परंतु आपल्या राज्यातील लोकांना ती लस मिळाली नाही. सुरुवातीला ६.५ कोटी लसींचे डोस आपण बाहेर पाठवले. कदाचित ते एखादे कॉन्ट्रॅक्ट असेल किंवा भारताने सगळया जगाला वाचवले अशाप्रकारची शाबासकी आपल्याला मिळवायची असेल. हे सर्व काही मला माहिती नाही, परंतु यावर चौकशी झाली पाहिजे. प्रत्येक देशाने आधी आपल्या देशातील नागरिकांना लस टोचलेली आहे नंतर पुढे गेलेले आहेत. माननीय मंत्र्यांना मी विनंती करतो की, आपण जेव्हा केंद्र

असुधारित प्रत

सरकारकडे ३ कोटी लसींची मागणी करण्यासाठी जाल तेव्हा केंद्र सरकारच्या ज्या काही चुका झाल्या विशेषत: किंमतीबद्दलचा निर्णय आहे तो त्यांना सांगावा. सभागृहाच्या वतीने आपण केंद्र सरकारला कळवावे की, आता हे तुकडे तुकडे करुन छोटया छोटया ऑर्डर देणे सुरु आहे आणि त्यातून सर्व कंपन्यांचा नफा वाढविण्याचा जो धंदा सुरु आहे तो बंद करा. One single order per nation अशाप्रकारे देशाची, राष्ट्राची एकच ऑर्डर दिली पाहिजे. मग ते राज्याला किंवा महापालिकेला केंद्र सरकारने ते विकले तरी चालेल. जेव्हा तुम्ही सांगता की, महापालिकेने, रिलायन्सने स्वतंत्र ऑर्डर द्यावी तेव्हा ऑर्डर क्वांटीटी कमी होते आणि किंमती वाढतात. १२०० रुपयांना लस मिळते. यासाठी कोण जबाबदार आहे, नफा कोण कमवित आहे आणि हा नफा मिळवून देण्यासाठी कोणाचा हात आहे ? या सर्व गोष्टी आपल्या हातात नाहीत हे मला माहिती आहे त्यामुळे केंद्र शासनाशी चर्चा करुन सोडवून घ्या. तरीही आपण सभागृहासमोर जो ठराव आणलेला आहे तो मी मान्य करतो. केंद्र शासनाने ज्या चुका केल्या आहेत त्या पुन्हा न करता आम्हाला विश्वासात घ्या, असे त्यांना

श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

असुधारित प्रत

सांगा. केंद्र सरकारमध्ये कोणाला विश्वासात न घेता विधेयके पास केली जातात. आज सकाळीच आपण एका विषयावर बोललो आहे. त्यांनी असे करु नये. आज महाराष्ट्राची प्रचंड क्षमता आहे. त्या क्षमतेचा वापर करा. संशोधन संस्थेमध्ये हॉफकिन्सला परवानगी देताना टाळाटाळ का सुरु आहे ? आपण हे सर्व करुन घ्या. कारण पुढे डेल्टा प्लस किंवा आणखी कोणता विषाणू येणार आहे किंवा हवामान बदलामुळे हा विषाणू वाढत आहे की काय हे अजूनही माहीत नाही. तरीही आपल्याला याची तयारी ठेवावी लागेल, आरोग्य यंत्रणा मजबूर करावी लागेल. पुन्हा अशी दुर्घटना घडणार नाही याचे प्रयत्न आपल्याला करावे लागतील. मी या ठरावाबद्दल आपले पुन्हा एकदा अभिनंदन करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत

श्री अबू आजमी (मानखुर्द-शिवाजीनगर) : अध्यक्ष महोदय, सार्वजनिक आरोग्य विभाग के माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी ने सदन के सामने जो ठराव पेश किया है, उस ठराव का मैं समर्थन करता हूं. ३ करोड़ वॅक्सिनेशन मिलना चाहिए, इसके लिए हम सभी ने कोशिश करनी चाहिए.

अध्यक्ष महोदय, आज मैं सब के सामने यह कहना चाहता हूं कि जिस तरह से माननीय श्री राजेश टोपे जी ने कोविड के समय में जो मेहनत की है, उसके लिए मैं इनका शुक्रिया अदा करता हूं, इनको बहुत बधाई देना चाहता हूं. कई लोग काम करते है, लेकिन हम जैसे लोग, हमने रात को १२.०० बजे फोन किया, २.०० बजे भी फोन किया, किसी को बेड नहीं मिल रहा, किसी को दवा नहीं मिल रही है, किसी हॉस्पिटल में ज्यादा का बिल लिया जा रहा है, किसी हॉस्पिटल में पड़ी हुई डेड बॉडी निकालने में तकलीफ हो रही है. कहीं पर छोटे छोटे टीकाकरण केंद्र खुलवाने है. इस तरह के कई कामों के लिए मैं आपको बधाई देना चाहता हूं, आपका शुक्रिया अदा करना चाहता हूं. माननीय मंत्री महोदय, यदि कभी आप नहीं रहते थे, तो हम रात को माननीय श्री चंद्रकांत थोरात जी से अपनी बात कहते थे. यदि उन्होंने फोन नहीं उठाया, तो एक मिनट में फोन आता

था. इससे समाज के दबे-कुचले लोगों की बहुत मदद हुई. इसके लिए मैं आपको बहुत धन्यवाद देना चाहता हूं. दो दिन का यह अधिवेशन है, कई मुद्दे है, सदन में बोलने के लिए समय नहीं मिलता है. समाज के वे लोग जो रोज कमाते है और रोज खाते है, ऐसे लोग इस कोविड के समय में बहुत परेशान है. पिछले मार्च महीने से इनकी दुकाने नहीं चल रही है. किसी की दुकान ४.०० बजे तक खुलती है और फिर बंद हो जाती है. सब होटल्स बंद पड़े है. होटल में बाहर से कोई नहीं आ रहा है. पर्यटक आने बंद है. सड़क पर कोई सब्जी बेचते है तो पुलिस उनको डंडा मारकर वापस भेज देते है. मेरे इलाके के एक आदमी के दोनों पैरों में पोलियो है. वह बेचारा चल नहीं पाता है. बैसाखी पर आकर पापड बेचता था. ५०-६० रुपये रोज कमाता था, पुलिस ने मार मारकर उसे घर में भेज दिया, आज वह भूखा मर रहा है. आदमी क्या करे? पुलिस कहती है कि घर में रहो, बाहर निकलोगे तो तुम्हें फाईन भरना पड़ेगा, तुम पर केस दाखिल होगा. हम सभी चाहते है कि कोविड के प्रिकॉशन

श्री अबू आजमी.....

असुधारित प्रत

पर अमल करना जरुरी है, लेकिन ऐसा होने पर आदमी खाएगा क्या ? पिछले मार्च से आज तक लोगों को परेशानी है.

अध्यक्ष महोदय, आज जो सबसे महत्वपूर्ण चीज है वह यह है कि आज बच्चों की स्कूल बंद है, लेकिन स्कूल वाले फीस मांग रहे है. यह बात सही है कि फीस नहीं मांगेंगे, तो शिक्षकों को वेतन कहां से देंगे? प्राईव्हेट स्कूलों में ५००० से १०००० रुपये वेतन मिलता है. उनको वेतन नहीं मिलेगा तो वे खायेंगे कैसे ? आज स्कूल फिस मांग रही है. स्कूलों से कहा जाए कि जितनी फीस जरुरी है, लाईब्रेरी फीस, लॅबोरेटरी फीस, ऐसी कई फीस है जिसे स्कूल ने नहीं लेना चाहिए, क्योंकि स्कूल बंद थे. इस बारे में स्कूल वालों को एक आदेश जाना चाहिए. जो जरुरी फीस है, वही फीस ली जानी चाहिए. यदि इनके पास पैसे नहीं आ रहे है तो जब तक स्कूल शुरु नहीं हो जाती, तब तक उन लोगों को बिना ब्याज का कर्ज देना चाहिए. ऐसा करना बहुत जरुरी है. आज लोग बहुत परेशान है, सुबह-शाम पैसे की भीख मांग रहे है. लोग कह रहे है कि मेरे बच्चे की पढ़ाई की फीस भरने के लिए पैसे नहीं है. स्कूल वाले उनका नाम स्कूल से निकाल रहे है. लोग कहां से फीस लाकर देंगे? ये रोज कमाकर खाने वाले लोग है, उनके पास देने के लिए कुछ भी

असुधारित प्रत

नहीं है. उनको थोड़ा राशन मिलता है. राशन से क्या होगा ? गैस सिलेंडर खरीदने के लिए एक हजार रुपये लगते है. रोजाना जिंदगी गुजारने के लिए खाना, कपड़ा, साबून, तेल, बिजली, स्कूल फीस, दवा, इलाज, ये सब वह कहां से लाएगा? सब लोग परेशान है. इसलिए फीस के बारे में सरकार ने ध्यान देकर स्कूल वालों को बिना ब्याज का पैसा देना चाहिए. हमारे आदरणीय प्रधान मंत्री, श्री. नरेंद्र मोदी जी, २३ हजार करोड़ रुपये का सेंट्रल व्हिस्टा बनाने जा रहे है. ये सब बनाने की क्या जरुरत है ? गांव में अस्पताल नहीं है. लोग लाशों को अपने कंधों पर, रिक्शा, साईकिल पर लेकर जा रहे है, पूरी दुनिया में हमारे देश की हसी हो रही है और वहां सेंट्रल व्हिस्टा बनने जा रहा है. इसके खिलाफ पूरे देश में आंदोलन होना चाहिए. वह सब पैसा अस्पतालों में खर्चा होना चाहिए, दवा पर खर्चा होना चाहिए. हम सभी को इसका विरोध करना चाहिए.

श्री अबू आजमी......

अध्यक्ष महोदय, बिजली का बिल अब पहले से बहुत ज्यादा आ रहा है. लोगों से कहा जा रहा है कि घर में रहो. गर्मी बहुत ज्यादा है. छोटे छोटे रुम है. १०-१० लोग उस रुम में रहते है. कोई बिजली, एसी, पंखा चलाते है, तो बिजली का बिल कहां से देंगे? बिजली का बिल भी माफ

असुधारित प्रत

होना चाहिए, उसके लिए कोई प्रावधान होना चाहिए. इस बारे में माननीय मंत्री महोदय से बात करते है, तो वे कहते है कि हम १०० करोड़ रुपये के नुकसान में जा रहे है, कहां से पैसा देंगे, कहां से बिजली ले जाएंगे? ऐसी बात होगी तो लोग डर जायेंगे. मेरा कहना है कि जितने भी विकास के काम है, वे सारे काम बाद में होने चाहिए. पहले इन चीजों पर ध्यान देना बहुत जरुरी है. माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी ने जो ठराव सदन के सामने पेश किया है, उस ठराव को मैं पूरा समर्थन देता हूं. चलो, दिल्ली तक का घेराव करते है और सरकार को मजबूर करते है कि माननीय मंत्री ने जो ठराव रखा है, वह ठराव माननीय श्री नरेंद्र मोदी जी को मानना ही पड़े. इसके लिए हमने कोशिश करनी चाहिए. आपने मुझे बोलने के लिए समय दिया, उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

------------

असुधारित प्रत

श्रीमती यामिनी जाधव (भायखळा) : अध्यक्ष महोदय, सर्वप्रथम मी महाविकास आघाडी सरकारच्या सर्वच माननीय मंत्र्यांचे आणि प्रत्येक घटकाचे आभार मानू इच्छिते. कारण गेल्या दीड वर्षापासून म्हणजेच सत्ता स्थापन झाल्यापासून हे सरकार यशस्वीरित्या कोरोना विषाणूशी लढत आहे. यामध्ये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय आरोग्य मंत्री यांचा मी विशेष उल्लेख करु इच्छिते. कारण हे दोघेही आम्हाला सर्वांना सोबत घेऊन ही धुरा धैर्याने पुढे नेत आहेत. या गोष्टीचा अभिमान वाटणे हे मला कुठेतरी मिसफिड वाटते. अभिमान हा खूप चांगल्या गोष्टीचा वाटायला हवा. कारण या परिस्थितीत कोरोनाच्या बाबतीत अभिमान वाटते हे म्हणायला वाईट वाटते. पण महाराष्ट्र राज्य या लसीकरण मोहिमेमध्ये अग्रक्रमाकांवर आणि पहिल्या नंबरवर आहे याचा महार.ष्ट्रीयन, मुंबईकर आणि महाविकास आघाडीचा एक घटक म्हणून मला नक्कीच अभिमान वाटतो. अगदी पॉइंटनुसार बोलायचे म्हटले तर बऱ्याच सन्माननीय सदस्यांचा याचा उल्लेख केला की, आम्हाला लसीचा तुटवडा भासतो. परंतु त्या ही परिस्थितीत राज्य शासनाचे आणि मुंबई महानगरपालिकेचे मी आभार मानते, अभिनंदन करते की, त्या ही गोष्टीला छेद देत ही लसीकरण

असुधारित प्रत

मोहीम त्या प्रक्रियेमध्ये असणारी सर्व माणसे पुढे नेत आहेत.

यानंतर कुमारी गिरप...

असुधारित प्रत

श्रीमती यामिनी जाधव ....

अध्यक्ष महोदय, लसीकरण केंद्रांवर ताण येत आहे. महाराष्ट्र लसीकरणात अग्रक्रमांकांवर आला असेल तर याचा अर्थ नक्कीच येथे रात्रंदिवस काम केले जात आहे. या केंद्रांवर ताण येत आहे. बाकीच्या विधानसभा क्षेत्रांमध्ये काय केले आहे हे मला माहीत नाही. परंतु, मी माझ्या भायखळा विधानसभा क्षेत्राबाबत सांगते. तेथे मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र राज्याच्या लसीकरण केंद्राला आमचे प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांनी समोरुन मदत देऊ केली. आम्ही त्यांना अपील केले की, आम्हीही यामध्ये सामील होतो. आम्ही प्रत्येक ठिकाणी वॉर्डवाईज मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना घेऊन लसीकरण केंद्र सुरु केली. त्या गोष्टीमुळे एका लसीकरण केंद्रावर येणारा ताण कमी झाला.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील प्रभू यांनी त्यांच्या भाषणामध्ये एक विषय मांडला की, जे बेघर आहेत, जे रस्त्यावर आहेत, ज्यांच्याकडे आधार कार्ड नाही, या सर्वांचेही लसीकरण होणे गरजेचे आहे. तरच ही लसीकरणाची मोहीम खरोखर यशस्वीरित्या पार पाडली जाईल.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, मी आपल्या मार्फत या सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छिते की, काही आश्रम आहेत मग ते वृध्दाश्रम असतील, लहान मुलांचे आश्रम असतील किंवा काही १८ ते ४४ वयोगटातील काही लोकांना घरातून हाकलले गेलेले असते. या सर्व परिस्थितीत त्यांच्याकडे रेशनकार्ड वगैरे नसते. एखाद्या वृध्द महिलेला जर तिच्या मुलाने व सुनेने घराबाहेर काढले तर अशा वेळेस तिला नक्कीच रेशनकार्ड किंवा आधार कार्ड घेता येत नाही.

अध्यक्ष महोदय, आपण ज्यावेळेस बेघरांचा विचार करतो त्याच बरोबर पॅरलली आपली जी टिम आहे किंवा प्रत्येक आमदारांना आपल्या मार्फत अशा सूचना दिल्या जाव्यात की, आपण यामध्ये भाग घ्यावा व किमान आपल्या विधानसभा क्षेत्रात असणारे जे आश्रम आहेत, तेथे या टिमसोबत जाऊन त्यांचे यशस्वीरित्या लसीकरण करावे.

श्री.यामिनी जाधव ...

अध्यक्ष महोदय, मी पुन्हा एकदा आपले तसेच, आरोग्य मंत्री महोदयांचे आभार मानते, अभिनंदन करते आणि महाविकास आघाडीच्या सर्वच मंत्री महोदयांचेही अभिनंदन करते. धन्यवाद.

.................

असुधारित प्रत

असुधारित प्रत

श्री रईस शेख (भिवंडी पूर्व) : अध्यक्ष महोदय, आपने मुझे बोलने का अवसर प्रदान किया, उसके लिए मैं आपका आभारी हूं.

अध्यक्ष महोदय, आरोग्य मंत्री जी ने नियम ११० अन्वये जो शासकीय ठराव सदन के सामने पेश किया है, उस ठराव का मैं समर्थन करता हूं. माननीय सदस्य श्री अबू आजमी जी ने भी सम्माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी के बारे में कहा है, उनकी तारीफ की. मैं समझता हूं कि यदि इस ठराव के साथ साथ हम यह बात नहीं कह पाए कि माननीय मंत्री जी ने इस बारे में बहुत अच्छा काम किया है, तो सही नहीं होगा. श्री राजेश टोपे जी मेरे लिए तो अब डॉक्टर राजेश टोपे जैसे ही हो गए है. मैं भिवंडी विधानसभा क्षेत्र का प्रतिनिधित्व करता हूं. वहां पर हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर का बहुत डेफिसिट था. उन्होंने हमें केवल कोविड के समय में ही मदद नहीं की, बल्कि अब लाँग टर्म जो हेल्थ इन्फ्रास्ट्रक्चर वहां पर बनाना है, उसके लिए भी उनकी बहुत मदद हुई है. मैं केवल दो बातों का जिक्र करुंगा. भिवंडी का आईजीएम अस्पताल है. जब कोविड की स्थिति निर्माण हुई, हम नये विधायक थे, तब वहां पर केवल चार व्हेंटीलेटर्स थे, माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी ने इतनी मदद की है कि आज उस अस्पताल में ४३ व्हेंटीलेटर्स है. माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी ने हमें वहां

असुधारित प्रत

पर बहुत मदद की है. लेकिन एक बहुत बड़ा प्रोजेक्ट जो माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी की मदद से हमें मिल रहा है, भिवंडी में २०० बेड का मदर अँड चाईल्ड हॉस्पिटल आने जा रहा है. इसके लिए मैं माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी का तहे दिल से शुक्रिया अदा करता हूं. माननीय श्री टोपे साहब, आप भिवंडी आए, आपने हमें बहुत कुछ सिखाया. नये आमदार के लिए यह बहुत बड़ी बात होती है कि मंत्री महोदय डायरेक्ट हमारा फोन उठाते है, हर मसले पर बात करते है. मैं माननीय उप मुख्यमंत्री श्री अजितदादा पवार जी से निवेदन करुंगा कि हेल्थ का जो बजट ऐलोकेशन है, उस पर ध्यान देने की जरुरत है. एक बहुत बड़ा डेफिसिट बन गया है. आपने विधायकों से कहा कि एक करोड़ रुपये स्पेंड करे. हम कोई भी इक्युपमेंट खरीद सकते है. मैं माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी के साथ बैठा था. आज मैं यदि वेंटीलेटर्स या कोई इक्युपमेंट देना भी चाहूं, तो उसके पीछे जो स्टाफ लगने वाला है, वह आज भी हमारे पास नहीं

श्री रईस शेख......

है. माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित पवार जी, आप इसका आढावा लीजिए कि हमारे पास कितना डेफिसिट हो गया है. छोटे छोटे विषय है. जैसे कि एक रेडियोलॉजिस्ट चाहिए. शासन ने इनका वेतन ७५ हजार रुपये तक किया

असुधारित प्रत

है. मार्केट में इनको डेढ़ लाख रुपये वेतन मिल रहे है. ग्रामीण इलाके में शायद आपको ७५ हजार रुपये में कोई रेडियोलॉजिस्ट मिल जाएगा, लेकिन भिवंडी जैसे अर्बन एरिया में रेडियोलॉजिस्ट नहीं मिलता है. मेरा निवेदन है कि इस ओर ध्यान देने की जरुरत है. अगर यह सुविधा मिलेगी तो छोटे शहरों में बहुत बड़ी कपॅसिटी बिल्ड हो जाएगी. मैं और तीन मुद्दे रखना चाहता हूं.

अध्यक्ष महोदय, माननीय मंत्री जी इस बात से सहमत होंगे कि कोविड के समय में युनानी और बीयुएमएस के बच्चों ने बहुत काम किया है. आप डेटा निकालकर देख लीजिए. सबसे पहले फ्रंटलाईन वर्कर बनकर जो लोग सामने आए, वे बीयुएमएस के बच्चे थे, लेकिन आज भी उनके रिक्रुटमेंट रुल्स पेंडींग है. मुझे उम्मीद है कि जब मंत्री महोदय इस विषय के बारे में उत्तर देंगे, तो आश्वासित करेंगे कि उनके सर्विस रुल्स तुरंत बनेंगे. जब आप रिक्रुटमेंट करते है, तो मैं हर महानगरपालिका को फोन करता था, मुझे याद दिलाना पड़ता था कि आयुष में बीएएमएस और बीयुएमएस को समान स्थान दिया गया है. मैं समझता हूं कि शासन ने इस बारे में कड़े निर्देश देना चाहिए कि आयुष की जो गाईडलाईन है उस पर अमल किया जाए.

अध्यक्ष महोदय, मुंबई में ऐसी परिस्थिति निर्माण हुई कि फेक वॅक्सिनेशन के कॅम्प हो गए. आज मैं डेटा ले रहा

असुधारित प्रत

था. ४५०० केसेस ऐसे है जिनको फेक वॅक्सिनेशन हो गया, लेकिन उस पर कोई पॉलिसी नहीं बनी. आज भी उनके वॅक्सिनेशन के बारे में कुछ तय नहीं हो रहा है. एक मापदंड बनाया जा रहा है कि उनकी अँटीबॉडीज है या नहीं है. इस बारे में भी खुलासा होना चाहिए. आज नागरिक बहुत त्रस्त है. मैं नगरसेवक भी हूं. लोग हमको ई-मेल भेज रहे है. ये सब शिक्षित और बड़ी कॉलोनीज के लोग है. इस बारे में भी निर्णय होना चाहिए.

श्री रईस शेख.....

अध्यक्ष महोदय, शासन ने टीकाकरण के विषय में हाई कोर्ट में एक भूमिका ली है कि डोअर-टू-डोअर टीकाकरण शुरु होगा. माननीय सदस्य श्री सुनील प्रभु, श्रीमती यामिनी जाधव और अन्य सभी सदस्यों ने अपनी अपनी बात यहां पर कही है. एक वर्ग है जो बहुत ही विकर सेक्शन है. जो बहुत बीमार है या अपंग है. इस बारे में मंत्री महोदय जब बात करेंगे, तो इस बात का भी खुलासा करना चाहिए कि डोअर-टू-डोअर टीकाकरण कब शुरु होगा? क्योंकि यह सबसे असुरक्षित सेक्शन है. मेरा दूसरा सुझाव यह है कि जहां पर १०० प्रतिशत टीकाकरण हो गया, मुंबई में खास तौर से रेमंड और अन्य कई कंपनियां है. सभी

असुधारित प्रत

कंपनी ने अपने १०० प्रतिशत स्टाफ को टीकाकरण कर दिया. कई रिटेल आऊटलेट्स है, मॉल्स है. यदि वे उनको १०० प्रतिशत टीकाकरण करते है, तो कोविड-१९ की गाईडलाईन के अनुसार यह काम तुरंत शुरु करना चाहिए. आपने मराठी युवक का एक वायरल व्हिडियो देखा होगा, जिसमें वह कह रहा है कि ट्रेन से सफर करने के लिए उससे टीसी ने पैसे मांगे. उसके खाते में ४०० रुपये थे, जब कि डेढ़ साल पहले उसकी सैलरी ३५ हजार रुपये थी. इस युवक, नौजवानों के बारे में सोचना चाहिए. मैं फिर से माननीय मंत्री श्री राजेश टोपे जी को धन्यवाद देता हूं. एक नये विधायक को और भिवंडी जैसे शहर को उन्होंने जो सपोर्ट दिया, उसके लिए फिर एक बार धन्यवाद देकर मैं अपना भाषण पूरा करता हूं.

----------

असुधारित प्रत

श्री.रमेश बोरनारे (वैजापूर) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्याचे माननीय आरोग्य मंत्री यांनी श्री.राजेश टोपे यांनी म.वि.स. नियम १०१ अन्वये जो शासकीय ठराव मांडलेला आहे, त्यावर बोलण्याकरिता, त्याला पाठिंबा देण्याकरिता उभा आहे.

अध्यक्ष महोदय, संपूर्ण देश व राज्यावर कोविडसारखे महासंकट आलेले असताना आपल्या राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री श्री.उद्धवजी ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री, श्री.अजित पवार आणि महाविकास आघाडीचे सर्वच मंत्री महोदय अत्यंत चांगल्या पध्दतीने या महाराष्ट्र राज्यामध्ये कोविडचा सामना करण्याकरिता सज्ज आहेत.

अध्यक्ष महोदय, मी विशेष करुन महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री श्री.राजेश टोपे यांचे अभिनंदन करणार आहे. त्यांची आई दवाखान्यात होती. तिचा मृत्यू झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी विधी पूर्ण करुन, 'मी महाराष्ट्र राज्याच्या तमाम नागरिकांची सेवा करणार आहे', असे बोलणारे महाराष्ट्र राज्याचे आपले माननीय आरोग्य मंत्री यांना मी धन्यवाद देणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी आणखी एका गोष्टीवर या ठिकाणी चर्चा करणार आहे. जवळजवळ ३ कोटी ४४ लाख लसीकरणाचा टप्पा महाराष्ट्र राज्याने पूर्ण करुन भारत

असुधारित प्रत

देशामध्ये अव्वल क्रमांक पटकावला. त्यामुळे मी खऱ्या अर्थाने महाविकास आघाडीचेही या निमित्ताने अभिनंदन करणार आहे.

अध्यक्ष महोदय, मी केवळ दोन गोष्टींवर चर्चा करणार आहे. माझ्या संभाजीनगर औरंगाबाद जिल्ह्यामध्ये व वैजापूर तालुक्यात खाजगी रुग्णालयांच्या बाबतीत कुठेतरी नियंत्रण असणे आवश्यक आहे. कारण तेथे जुगारासारख्या चिठ्ठया देऊन काही डॉक्टर, काही दवाखाने यांनी रुग्णांना लुटण्याचा प्रयत्न केला. मी जेव्हा जेव्हा बैठक लागली तेव्हा तेव्हा या बाबतीत लक्ष वेधले.

नंतर श्री.शिंदे ....

असुधारित प्रत

श्री.रमेश बोरनारे...

माननीय पालक मंत्री श्री.सुभाष देसाई यांना ही बाब सांगितलेली आहे. कोविड-१९ प्रादुर्भावग्रस्त रुग्ण असो किंवा इतर कोणत्याही आजाराचा रुग्ण असो, त्यांच्यावर उपचार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व सोयीसुविधांचे दरपत्रक रुग्णालयाच्या दर्शनी भागामध्ये लावण्यात यावे, अशी माझी सूचना आहे.

अध्यक्ष महोदय, या ठरावाच्या अनुषंगाने चर्चा करीत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी आधार कार्डच्या संदर्भात मुद्दे मांडले आहेत. अनेक लोकांकडे आधारकार्ड नाही त्यांना लसीकरणापासून वंचित रहावे लागेल. यासंदर्भात चांगला निर्णय घेणे ही बाब महत्त्वाची आहे.

अध्यक्ष महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती यामिनी जाधव यांनी ठरावावर चर्चा करीत असताना आश्रम शाळा, वृध्द आश्रम, तांडा वस्तीचा मुद्दा मांडलेला आहे. सदरहू ठिकाणच्या लोकांनाही लसीकरणाचा फायदा देण्यात यावा. अनेक ठिकाणचे नागरिक लसीकरणासाठी पुढे येत नाहीत. त्यामुळे ग्रामपंचायत, नगरपंचायतीच्या माध्यमातून १०० टक्के लसीकरण करण्याकरिता लक्ष द्यावे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, या राज्यामध्ये रुग्ण वाहिकांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात होता. माझ्या वैजापूर तालुक्यातही होता. यासंदर्भात आरोग्य मंत्री महोदय व महाविकास आघाडीतील सर्व मंत्री महोदयांनी चांगला निर्णय घेतला. त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद !

-------

**उपाध्यक्ष** : सन्माननीय सदस्य ठरावावर अतिशय रास्त सूचना देत आहेत. परंतु त्यांनी या चर्चेमध्ये अगोदर मांडलेले मुद्दे दुबार मांडू नयेत व थोडक्यात सूचना विषद कराव्यात.

श्री.रवींद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) : अध्यक्ष महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी म.वि.स.नियम ११० अन्वये मांडलेल्या शासकीय ठरावास पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय आरोग्य मंत्री यांनी स्वत:ला कोविड संक्रमाणाच्या संदर्भात उपाययोजना करण्यासाठी स्वत:ला वाहून घेतले आहे. माहे मार्च, २०२० मध्ये विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होते. त्यावेळी कोविड प्रादुर्भावाच्या

असुधारित प्रत

अनुषंगाने विधिमंडळाचे अधिवेशन नियोजित तारखेपूर्वी ३-४ दिवस अगोदर संस्थगित करण्यात आले होते. त्यानंतर देशामध्ये लॉकडाऊन जाहीर करण्यात आले. त्यानंतर सांगण्यात आले की, पुढील २१ दिवसांमध्ये कोविड प्रादुर्भावाने वाढणाऱ्या रुग्ण संख्येवर आळा घालू शकू. परंतु हा कालावधी वाढत वाढत आजपर्यंत आला आहे. संपूर्ण जगामध्ये, देशामध्ये, राज्यामध्ये व आपल्या सर्वांच्या मतदारसंघामध्ये कोविडची साथ आलेली आहे. त्याचा परिणाम प्रत्येक घरातील व्यक्तींवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे झाला आहे. या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या माध्यमातून काही बंधणे घालण्यात आली. त्यानंतर आपण घरामध्ये राहू लागलो. विधिमंडळाच्या अधिवेशनांचा कालावधी कमी झाला. आता सुरु असलेले पावसाळी अधिवेशन दोन दिवसांसाठी बोलविण्यात आले आहे. याचे कारण कोविड-१९ प्रादुर्भाव हे आहे. कोविड-१९ महामारीच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने राज्य सरकारने काय केले पाहिजे, केंद्र सरकारने काय केले पाहिजे, यासंदर्भात वृत्तपत्रांच्या माध्यमांतून, टि.व्ही.चॅनलच्या माध्यमातून, सभागृहाच्या माध्यमातून चर्चा करण्यात येत आहे.

कोविड-१९ प्रादुर्भावग्रस्त रुग्णांना कोणती औषधे द्यावयाची असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी वर्ल्ड हेल्थ

असुधारित प्रत

ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून स्टेरॉईड, अँटीबायोटीक मेडिसीन देण्यासंदर्भात गाईडलाईन देण्यात येऊ लागल्या. २०-२५ वर्षापूर्वी अँटीबायोटीकमध्ये □म्पीसीलीन, □मॉक्सीलीन, क्लॉक्सासायक्लीन देण्यात येत असत. स्टेरॉईड दिली जात असत त्यामध्ये इन्सीडाईलचा समावेश होता.

श्री.रवींद्र वायकर...

आता कोविड रुग्णांना स्टेरॉईड दिल्यानंतर त्याचा परिणाम दिसून आला. तसेच कोविड-१९ प्रादुर्भावग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी रेमडेसीवीर इंजेक्शन वापरले तरी चालेल, असे वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन सांगितले. त्यानंतर पुन्हा सांगितले की, रेमडेसीवीर इंजेक्शन कोविड रुग्णांना देण्यात येऊ नये. अनेक कोविड रुग्णांवर उपचार करताना त्यांना रेमडेसीवीरचे ६ डोस देण्यात आले आहेत. ते देताना पहिल्या दिवशी १०० मी.ली.चे २ व त्यानंतर दर दिवशी एक याप्रमाणे ४ डोस देण्यात आले. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनकडून सांगण्यात आले की, रेमडेसीवीर इंजेक्शचा साईड इफेक्ट होत आहे. आपल्या राज्यातील रुग्णांना रेमडेसीवीर इंजेक्शन देण्यात येत आहे काय, असेल तर त्याचे रुग्णांवर कोणते साईड इफेक्ट झाले

असुधारित प्रत

आहेत, या संदर्भात शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. यासंदर्भात आम्ही अनेक रुग्णांना विचारणा केली त्यावेळी सांधेदुखी, पोटरीदुखी, जॉईंटच्या ठिकाणचे मसल्स दुखू लागल्याचे सांगितले.

अध्यक्ष महोदय, कोविड प्रादुर्भाव रोखण्यासाठी जगातील अनेक देशांमध्ये लसींची निर्मिती सुरु करण्यात आली. त्यावेळी आपल्या देशात कोविड शिल्ड व कोवॅक्सीन या दोन लशींची निर्मिती सुरु करण्यात आली. बायोफार्माच्या माध्यमातून कोवॅक्सीन लस निर्मिती करण्यात आली. जगामध्ये लशींची निर्मिती होत असताना संबंधित उत्पादक कंपन्यांना जगातील मोठ्या देशांसह काही देशांनी लस खरेदीची ऑर्डर देण्यास सुरुवात केली होती. त्यावेळी आपल्या देशातील केंद्र शासनाने लस खरेदीची ऑर्डर का दिली नाही, आपल्या देशामध्ये लशी उशिरा का आल्या ? आपण अजूनही लस मिळण्याची वाट पाहत बसलो आहोत. आपल्या देशामध्ये कोविड शिल्ड लस अधिक प्रमाणात देण्यात आली आहे व कोवॅक्सीन लस कमी प्रमाणात देण्यात आली आहे. कोवॅक्सीन लससाठी वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने अद्यापही परवानगी दिलेली नाही.

असुधारित प्रत

श्री.रवींद्र वायकर...

अध्यक्ष महोदय, आपल्या देशातील तरुणांना लसींचे दोन डोस घेतल्याशिवाय बाहेर देशामध्ये शिक्षण घेण्यासाठी जाता येत नाही. अशा वेळी त्यांनी कोवॅक्सीनचे डोस घेतले असतील त्यांना विमान प्रवास करता येईल काय, त्यांना परदेशात प्रवेश मिळेल काय ? हा प्रश्न निर्माण झाला आहे. यासंदर्भात मंत्री महोयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात स्पष्ट करावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, आपल्या देशामध्ये कंपन्यांना लस पुरवठा करावयाचा असेल तर तो सर्व केंद्र शासनाला करावा, असा नियम केंद्र शासनाने केला. सदरहू लसींपैकी ५० टक्के लस पुरवठा राज्य सरकारला करण्यात येणार व उर्वरित लसींच्या बाबतीत केंद्र शासन निर्णय घेईल, असा नियम करण्यात आला. त्यामुळे केंद्र शासनाच्या पक्षाचे सरकार ज्या राज्यांमध्ये असेल त्या राज्यांना अधिक लस पुरवठा व जेथे नसेल तेथे लस पुरवठ्यावर नियंत्रण आले.

यानंतर श्री.तेलंग...

असुधारित प्रत

श्री.रविंद्र वायकर.......

अशा प्रकारचे राज्यावर नियंत्रण नको होते. कारण आम्ही देखील तुमचीच जनता आहोत. हे राज्य देखील तुमचेच आहे. केंद्र शासन हे मायबाप आहे. त्यामुळे सर्व राज्यांना समान न्याय देणे हे आपले कर्तव्य आहे. म्हणून माननीय पंतप्रधान व माननीय केंद्रीय आरोग्य मंत्री यांनी याबाबत विचार करावयास पाहिजे होते.

अध्यक्ष महोदय, ज्यावेळेला केंद्र सरकारने राज्याला ५० टक्के लस दिली, त्यावेळेला संबंधित राज्यांनी प्राधिकरणे, राज्य शासनाची हॉस्पिटल्स, महानगरपालिका, नगरपालिका, त्यांच्या माध्यमातून लसीकरणाची कार्यवाही सुरू केली. लस उत्पादन करणारी संस्था केंद्र शासनाला १५० रुपयांना एक डोस देत आहे आणि तोच डोस राज्य शासनाला मात्र ३०० रुपयांना देत आहे. जर कोणाला खाजगीरीत्या लस खरेदी करावयाची असेल तर त्यांनी थेट लस उत्पादन संस्थेशी संपर्क करावयाचा आहे. ५० टक्क्यांमधूनच राज्यशासनाला लस द्यावयाची आहे व उर्वरित लस खाजगी लोकांना द्यावयाची आहे. जी लस केंद्र सरकारला १५० रुपयाला विकाली जात आहे तीच लस खाजगी लोकांना मात्र ६०० रुपयांना विकत

असुधारित प्रत

घ्यावी लागत आहे. एकच लस केंद्र शासनाला १५० रुपयांना मिळणार, राज्य शासनाला ३०० रुपयांना मिळणार आणि खाजगी संस्थांना ६०० रुपयांना मिळणार आहे.

अध्यक्ष महोदय, १२०० ते १३०० लोकसंख्या असलेल्या सोसायट्याच्या अनेक सचिवांनी डॉक्टरांना संपर्क करुन लसीची मागणी केली होती. तेव्हा काही डॉक्टरांनी एका लसीची किंमत १२५० रुपये सांगितली. काही डॉक्टरांनी त्याच लसीची किंमत १३५० रुपये सांगितली तर काहींनी १ हजार रुपये सांगितली आहे. या दराप्रमाणे अनेक सोसायट्यांतील नागरिकांना लस देण्यात आली आहे. ही सर्वच्या सर्व लस केंद्र शासनाने राज्य शासनाला दिली असती तर राज्य शासनाने ती सर्वांना मोफत उपलब्ध करून दिली असती. खाजगीकरणाचा प्रश्नच उद्भवला नसता. राज्य शासन त्यांच्या प्रत्येक प्राधिकरणाच्या माध्यमातून ही लस लोकांना मोफत देत असेल तर इतर संस्थांनी देखील ती लस मोफत उपलब्ध दिली पाहिजे. परंतु तसे न करता यामध्ये अनेकांनी कमावण्याचा उद्देश ठेवला आणि त्यामाध्यमातून बोगसपणा

श्री.रविंद्र वायकर.......

फोफावला. काही ठिकाणी तर मेडिकलची माहिती असणाऱ्या लोकांनी डॉक्टर्स व नर्स यांना घेऊन अनेक सोसायट्यांमध्ये बोगस लसीकरणाचे प्रकार चालू केले. माझ्या भागातील काही लोकांनी मला सांगितले आहे की, आमच्या सोसायटीमध्ये लसीकरणाची मोहिम आखली आहे, त्या मोहिमेचे उद्घाटन करण्यास आपण याल काय ? अशा प्रकारचे अनेक आमदारांना सांगण्यात आले असेल. परंतु ज्यावेळस आपण अशा लसीकरणाच्या उद्घाटनास जातो तेव्हा आपण या लसीकरणास मुंबई महानगरपालिकेची, राज्य शासनाची किंवा आरोग्य विभागाशी संबंधीत असलेल्या एजंसीची परवानगी घेतलेली आहे काय, हे विचारणे आवश्यक होते. परंतु असे कोणीही विचारलेले नाही. आम्ही लोक त्या ठिकाणी गेलो त्यातील काही ठिकाणी बोगस लसीकरण झालेले आहे. मुंबई महानगरपालिकेची किंवा संबंधित वॉर्ड ऑफिसरमध्ये असलेले आरोग्य अधिकारी यापैकी कोणाचीही या लसीकरणास परवानगी घेतलेली नव्हती. अशा प्रकारे अनेक बोगस लसीकरण झालेले आहे. अशा प्रकारचे बोगस लसीकरण करणाऱ्यांवर शासनाने कठोरात कठोर शिक्षा केली पाहिजे. कारण अशा पद्धतीचे दुसरे कोणीही बोगस लसीकरण करणार नाही.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, या माध्यमातून माझ्या काही सूचना आहेत. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे. त्यामुळे मी माझ्या सूचना थोडक्यात मांडतो. मुंबई महानगरपालिकेच्या प्राधिकरणामध्ये अनेक डॉक्टर्स टेम्परररी आहेत. तसेच राज्य शासनाच्या सेवेत देखील अनेक डॉक्टर्स टेम्परररी आहेत. यातील काही डॉक्टर्स BHMS ची पदवी घेतलेले आहेत तर काही अन्य कोणत्या पदव्या घेतलेले आहेत. ते सर्व डॉक्टर्स आपल्याकडे १० ते १५ वर्षापासून टेम्परररी म्हणून काम करीत आहेत. कोविडच्या काळामध्ये काम केलेल्या सर्व डॉक्टर्सना सेवेत कायम करण्यात यावे, अशी मी या सभागृहाला विनंती करतो. १५-१५, २०-२० वर्षापासून ते काम करीत आहेत. जनतेच्या जीवाची काळजी घेण्यासाठी ज्या ज्या डॉक्टर्सने, पॅरामेडिकलच्या कर्मचाऱ्यांने काम केले आहे, अशा सर्वांना राज्यशासनाच्या

श्री.रविंद्र वायकर.......

माध्यमातून किंवा प्राधिकरणाच्या माध्यमातून सेवेत कायम करण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

अध्यक्ष महोदय, कोरोनाच्या काळामध्ये राज्य शासनाने चांगल्या पद्धतीने काम केलेले आहे. यामध्ये मुंबई

महानगरपालिकेने देखील सिंहाचा वाटा उचललेला आहे. मुंबई महानगरपालिके माननीय आयुक्त यांनी माननीय आरोग्य मंत्र्याच्या निर्देशानुसार, माननीय मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार जे काम केलेले आहे ते अतुलनीय असे आहे. १४ प्रभाग समित्यांमध्ये, मुंबई शहराच्या २४ वॉर्डमध्ये ज्या पद्धतीने काम चालले आहे ते खरोखरच त्यांचे अभिनंदन करण्यासारखे आहे.

अध्यक्ष महोदय, जे अपंग व्यक्ती असतील, ज्यांना लसीकरण केंद्रावर घेऊन जाता येत नाही, अशा लोकांचे घरोघरी जाऊन लसीकरण करण्यात यावे, अशी मी आरोग्य मंत्री महोदयांना विनंती करतो.

अध्यक्ष महोदय, एखादी व्यक्ती कोविडमुळे मृत्यूमुखी पडल्यानंतर तिच्यावर कोणत्या स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करायचे, लाकडाच्या चितेवर दहन करायचे की विद्युत दाहिनीद्वारे दहन करायचे ? असा अनेकांना प्रश्न पडलेला आहे. काही ठिकाणी लाकडाच्या चितेवर अंत्यसंस्कार करण्यात येत होते, अशा वेळी विद्युत दाहिनीच्या माध्यमातून दहन करावे, अशी मागणी केली जात होती. परंतु मुंबईतील सर्व स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहिनीची व्यवस्था नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, मुंबईतील प्रत्येक वॉर्डमध्ये ज्या ठिकाणी स्मशानभूमी आहे

असुधारित प्रत

त्या सर्व ठिकाणी विद्युत दाहिनी व गॅस दाहिनीची व्यवस्था करावी.

अध्यक्ष महोदय, कोविडचे वेळोवेळी म्युटेशन होत आहे. कोविडने वेगवेगळे रुप घ्यायला सुरूवात केली आहे. कोविडचा विषाणू अगोदर गोल होता तेंव्हा त्याला काट्यासारखा आकार होता. आता त्याचा डेल्टासारखा आकार झालेला आहे. कधी तो गॅमाचा आकार घेईल किंवा आणखी कोणता घेईल. असे आकार तो घेऊ शकेल. कोविडच्या म्युटेशनवर आपल्याकडे संशोधन होणे गरजेचे आहे. केंद्र सरकार

श्री.रविंद्र वायकर.......

याबाबतीमध्ये संशोधन करीलच पण राज्याने देखील या कामाला प्राधान्य दिले पाहिजे. कोविडच्या काळामध्ये मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: वर जबाबदारी घेऊन “माझे कुटुंब माझी जबाबदारी” हे अभियान राबविले आहे. तसेच त्यांनी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून राज्यातील जनतेशी थेट संवाद साधलेला आहे. त्यांनी या कामाच्या माध्यमातून कुटुंब प्रमुख कसा असतो हे राज्याला व केंद्राला दाखवून दिले आहे. त्याबद्दल मी त्यांना शुभेच्छा देतो.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्री यांनी देखील खरोखरच प्रशंसनीय काम केलेले आहे. त्यामुळे मी आपले

असुधारित प्रत

देखील आभार मानतो. मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद...

----

असुधारित प्रत

श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) : अध्यक्ष महोदय, आपण मला महत्त्वाच्या विषयावर बोलण्याची संधी दिलीत त्याबद्दल मी प्रथमत: मी आपले आभार मानतो.

अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्री यांनी लसीकरणाच्या बाबतीत जो महत्त्वाचा ठराव या ठिकाणी मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा राहिलो आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लसीकरण ज्या गतीने होणे आवश्यक होते त्या गतीने झालेले नाही किंवा आता देखील होत नाही. आता ग्रामीण भागामध्ये शेतीची कामे सुरु झालेली असल्यामुळे लोक शेतीची अवजारे, खत, बी-बियाणे खरेदी करायला मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडत आहेत. वास्तविक पाहता लसीकरण अगोदर झाले असते तर निश्चितपणाने लोकांना धोका राहिला नसता. लसीकरणाच्या बाबतीत आपण परावलंबी असल्यामुळे अशा प्रकारच्या अडचणींना आपणास सामोरे जावे लागत आहे.

यानंतर श्री.कुलकर्णी......

असुधारित प्रत

श्री. बाळासाहेब आजबे.........

अध्यक्ष महोदय, कोरोना काळात ग्रामीण भागात राज्य सरकारने आणि विशेषत: सार्वजनिक आरोग्य विभागाने अतिशय चांगले काम केलेले आहे. माझ्या आष्टी मतदारसंघामधील ग्रामीण रुग्णालयात १७० खाटांची व्यवस्था करण्यात आली आहे. माझ्या मतदारसंघामध्ये पाटोदा, आष्टी, शिरुर हे तालुके आहेत. या तालुक्यात पूर्वी एकाही ऑक्सिजन बेडची व्यवस्था नव्हती. तेथे आता ५० खाटांची व्यवस्था करण्यात आली आहे. माझ्या जिल्ह्यामध्ये राज्य सरकारच्या माध्यमातून सहा ऑक्सिजन प्लँट उभारण्याचे काम सुरु आहे. त्याबद्दल मी माननीय पालकमंत्र्यांचेही आभार मानतो. तेथे सध्या सव्वा दोन कोटी रुपयांच्या ऑक्सिजन प्लँटचे काम सुरु आहे. राज्य सरकारने कोरोना काळात अतिशय चांगले काम केल्यामुळे जनतेला मोठा दिलासा मिळाला आहे. आताच काही सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार आपल्या देशात लसींचा साठा कमी असतानाही केंद्र सरकारने इतर देशांना लसींचा पुरवठा केला होता. हे अयोग्य आहे, असे मला वाटते. काही सन्माननीय सदस्यांची खाजगी रुग्णालयांसंदर्भातील विषय उपस्थित केला आहे. अनेक खाजगी रुग्णालयांकडून कोरोना रुग्णांना सात ते आठ लाख

असुधारित प्रत

रुपयांचे बिल मिळालेले आहेत. याकडेही माननीय आरोग्यमंत्र्यांनी लक्ष दिले पाहिजे. राज्य सरकारने त्या बिलांचे आता ऑडिट करण्याचे काम सुरु केले आहे. अनेक भागामध्ये रुग्णालयांनी कच्च्या कागदावर बिल नोंदवून दिलेले आहे. त्यामुळे त्या बिलांचे ऑडिट करतेवेळेस अडचणी निर्माण होणार आहेत. मी एका प्राथमिक आरोग्य केंद्रावर चौकशी केली असता तेथे दोनशे लसी उपलब्ध होत्या व तेथे दोन हजार लोकांनी लस घेण्यासाठी रांग लावली होती. अशा परिस्थितीत हा ठराव केंद्र सरकारकडे पाठविल्यामुळे महाराष्ट्र राज्यास मोठ्या प्रमाणात लसींचे डोस उपलब्ध होतील. याचा फायदा राज्यातील सर्व जनतेला होईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

अध्यक्ष महोदय, आपण मला या ठरावावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

धन्यवाद !

श्री. हिरामण खोसकर (इगतपुरी) : अध्यक्ष महोदय, माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी जो ठराव मांडला आहे, त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

अध्यक्ष महोदय, मी माननीय मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित

असुधारित प्रत

पवार, माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. राजेश टोपे तसेच माननीय महसूल मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांचे आभार मानतो. या सर्वांनी अतिशय प्रामाणिकपणे काम केले आहे. मघाशीच सन्माननीय सदस्य श्री. सुनील प्रभु यांनी भाषण केले आहे. ग्रामीण भागातील भौगोलिक परिस्थिती पाहता त्र्यंबक, इगतपुरी आणि पेठ तालुका माझ्या मतदारसंघात आहेत. तसेच तेथे एक ग्रामपंचायत व २२ पाडे काही ठिकाणी एक ग्रामपंचायत २५ पाडे आहेत. तेथे लसीकरण केंद्रे अतिशय कमी प्रमाणत आहेत. माझ्या भागामध्ये अधिकाधिक लसीकरण केंद्रे सुरु झाली पाहिजेत. जेणेकरुन ग्रामीण भागातील लोकांना लसीकरणासाठी पायपीट करावी लागणार नाही. आदिवासी भागातील अनेक आदिवासी बांधव शहरामध्ये स्थलांतरीत होत असतात. ते आदिवासी बांधव जेथे जातील तेथे त्यांचे लसीकरण झाले पाहिजे. अनेक ठिकाणी ग्रामीण भागातून शहरात आलेल्या आदिवासी बांधवाचे लसीकरण करुन घेतले जात नाही. त्यामुळे याबाबत एक बैठक घेऊन आदिवासी भागामध्ये अधिकाधिक लसीकरण केंद्रे सुरु होण्यासाठी योग्य निर्णय घ्यावा.

अध्यक्ष महोदय, मी रेशनकार्डसंदर्भात बोलू इच्छितो. आदिवासी भागातील लोकांकडे पिवळे रेशन कार्ड नसेल तर त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. असे

असुधारित प्रत

असताना जर एकाच कुटुंबात पिवळे रेशन कार्ड असेल आणि त्या कुटुंबातील मुलगा वेगळा निघाला तर त्याला केशरी रेशन कार्ड दिले जाते. याबाबतचे सर्वेक्षण करीत असताना आदिवासी भागातील लोकांवर अन्याय होत आहे. याबाबत योग्य ती सुधारणा केली पाहिजे, अशी मी विनंती करतो. त्र्यंबक तालुक्यातील अंजनेरी हे गाव गुजरात राज्याच्या सीमेवर १०० कि.मी. अंतरावर आहे. तेथून त्र्यंबक

श्री. हिरामण खोसकर .....

तालुक्यामध्ये लसीकरणासाठी जाणे अतिशय कठीण आहे. हर्सूल येथे लसीकरण केंद्र सुरु करावे, अशी मी मागणी करतो.

अध्यक्ष महोदय, मला ठरावावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी माननीय अध्यक्षांचे आणि सभागृहाचे आभार मानतो.

धन्यवाद !

असुधारित प्रत

श्रीमती गिता जैन (मिरा-भाईंदर) : अध्यक्ष महोदय, माननीय आरोग्य मंत्री श्री. राजेश टोपे यांनी म.वि.स. नियम ११० अन्वये अतिशय चांगला प्रस्ताव मांडला आहे. हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्यातील भिकारी किंवा भटक्या जातीमधील लोकांना लस कशा प्रकारे देणार आहे, याबद्दलचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी सांगू इच्छिते की, मुंबई शहर आणि मुंबई उपनगरामध्ये बांगलादेशी आणि नेपाळी लोक मोठ्या प्रमाणात राहत असतात. त्या लोकांकडे रेशनकार्ड, ओळखपत्र, आधारकार्ड उपलब्ध नसते. त्यांच्याकडूनही कोरोना संक्रमण होण्याची शक्यता असते. त्यामुळे हे लोक ज्या कंपनीत किंवा ज्या आस्थापनेवर काम करतात त्या कंपनीला किंवा आस्थापनेला सांगून या लोकांचे पूर्णपणे लसीकरण केले पाहिजे. सध्या हॉटेल व्यवसायत नेपाळी लोकांचा समावेश मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे अशा कंपन्या किंवा हॉटेल मालकांना तेथे काम करणाऱ्या नेपाळी किंवा बांगलादेशी लोकांचे सक्तीने लसीकरण करावे, अशा प्रकारची सूचना केली पाहिजे.

अध्यक्ष महोदय, मध्यंतरी अनेक सहाकारी रहिवाशी संस्थांमध्ये खाजगी रुग्णालयाच्या माध्यमातून लसीकरण केले जात होते. त्याला अनेकांनी अतिशय चांगला प्रतिसाद

असुधारित प्रत

दिला होता. जोपर्यंत मोफत लसीकरणाची घोषणा झाली नव्हती तोपर्यंत अनेक रहिवाशी सोसायटीमध्ये लसीकरण माहिमेला चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत होता. परंतु जेव्हा मोफत लसीकरणाची घोषणा झाली तेव्हा लसीकरण कमी प्रमाणात झाले. सध्या खाजगी रुग्णालयांकडून लस घेणाऱ्यांची संख्या कमी होताना दिसून येत आहे. खाजगी रुग्णालयातून लस घेतल्यानंतर त्यावर काही अनुदान देता येईल काय किंवा खाजगी रुग्णालयातील लसींचे दर कमी करण्यासाठी निर्णय घेता येईल काय ? खाजगी रुग्णालयातून लस घेण्यासाठी राज्य सरकारने दर ठरविला पाहिजे. केंद्र सरकारने यात केंद्र व राज्य हिस्सा ठरवून दिला आहे. असे असताना राज्य सरकार यात काही दर ठरवू शकते काय ? कमी दराने लस उपलब्ध झाल्यास लसीकरणात आपणास गती मिळू शकते. मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली आहे की, ज्या ज्या लोकांनी कोरोना प्रतिबंधात्मक लसींचे दोन्ही डोस घेतले असतील त्या लोकांना लोकल प्रवासास मुभा देण्यात यावी.

असुधारित प्रत

श्रीमती गिता जैन.....

कारण एक उदाहरण असे पाहिले की, अकाउंटवर केवळ ४०० रुपये असणारा एक व्यक्ती होता. म्हणजे त्यांना दंड लावला तर तो देखील ते भरु शकत नव्हते. लसींचे दोन डोस घेतलेल्यांना जर लोकलमध्ये प्रवेश दिला तर त्यामुळे देखील अनेक जण लसी घेतील व पर्यायाने लसीकरणाला गती मिळेल, असे माझे मत आहे. त्यामुळे याबाबत देखील सरकारने विचार करावा.

अध्यक्ष महोदय, आताच सन्माननीय सदस्यांनी एक मुद्दा मांडला की, डब्ल्यू.एच.ओ. ने सर्वच लसींना सारखी मान्यता दिलेली नाही. कोवॅक्सिन लसीचा डोस घेतला तर तुम्ही आंतरराष्ट्रीय प्रवास करु शकत नाही तर कोविशिल्ड लसीचा डोस घेतलेला असल्यास प्रवास करु शकता. आता लवकरच आपल्याकडे स्पुटनिक, जॉन्सन □ण्ड जॉन्सन लशी उपलब्ध होणार आहेत. त्यांचा योग्य प्रकारे उपयोग करुन घ्यायचा असेल तर त्यासाठी समान धोरण ठरविणे अतिशय गरजेचे आहे. कारण जॉन्सन □ण्ड जॉन्सन व स्पुटनिक लशी आपल्याकडे येऊन त्यांना डब्ल्यू.एच.ओ. ने मान्यता दिली नाही तर त्या तशाच पडून राहतील. त्यांचा काहीही उपयोग होणार नाही. त्यामुळे त्यासाठी समान धोरण आखणे अतिशय गरजेचे आहे.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, मी या ठरावाला पाठिंबा दर्शवित असताना डॉक्टरांच्या वेतनाचा देखील मुद्दा मांडू इच्छिते. महापालिका किंवा राज्य सरकारच्या रुग्णालयांसाठी डॉक्टर्स मिळत नाहीत. आपण बी.ए.एम.एस. व इतर काही पदव्या धारण करणाऱ्या डॉक्टरांना देखील सेवेत घेतले आहे. त्यांना सेवेत कायम करण्याचा विचार देखील अतिशय चांगला आहे. सोबतच वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांना शासनाच्या हॉस्पिटल्समध्ये सेवा देणे अनिवार्य करण्याबाबत देखील विचार करावा, ही विनंती.

मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे.

**उपाध्यक्ष :** यासंबंधी राज्य विधीमंडळाची शिफारस केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल. आता मी हा ठराव मतास टाकतो.

ठराव सर्वानुमते संमत झाला.

---------

असुधारित प्रत

**पृ.शी. :** विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यांप्रमाणे उर्वरित राज्यातील कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याबाबत.

**मु.शी. :** विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यांप्रमाणे उर्वरित राज्यातील कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करणे या विषयावरील श्री.धनंजय मुंडे, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री यांचा ठराव.

श्री.धनंजय मुंडे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील ठराव मांडतो :-

"ज्याअर्थी, महाराष्ट्रात अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यामध्ये कैकाडी जातीचा

असुधारित प्रत

अनुसूचित जातीमध्ये तर उर्वरित ठिकाणी कैकाडी जातीचा विमुक्त जाती (अ) मध्ये समावेश केलेला आहे. महाराष्ट्र राज्यात कैकाडी जातीचा समावेश दोन वेगवेगळया प्रवर्गात होत असल्यामुळे या समाजाला विविध अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने समाजातील सदस्यांनी, लोकप्रतिनिधींनी राज्यातील सर्व कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याची मागणी केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा याप्रमाणे उर्वरित राज्यातील कैकाडी समाजाचा अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव भारत सरकारकडे पाठविण्यापूर्वी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळविणे इष्ट वाटते;

श्री.धनंजय मुंडे.....

त्याअर्थी, आता विधानसभा नियम ११० अनुसार महाराष्ट्र विधान सभा, याद्वारे विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा याप्रमाणे उर्वरित

असुधारित प्रत

राज्यातील कैकाडी जातीचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याची शिफारस केंद्र सरकारला करीत आहे."

अध्यक्ष महोदय, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ३४१ नुसार अनुसूचित जातीच्या यादीमध्ये एखाद्या जातीचा समावेश करणे अथवा वगळण्याचे अधिकार माननीय राष्ट्रपती महोदयांना आहेत. त्यानुसार केंद्र शासनाने दिनांक १०.०८.१९५० च्या अधिसूचनेमध्ये, म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हयात असताना मध्य प्रदेश राज्यासाठी अनुसूचित जातीमध्ये कैकाडी ही जात अधिसूचित केली. मुंबई पुनर्रचना अधिनियम, १९५० नुसार राज्याची पुनर्रचना होण्यापूर्वी बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, विदर्भ विभाग प्रदेश हे जिल्हे मध्य प्रदेश राज्याचा भाग होते. त्यानुसार या जिल्हयांतील कैकाडी जातीचा अनुसूचित जातीमध्ये समावेश झाला होता. तद्नंतर राज्याची पुनर्रचना झाल्यानंतर कैकाडी जातीचा अनुसूचित जातीचा दर्जा सदर जिल्हयांपुरता म्हणजे विदर्भ विभागापुरता मर्यादित ठेवण्यात आला. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती सुधारणा अधिनियम, १९७६ द्वारे सुध्दा सदर कैकाडी समाजाच्या बाबतीत क्षेत्रीय निर्बंध हटविण्यात आले नाहीत व या समाजाचा अनुसूचित जातीमधील समावेश केवळ विदर्भापुरता कायम ठेवण्यात

असुधारित प्रत

आला. सद्यस्थितीत महाराष्ट्रात अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्हा यामध्ये कैकाडी जातीचा अनुसूचित जातीमध्ये तर मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, धुळे, जळगाव, पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड जिल्हे व चंद्रपूर जिल्हयातील राजूरा तालुका यात कैकाडी जातीचा विमुक्त जाती (अ) प्रवर्गामध्ये समावेश केलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे.....

महाराष्ट्र राज्यात कैकाडी जातीचा समावेश दोन वेगवेगळया प्रवर्गात होत असल्यामुळे या समाजाला विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या समाजातील काही सदस्य, काही लोकप्रतिनिधी तसेच विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.माने साहेब यांनी देखील एकाच राज्यात एकाच जातीचा दोन प्रवर्गांमध्ये समावेश असल्यामुळे मागणी केली की, जसे महाराष्ट्राच्या इतर जिल्हयांमध्ये हा समाज अनुसूचित जाती प्रवर्गात आहे तसेच या उर्वरित जिल्हयांमधील कैकाडी समाज देखील अनुसूचित जाती प्रवर्गात समाविष्ट व्हावा.

असुधारित प्रत

अध्यक्ष महोदय, सन २०१४ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांना कळविण्यात आले व त्यानुसार त्यांनी सर्वेक्षण करुन महाराष्ट्र राज्यातील सर्व कैकाडी समाजाचा अनुसूचित जातीच्या यादीत समावेश करण्याबाबतच्या शिफारशीसह अहवाल सादर केला होता. सदर अहवाल सन २०१४ मध्ये तत्कालीन मंत्री मंडळासमोर आला. मंत्री मंडळाने शिफारस करुन दिनांक ०७.१०.२०१४ रोजी केंद्र सरकारकडे म्हणजे आर.जी.आय. यांच्याकडे पाठविला. तसेच दिनांक २२ मार्च, २०१६ रोजी स्मरणपत्र म्हणून पुन्हा तोच अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला. त्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालयाने दिनांक ११.०८.२०१६ रोजीच्या पत्रान्वये, "The RGI vide its Report did not support aforesaid proposal on the ground of no ethnographic evidence suggesting the member of Kaikadi community is victim of any tangible form of social disabilities.", असे अभिप्राय दिले आहेत. त्यानंतर बार्टी, पुणे यांनी कैकाडी समाजाचा तुलनात्मक अभ्यास करुन पुन्हा नव्याने अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. त्या अनुषंगाने सन २०१९ मध्ये बार्टीकडून सुधारित अहवाल सादर करण्यात आला. त्या सुधारित प्रस्तावाच्या आधारे कैकाडी

असुधारित प्रत

समाजाचे क्षेत्रीय बंधन उठवून उर्वरित राज्यातील कैकाडी समाजाचा विदर्भाप्रमाणे अनुसूचित जातीमध्ये

श्री.धनंजय मुंडे.....

समावेश करण्याचा सुधारित प्रस्ताव पुनर्विचाराने केंद्र सरकारकडे दिनांक १७.०७.२०२० रोजी पाठविण्यात आला.

अध्यक्ष महोदय, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालक, सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी कळविले की, "अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये जातीचा नव्याने समावेश करणे अथवा वगळणे अथवा सुधारणा करणेकरिता केंद्र शासनाने कार्यपध्दती विहित केलेली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार रजिस्टर जनरल ऑफ इंडिया यांनी दोन वेळा प्रस्ताव अमान्य केल्यानंतर पुन्हा त्यांच्याकडे तिसऱ्यांदा प्रस्ताव सादर करण्याची तरतूद नाही."

अध्यक्ष महोदय, यापूर्वी जो प्रस्ताव पाठविण्यात आला होता तो मंत्री मंडळाच्या ठरावानेच गेलेला होता. त्यामुळेच आज हा ठराव शासकीय ठरावाच्या रुपाने सभागृहाच्या मान्यतेसाठी आणलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.यशवंत माने यांनी कैकाडी समाजाचे क्षेत्रीय

बंधन उठवून उर्वरित राज्यातील कैकाडी समाजाचा विदर्भाप्रमाणे अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्याबाबतचा ठराव विधीमंडळाने मंजूर करुन केंद्र शासनाकडे शिफारस करण्याची मागणी केली आहे. तरी राज्यातील कैकाडी जात दोन वेगवेगळया मागासवर्गीय प्रवर्गात समाविष्ट असल्यामुळे कैकाडी समाजाचे क्षेत्रीय बंधन उठवून उर्वरित राज्यातील कैकाडी समाजाचा विदर्भाप्रमाणे अनुसूचित जातीमध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्याचा ठराव मी या ठिकाणी मान्यतेसाठी सादर करतो.

अध्यक्ष महोदय, या निमित्ताने सभागृहाच्या एक गोष्ट मला लक्षात आणून द्यायची आहे की, ज्यावेळी मध्य प्रदेश राज्य वेगळे झाले त्यावेळी त्यामध्ये समाविष्ट असलेल्या जिल्हयातील कैकाडी समाज १९५० च्या अधिसूचनेनुसार अनुसूचित जाती प्रवर्गामध्ये समाविष्ट झाला. त्या काळी मराठवाड्यात निजामाची सत्ता होती. देशाच्या स्वातंत्र्यानंतर म्हणजे दिनांक १७ सप्टेंबर, १९४८ रोजी मराठवाडा मुक्त झाला. त्यामुळे एकच समाज एकाच राज्यात दोन संवर्गामध्ये विभागला गेला आहे

श्री.धनंजय मुंडे.....

असुधारित प्रत

व तेच अद्याप कायम आहे. त्यामुळे हा ठराव सभागृहाने संमत करावा, अशी मी विनंती करतो.

ठराव प्रस्तुत झाला.

**उपाध्यक्ष :** यासंबंधी राज्य विधीमंडळाची शिफारस केंद्र शासनाकडे पाठविण्यात येईल. आता मी हा ठराव मतास टाकतो.

ठराव एकमताने संमत झाला.

---------

यानंतर श्री.धुमाळे.....

असुधारित प्रत

**विधान सभा पावसाळी अधिवेशन २०२१**
**दिनांक ५ जुलै ते ६ जुलै २०२१**
**सत्र कालावधीतील कामकाजाचा आढावा**

**उपाध्यक्ष :** कोविड १९ साथीच्या पार्श्वभूमीवर सन २०२१ मधील पावसाळी अधिवेशन दिनांक ५ जुलै ते ६ जुलै २०२१ या कालावधीत मुंबई येथे घेण्यात आले. पावसाळी अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे. आजच्या दिवसाचे कामकाज संपलेले आहे. मी या सत्र काळातील कामकाजाचा आढावा सदनासमोर ठेवतो :-

एकूण बैठकींची संख्या : २

प्रत्यक्षात झालेले कामकाज : १० तास १० मिनिटे

अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ : १ तास २५ मिनिटे

रोजचे सरासरी कामकाज : ५ तास १० मिनिटे

**शासकीय विधेयके** :

असुधारित प्रत

विधान सभा विधेयक :

पुरस्थापित : १२

संमत करण्यात आलेली विधेयके : ९

लोकाभिप्राय अजमाविण्याकरिता परिसृत : ३

विधान परिषद विधेयक : संमत करण्यात आलेली विधेयके : **निरंक**

**नियम ४७ अन्वये निवेदन : २**

**शासकीय ठराव : ४**

**शोक प्रस्ताव व पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली.**

उपाध्यक्ष......

या अधिवेशनाचा समारोप करताना मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सर्व मंत्री महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय तालिका सभाध्यक्ष, सर्व सन्माननीय गट नेते, सर्व सन्माननीय सदस्य, विधान मंडळाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, सुरक्षा विभागाचे अधिकारी व कर्मचारी या सर्वांचे मनापासून आभार मानतो. तसेच मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी, कोरोना चाचणीशी निगडीत आरोग्य सेवा देणारे वैद्यकीय

अधिकारी व कर्मचारी या बरोबरच प्रसिद्धी माध्यमांचे प्रतिनिधी यांचे देखील आभार मानतो.

----------

असुधारित प्रत

**पृ. शी. / मु. शी.** : पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा

**उपाध्यक्ष :** मी खालील घोषणा करतो :-

"राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन, मंगळवार, दिनांक ०७ डिसेंबर २०२१ रोजी, विधान भवन, नागपूर येथे घेण्यात यावे."

---------

असुधारित प्रत

**पृ. शी. / मु. शी.** : सत्र समाप्तीसंबंधी घोषणा

**उपाध्यक्ष** : सभागृहापुढील कामकाज संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे.

"मी, भगत सिंह कोश्यारी, महाराष्ट्राचे राज्यपाल, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) द्वारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन याद्वारे मंगळवार, दिनांक ६ जुलै २०२१ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

यानुसार विधानसभेचे अधिवेशन आता संस्थगित झाल्याचे मी जाहीर करतो.

आता राष्ट्रगीत होईल.

(यानंतर राष्ट्रगीत झाले.)

( दुपारी ३.५५ वाजता सत्र संस्थगित झाले.)

-------------

असुधारित प्रत

असुधारित प्रत